बाहेरगांवीं टपालहांशीलासह........ २ ६
वर्गणी आगाऊच दिली पाहिजे.
किरकोळ अंकास....................२ आणे
नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत ६० ।
दर ओळीस........ ८। ०८
दुसरे खेपेस.... .... ....८।

REGISTERED No.

All Subscriptions to be paid in advance.
Single copy ........................ 2 as
Advertisement
below 10 lines ...... 2 Rs
Per line over 10 ......3 as
Repetitions Per line ,, 2 as

# वऱ्हाडसमाचार.

# THE BERAR SAMACHAR

VOL XXXVIII AKOLA MONDAY 4 JULY 1904 NO 26

वर्ष ३८ आकोला सोमवार तारिख ४ माहे जुलै सन १९०४ इ० अंक २६

ORIENTAL GOVERNMENT SECURITY
*Life Assurance Company*
*INVESTMENT POLICIES*
*With a guaranteed Bonus of 100 percent*

The above Company has recently introduced a very attractive system of non-forfeitable investment policies, with a guaranteed bonus, under which the advantages of a family provision in the event of the early death of the assured, are combined with provision for the assured himself in the event of his being alive at the age he has selected for the policy to mature. At that age not only does the payment of further premiums cease but the Company guarantees to pay in cash along with the original sum assured, a bonus equal in amount there to, thereby doubling the original sum assured and enabling the policy holders to obtain back from the Company a sum considerably larger than he has paid in premiums.

For examples:—person aged 30, may by payment of an annual premium of Rs. 20 for not more than 30 years secure Rs. 2500 payable to his heirs at his death any time before age 60, while he himself would receive the Rs. 2500 assured and in *addition* a guaranteed cash bonus of Rs. 2500 thereby securing double the amount of the original assurance, or Rs 5000 altogether, which is nearly 40 percent more than the total amount he had paid in premiums.

Full particulars and rates for different ages can be obtained from Mr. M. de Souza Chief Agent of the Company for C. P. Berars and Khandesh.

---

दि. कि. श्वा. नंबर १८ मिसल नंबर २ १९०४

विद्यमान सिव्हिल जडज साहेब बहादूर जिल्हा आकोला यांचे कोर्टांत.

अर्जदार— रामू वल्लद सोनाजी राहणार पळसो बुजरूख तालुका आकोला.

अज्ञान— देवराव वल्लद रावजी अ. पा. करणार आई गिरजाई मर्द रावजी हल्लीं राहणार आकोला.

सर्वत्र लोकांस या नोटीसीनें कळविण्यांत येते कीं अज्ञान देवराव वल्लद रावजी याचे स्वतःचे व इस्टेटीचे अशा दोहोंचें संरक्षण करण्या करितां पालन कर्ता नेमण्या विषयींचा अर्ज रामू वल्लद सोनाजी वरील अर्जदार यानें अज्ञानाचे शरीराचे व इस्टेटीचे पालन करण्यास पालन कर्ता नेमण्या बद्दल अर्ज केल्यावरून मदर्हू अर्जाच्या चौकशीची तारीख १६ माहे जुलै सन १९०४ इसवी ची नेमिली आहे. तरी सर्वत्रास कळविण्यांत येते कीं अर्जदारा शिवाय जे इतर नातलग, मित्र किंवा आप्त किंवा सदर्हू अज्ञानाचे बरें व्हावें अशी ज्यांची इच्छा असेल अगर जे अज्ञानाचे स्वतःचे व त्याचे इस्टेटीचे पालन कर्ता नेमण्या बद्दल अगर ठरविण्या बद्दल इच्छीत असतील त्यांनीं खुद्द आमचे समोर वरील तारखेस हजर व्हावें. आणि आपल्यास पालन कर्ता कां नेमावें अगर अर्जदार यांस अगर इतरास कां नेमिलें जाऊं नये या बद्दल जो कांहीं लेखी अगर तोंडी पुरावा असेल तो घेऊन त्यांनीं वरील तारखेस यावें. आज तारीख २८-६-१९०४ इसवी रोजीं आमचे सहीनिशी व कोर्टाचे शिक्या निशी दिली आहे.

G. W. Bapat.
सिव्हिल जज्ज आकोला.

---

## नोटीस

नोटीस मयनाई मर्द गणाजी माळी सोनउके राहणार चेंडकापूर तालुके दर्यापूर.

यांसः—

खाली सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं, तू माझी चुलती असून माझा चुलता गणाजी व माझा बाप हे एक ठिकाणीच राहत आले. नंतर माझा चुलता मयत झाला सबब तू आपले माहेरी राहण्यास गेली व समागमे माझा चुलत भाऊ सिताराम यासहि तू बरोबर. नेलेस तो तेथेच मयत झाला. जाते वेळीं माझे मालाचे आलेले रुपये ५०० पाचशे व शिवाय ताट तांबोटी व डागदागीनें घेऊन गेली आहेस व शिवाय तुझे माहेरची जिनगी शेती व इतर इस्टेट तुला मिळाली आहे त्या सर्व जिनगीचा मालक मी असून तू फक्त अन्नवस्त्राची मालकीण आहेस तुझे जवळ जी जिनगी आहे ती तू दुसरे कोणास विकूं नये व गहाण ठेवूं नये किंवा पद्धानें लावूं नये; तुला कोणी फंद फितूर देऊन जर तू त्याचे म्हणण्या प्रमाणें दस्तऐवज करून देशील तर त्याचा जबाबदार मी होणार नाहीं. तुला अन्नवस्त्र देण्यास मी तयार आहे. ही नोटीस पावल्या पासून १५ दिवसाचे आंत सर्व जिनगी माझे ताब्यांत द्यावी त्या प्रमाणें न वागल्यास मजला सल्ला मिळेल त्या प्रमाणें तजवीज करण्यांत येईल. कळावे तारीख २८ जून सन १९०४ इसवी.

सही.
निशाणी चिमणाजी वल्लद मनाजी माळी राहाणार वाभळी याची असे.

---

## नोटीस

बेशमी गजी मर्द मानजी जात मराठे कुणबी राहणार उमरी महमदाबाद हल्लीं राहणार इब्हड मौजे तालुके मुर्तिजापूर जिल्हा उमरावती इस—

खालीं सही करणार शेख चांद वल्लद शेख सरवर मुसलमान राहणार उमरी इतबारपूर तालुके दर्यापूर याजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुमची शेती मी दरसाल रुपये १३६ हंगामी देणेचे करारांनीं सन १३१४ फसली सुरू ते सन १३१८ फसली अखेर साल वर्षांकरितां वहितीस केली ती मौजे उमरी महमदाबाद येथील

| सर्व्हे नंबर | एकर गुंठे | आकार रुपये | हिस्सा |
|---|---|---|---|
| ६२ | २।८३ | ४९ | $\frac{1}{3}$ |
| ६९ | २६।१९ | ९२ | $\frac{1}{3}$ |
| ८० | ३८।१५ | ७९. | ८२।८ |

येणें प्रमाणें शेती मी वहितीस करून त्याजबद्दल तुह्मी मजला तारिख २६।२।०४ रोजीं कौलपट्टा लिहून देऊन तो बुक नंबर १ भाग ८८ पान ३८७–३८८ अ० नंबर १९९ सन १९०४ इसवी यास नोंदून दिला आहे परंतु सदर्हू शेती बाळाजी वल्लद सखारामजी मराठे व नाम्या वल्लद पांडु व बळवंत रावजी मराठे राहणार उमरी हे वाहू देत नाहींत व तंटा करितात सबब या नोटिसीनें तुह्मास असे कळविण्यांत येते कीं सदर्हू शेती तंट्याची असल्या कारणानें मी वाहत नाहीं व त्याचा जोडजमाव असल्या कारणानें मजकडून तंटा होत नाहीं सबब तुह्मी आपली शेती दुसरे कोणास लागवण करा, घरीं वाहा माझी हरकत नाहीं. जर तुह्मी लागवण न केली अगर घरीं न वाहिली तर शेतें पडित होतील त्याजबद्दल मालकीचे रकमेचा मी जबाबदार होणार नाहीं ही नोटीस लिहून दिली. तारीख २७।६।०४ इसवी०

सही
शेख चांद वल्लद शेख सरवर
मुसलमान राहणार उमरी
याची निशाणी

---

## नोटीस

रा. रा. खंडू वल्लद कृष्णा माळी मुकाम नांदुरा खुर्द यांसः—

खालीं सही करणार याजकडून कळविण्यांत येते कीं तुह्मी आपला मुलगा सोनाजी याज बद्दल आह्मास खात्री देऊन व रीती प्रमाणें नुकसानी झाल्यास भरून देण्याचे कबूल करून सोनाजी यांस दरमहा रुपये ४ प्रमाणें आमचे दुकानीं नौकर ठेविलें व व रुपये १० अगाऊ घेऊन गेले व आणखी जे पगाराचे रुपये होतील ते आह्मांस देणें अशी मला ताकीद दिली होती. मी आपली गोष्ट मान्य करून तुमचा पुत्र सोनाजी वल्लद खंडु माळी यांस मुक्काम आसलगांव येथें बासलेट दुकानी पाठविले. दीपवाळीस आह्मी त्यांस ऐन मध्यें कमी असलेले रुपये विचारले तेव्हां लोकांकडे उधारी आहे असे सांगितलें. आह्मी त्याचे सांगण्यावर भरंवसा ठेऊन पुन्हा माल पाठवित गेलो. चैत्र शुद्ध १ पदेस आमचे रुपये जास्त खटकल्या कारणानें आह्मी यास सर्व उधारी गोळा करण्या करितां मुद्दाम सुट्टी दिली. तो १५ दिवस तिकडे राहून त्यानें कांहींच रुपये आणलें नाहीं. नंतर सर्व उधारीचा आंकडा उतारण्यास तुह्या उभयतांस ताकीद दिली तरी आपण उभयतांनीं उधारीचा आंकडा दाखविला नाहीं. मग मी तुह्मास हिशोबा बद्दल ताकीद दिली असतां सोनाजी एकदम घरीं बसला आणखी तुह्मा दोघांस विचारलें तेव्हां तुमचा मुलगा ह्मणाला कीं वह्यांत पाहून घ्या, मी हिशोब समजावून देत नाहीं असें स्पष्ट ह्मटलें तरी आह्मी एक महिना तुमची वाट पहिली पण आपले मनांत पुरती बेमानी आहे असे आह्मी समजलो. आतां ही नोटीस पावतांच १५ दिवसाचे आंत आमचा हिशोब माल आला किती विकला किती व मालविक्रीचे पैसे आले किती व त्यापैकी आमचे जवळ पाठविले किती व यांत निपूर राहिल्यास ते रुपये कोणीकडे अटकले ते समजाऊन देणें. असें न केल्यास माझा सर्वस्वी विश्वासघात केल्याबद्दल मी तुमचे दोघावर फौजदारींत फिर्याद करीन व जो खर्च मला या बाबतीत लागेल तो व या नोटिशीचा खर्च व जितके रुपये तुह्मी फसविले ते सर्व मिळून दिवाणींत फिर्याद करून वसूल केले जातील हे खूप समजावे. कळावे. तारीख १ माहे जुलै सन १९०४ इसवी.

सही
चुन्नीलाल कस्तुरचंद साहू
दुकान नांदुरा कस्तुर
खुर्द.

---

## कापडाचें दुकान

( एक भाव व माफक दर )

आमच्या दुकानीं सर्व प्रकारचा रेशमी व सुती माल विक्रीस आहे. आमच्या कापडाचे भाव फारच थोडा नफा घेऊन आंकारलेले आहेत. बाहेर गांवीं व्हाल्युपेबलने माल पाठविण्याची सोय केली आहे. एक वेळ आमच्या दुकानचा माल पडताळून दुकानाच्या सचोटीचा अनुभव अवश्य घ्यावा.

शा० नागजी भाई रूपा

ठिकाणा—कॉटन मार्केट समोर
कच्ची बाजार, आकोला.

वऱ्हाडसमाचार

मिती जेष्ठ वद्य ६ शके १८२६

## हेअर साहेब यांचें प्रयाण

गेल्या शुक्रवारीं राजश्री हेअर साहेब यांनीं पेनशन घेतलें आणि त्याच दिवशीं सायंकाळच्या मेलनें ते मुंबईकडे रवाना झाले. साहेब बहादूर लौकरच विलायतेस जाणार असल्याचें वर्तमान सर्वत्र कळल्यापासून लोक त्यांचा शेवटचा निरोप घेण्यासाठीं मुद्दाम त्यांच्याकडे जात असत. त्यांच्या विनयामुळें व आग्रहामुळें त्यांची प्रेमानें भेट घेण्यापलीकडे लोकांस कोणताच सार्वजनिक गौरव करितां आला नाहीं. तरी साहेब बहादुर गाडींत बसल्यापासून वऱ्हाड हद्द संपे पर्यंत प्रत्येक स्टेशनावर त्यांच्या दर्शनाचा लाभ मिळावा ह्मणून पुष्कळच लहान थोर मंडळी मुद्दाम आली होती आणि त्यांनीं ठिकठिकाणीं पुष्पहार, अत्तर गुलाब व पानसुपारी साहेब बहादुरास अर्पण केली तेव्हां प्रेमभरानें राजश्री हेअर साहेब हे अत्यंत सद्गदित झाले आणि शेवटचा निरोप घेतांना साहेबांस आणि लोकांस फार वाईट वाटलें.

### संक्षिप्त चरित्र

राजश्री हेअर साहेब यांचें संपूर्ण नांव ह्मणजे राबर्ट डग्लस हेअर असें आहे. यांचा जन्म १८४८ सालीं २८ दिसेंबर रोजीं झाला. इंडियन सिव्हिल सरव्हिस परीक्षेंत हे पसार झाले होते. फक्त त्यांच्या परीक्षेच्या वर्षी जितक्या उमेदवारांची गरज होती त्यापक्षां दोन चार नंबरानेंच हे खालीं होते, आणि ह्मणूनच यास हलक्या दर्ज्याची चाकरी पतकरावी लागली. हे आपल्या वयाच्या २१ साव्या वर्षी एक्स्ट्रा असिस्टंट कमिशनर वर्ग ७ चे होऊन प्रथम बंगाल्यांत आले. लोहारदुग्ग आणि मानभूम या दोन ठिकाणीं १८७६ च्या आक्टोबर पर्यंत ते होते. मध्यतरी १८७४ च्या दुष्काळांत पुरलिया येथील दुष्काळाच्या बंदोबस्ताकडे त्यांची योजना मुद्दाम करण्यांत आली होती. त्यांनीं बंगाल्यांत आपली कामगिरी चांगली बजावली असें पाहून इंडिया सरकारानें त्यांस असिस्टंट कमिशनर वर्ग ३ चे नेमून त्यांस आमच्या या वऱ्हाडांत पाठविलें.

वऱ्हाडांत आल्या दिवसापासून यांची ख्याती पसरत चालली. हे मोठे मेहनती असून त्यांस कामाची मोठी हौस असे. मुलकी, दिवाणी, व फौजदारी या कामांत ते चांगले निष्णात झाले व त्यांच्या न्यायीपणाविषयीं लोकांमध्यें पूर्ण भरंवसा पटत चालला. रयतेला गोडी गुलाबीनें वागविण्याची हातोटी त्यांस फार चांगली साधली होती. त्यांचा लौकिक वाढत चालला आणि सुमारें १० वर्षांनीं ते डिपुटी कमिशनरीच्या हुद्याला येऊन पोचले. इतक्या काळांत उमरावती, आकोला, वाशिम, बडनेरा, यवतमाळ, खामगांव, व बुलढाणा, इत्यादि मुख्य मुख्य गांवीं त्यांच्या बदल्या होत गेल्या आणि तसतसा त्यांचा परिचय सर्व प्रांतांतील लोकांशीं चांगला जुळून आला. हे लिहिण्याच्या कामांत फार फर्डे आहेत. इंग्रजी भाषा त्यांची मातृभाषाच खरी पण यांचे रिपोर्ट व इतर सरकारी लेख चांगले वाचण्या सारखे असत. मराठी व हिंदुस्थानी भाषा यांस चांगल्या समजतात. याच्या लिहिण्यामध्यें कांहीं विशेष मोहक गुण आहे असें दिसेल. आणि त्यांचा स्वभाव मोठा विक्षिप्तक असल्यामुळें त्यांचे साधारण हुकूम देखील मार्मिक असत.

राजश्री हेअर साहेब यांची विलक्षण कर्तबगारी पाहून त्यांस हैदराबाद संस्थानांत १९ एप्रिल १८८७ पासून मुद्दाम बोलावून नेलें. हैदराबादेचे नबाब विकार उल्‌-उमराव यांच्या संस्थानाची व्यवस्था त्यांच्याकडे होती. तेथें त्यांनीं जमाबंदीची पद्धति उत्कृष्ट घालून दिली. हैदराबादेकडे त्यांचा लौकिक चांगला वाढला पण पुढें १८८९ च्या जुलै महिन्यांत डिपुटी कमिशनरीची जागा त्यांस मिळूं लागली तेव्हां निजाम सरकार त्यांस वऱ्हाडांतील पगारापेक्षां दुप्पट पगार देण्यास तयार होते तथापि राजश्री हेअर साहेब पुनः वऱ्हाडांतच परत आले.

### अधिकार संपदा

डिपुटी कमिशनर वर्ग ३ चे झाल्यापासून आकोला, यवतमाळ व वाशीम या तीन जिल्ह्यांत राजश्री हेअर साहेब यांचीं सात वर्षें गेलीं. आणि १८९६ च्या दिसेंबरांत ते १ ल्या वर्गाचे डिपुटी कमिशनर आकोल्यासच झाले त्या पुढें १८९७ च्या अखेरीला ते इनस्पेक्टर जनरल आफ् पोलिस, जेल्स. इत्यादि हुद्यांचें काम करूं लागले. मध्यंतरीं १८९८ च्या जुलै महिन्यापासून पांच महिने पर्यंत हे कमिशनरही होते. पुनः डिपुटी कमिशनर कधीं इन्स्पेक्टर जनरल कधीं कामेशनर असे अधिकार चालवितां चालवितां ते १९०२ च्या जानेवारींत जुडिशिअल कमिशनर झाले. या हायकोर्टाच्या श्रेष्ट स्थानीं सुमारें १। वर्ष ते होते. आणि शेवटीं १९०३ च्या एप्रिल पासून त्यांस कमिशनरी देण्यांत आली आणि तेथेंच त्यांची कायमचीहि नेमणूक झाली आणि याच श्रेष्ठ हुद्यावर त्यांनीं पेनशन घेतलें.

### सद्गुण

दर प्रमाणें त्यांच्या चाकरीचा संक्षिप्त इतिहास झाला. एकंदरीनें त्यांची पुरीं ३९ वर्षें चाकरी झाली. आणि त्या पैकीं सुमारें २७ वर्षें यांची या वऱ्हाड प्रांतांत गेलीं. त्यांचा विशेष लौकिक मुलकी कामा संबंधानें असे. मुलकी कारभारांत त्यांचा हात धरणार दुसरा अधिकारी क्वचितच आढळेल. यांच्या अमलाखालीं अधिकाराची महती राहून लोक सुखी व राजीखुषी असत. यांच्यापाशीं दयेचें शस्त्रही मोठें होतें, आणि ते आपला लिहपणा कायम ठेवून अंतःकरणाचें दयाळुत्व सदां जागृत ठेवीत असत. यांच्या कारकीर्दींत पुष्कळशा सार्वजनिक संस्था स्थापित झाल्या आणि त्या आज चांगल्या भरभराटींत आहेत. म्युनिसिपालिटी, जिल्हा-बोर्ड, लायब्ररी इत्यादि लोकसंस्था उन्नत स्थितीला आणण्या विषयीं त्यांचा नेहमीं प्रयत्न असे आणि अशा कार्याकडे ते आपल्या अधिकाराचें चांगलें पाठबळ देत असत. आकोल्यास हल्लीं जे पाण्याचे नळ आणिले आहेत हे यांच्याच मेहनतीचें व श्रमाचें फळ होय. गरीब लोकांचे हे मोठे कनवाळू होते. शेगांवास यांनीं गरीब लोकांच्या राहण्यासाठीं मुद्दाम सरकारांतून जागा देवविली आहे. ती वस्ती 'हेअर फाईल' या नांवानें प्रसिद्ध आहे. गेल्या दुष्काळांत यांनीं इलिचपूर जिल्ह्यांतील गरीब लोकांचा विशेष परामर्ष घेतल्याबद्दल तिकडील लोक अझूनहि साहेबांचा धन्यवाद गात असतात.

साहेब बहादुरांचें खानगी वर्तन मोठें चोख असे. यांच्या तोंडून क्वचितच कटु शब्द बाहेर पडत असे. ते आपण होऊन दुसऱ्याचें मन कधीं दुखवीत नसत. यांना घोड्याच्या शर्यतीचा मोठा नाद असे आणि हे चांगले पटाईत घोडेस्वार आहेत. हे अद्याप पावेतों अविवाहितच आहेत. आणि त्यामुळें त्यांच्या स्वाभावांत फारसा मोकळेपणा नाहीं आणि ते समाजांतही मिळून मिसळून असल्याचें फारसें आढळत नसे. तरी ते खानगी मुलाखतींत बोलून चालून बरे असत. यांच्या वर्तनांत शिष्टाचार, संभावितपणा व विशेष आदबी दिसून येत असे. हे आपल्या गुणांनीं फार लोकप्रिय झाले होते. यांचे स्मारक ह्मणून वऱ्हाडांतील जमेदार मंडळी 'हेअर मेमोरियल' करणार होती, परंतु साहेब बहादुरांना ही गोष्ट आवडली नाहीं. पानसुपाऱ्या, संभाषणें इत्यादि सांप्रदायिक गोष्टींनीं आपला गौरव लोकांनीं करूं नये ह्मणून त्यांनीं आग्रहानें लोकांस व अधिकारी वर्गास विनंती केली होती. असा त्यांचा विनयशील स्वभाव असे.

### शेवटचा निरोप

राजश्री हेअर साहेब हे आपल्या उद्योगानें, विद्वत्तेनें, आणि चातुर्यानें सरकारी चाकरींत अगदीं श्रेष्ठ पदवीला पोचले आणि त्यांच्या गुणांना अनुरूप असा बहुमानाचा सी. आय. ई. हा किताब त्यांस या वर्षारंभींच देण्यांत आला. येणें प्रमाणें राजश्री हेअर साहेब यांच्या आयुष्यांतील मुख्य भागाची कथा आहे. हें चरित्र पुष्कळ रीतीनें चांगलें अनुकरणीय आहे. अशा या उत्कृष्ट कालक्षेपा नंतर ते आतां आपला पेनशनीचा उरलेला काल सुखानें व आनंदानें घालविण्यासाठीं विलायतेस स्वगृहीं जात आहेत. तेव्हां 'या प्रांताची चांगली आठवण राहूं द्या' असा निरोप देतांना आह्मी परमेश्वराजवळ प्रार्थना करितो कीं, राजश्री हेअर साहेब यांस दीर्घकाल आरोग्य आणि सुखसंपदा लाभोत !

—:०:—

### सेशन खटले

(आकोल्याची कचेरी)

सावळी तालुका जळगांव येथील नाम्या वल्लद गोविंदा धनगर वय २६ याचा खून तारीख १ नोवबर १९०३ रोजीं केल्या बद्दलचा आरोप पंढरी वल्लद रावजी आणि गणपत वल्लद वहाघन या दोघांवर होता आणि त्यांचा तिसरा साथीदार मुनीर वल्लद शेखइमाम वय १८ यास माफी दिली होती व हा सरकारी तर्फेचा साक्षीदार करण्यांत आला होता. त्या रात्रीं मयत हा देवळांत भजन करण्यास गेला होता भजन संपल्यावर घरीं परत आला. नंतर तो, दोघे आरोपी व मुनीर असे चौघेजण गवत कापण्यासाठीं ह्मणून मध्यरात्रींच्या सुमाराला रानांत गेले. मयताची आई त्याला जाऊं नको असें सांगत असतांना देखील तो विळा घेऊन चालता झाला. त्या रात्रीं कार्तीक शुद्ध ११ असून चांदणें चांगलें पडलें होतें. नाम्याला त्याच्या सोबत्यांनीं धरून बोलावून नेलें. नदीच्या पलीकडील शेतांत चौघेही गवत कापूं लागले. नाम्या जवळच पंढरी गवत कापीत होता आणि जरा थोड्याशा अंतरावर गणपत व मुनीर हे होते. इतक्यांत पंढरीनें नाम्याच्या गळ्यांत हातांतील दोरी टाकली, त्यानें त्याचा गळा दाबला आणि छातीवर गोड्यासुद्धां बसला आणि विळ्यानें त्याच्या मानेवर घाव केले. अशा भयंकर रितीनें नाम्याचा तत्काळ प्राण गेला. गणपत व मुनीर हे घाबरले. दोघेही १८।२० वर्षांचे होते व पंढरीपुढें त्यांचें कांहीं चालेना. पंढरीनें नाम्याचा चांदीचा कडदोरा, हातांतलें कडें व कानांतली सोन्याची बाळी काढून घेतली. गणपत व मुनीर हे तेथून पळ काढणार तोंच पंढरीनें त्यांचाच जीव घेण्याची धमकी दिली. पंढरीनें नाम्याचें प्रेत नदींत आणून टाकलें तेव्हां गणपती व मुनीर हे त्याचा विळा, दोरी व जोडा घेऊन बरोबरच चालले. पुढें दुसरेच दिवशीं नाम्याचें प्रेत सांपडलें. गणपत व मुनीर यांनीं माजिस्ट्रेटापुढें झालेली हकीकत लागलीच कबूल केली पण इतक्यांत पंढरी फरारी झाला. चार महिने पर्यंत त्याचा पत्ता नव्हता. पंढरी सांपडल्यावरोबर त्यानें पुरलेलें कडें व करदोडा काढून दिला आणि १ ले वर्ग माजिस्ट्रेटापुढें चौकशीच्या वेळीं पंढ्यानें गुन्हा कबूल केला पण त्या कबूलीतही त्यानें गणपत्यानें तोंड दाबलें आणि मुनीरनें गळा दाबला व मी छातीवर बसलों असें सांगितलें. सेशनांत मुनीर हा सरकार तर्फेचाच साक्षीदार होता, गणपतीला सोडून देण्यांत आलें आणि पंढऱ्याला देहान्त शिक्षा सांगण्यांत आली. एकंदर पुराव्या वरून असा कल झाला कीं पंढरीच्या मनांतून गवत कापण्याला निघण्यापूर्वीच खून करण्याचा विचार पक्का ठरलेला असावा. गवताच्या निमित्तानें चौघे जण गेले आणि पंढरीनें थोड्या क्रूरतेनें स्वल्प किंमतीच्या दागिन्यासाठीं खून केला. ! नाम्या गणपती वांचून रात्रीं रानांत येण्यास राजी नव्हता आणि ह्मणूनच गवताचें निमित्त योजावें लागलें. कदाचित् असाही संभव आहे कीं, गवत कापीत असतां पंढरीच्या डोक्यांत खून करण्याची लहर आली आणि ती त्यानें भयंकर रितीनें अंमलांत आणिली. थोड्या किंमतीच्या दागिन्यासाठीं खून झाला ही गोष्ट अत्यंत असमाधानकारक होय.

येथे मिळण्याचीं ठिकाणें:— मलकापुर येथें चनसीलाल जाजुसा खत्री. खामगांवी चनसीलाल अगरवाले ठि. जलालपुरा कापडाचे दुकानी. व आमचे नांवच्या पाट्या ज्या ठिकाणीं लागतील तेथें मिळेल.

श्री गणेशायनमः




घरचा वैद्य.

# श्री सद्गुरु प्रासादिक औषधालय.

# केशरादी अर्क.

सिहासारखा रोगांना हटविणारा पंधरा मिनिटांत फायदा दाखविणारा. सदोदीत विशांत बाळगण्या जोगा. प्रसंगी शंभर रुपये खर्च केल्यानेंही उपयोग होणार नाहीं. या करितां सदरी अर्क जवळ असल्यानीं उपयोग होईल, एकवेळ अवश्य अनुभव घेऊन पहा. अशी आमचे देशबंधुस प्रार्थना आहे. सदर्हू अर्काबद्दल पुष्कळ लोकांकडून सरटीफिकिटें मिळालेलीं आहेत. सदरी सरटिफिकिटें स्थळसंकोचास्तव येथें दिलीं नाहींत. सदरी अर्कानें रोग दूर होतात ते खालीं लिहिले प्रमाणें:—

१ पोटशुळ २ झोंब. ३ पोटदुखी. ४ बरगडींतील शुळ व चमक. ५ दाढेची ठणक व कीड. ६ कानशुळ कानांतून पु वाहणें. ७ खोकला. ८ श्वास ९ डोकें दुखणें. १० गळयातील व छातीतील जळजळ. ११ अक्षेप वायु ( ह्मणजे मूर्छा ) शंभर हाका मारल्यानेंही जबाब न देणें थंडगार झाल्यास गरमी येऊन पंधरा मिनिटांत जबाब देईल. १२ विषूचिका ह्मणजे महामारी (सात दिवस औषध सेवन केल्यानी गुण) १३ वात संबंधी हर ठिकाणी चमक निघणें. १४ पोरांचे पोटांतील कृमी. १५ आपवाताचें स्वरूप जठराग्नी मंदावणें सर्व शरीरास पीडा. कंबर दुखणे व सांधे दुखणे. १६ अधपान वायुचे लक्षण पोटात गुबारा व गुदाचे वायूं बंद १७ सन्निपात अगर वात झाल्यास असाध्य आहे किंवा साध्य आहे ही परिक्षा पंधरा मिनिटांत, फायदा वर लिहिल्या प्रमाणें. १८ हृदय रोग लक्षण छातींत नानाप्रकारच्या व्यथा १९ विर्यवृद्धी करणारी व शुक्र दोष. २० वांती बंद करणारें. अग्निदिपक ह्मणजे भुक लागणारे. वातसंबंधी व कफसंबंधी रोगावर अनुपान बदलुन घेतले असता गुण देणारे. माहमारीचा व प्लेगचा रोग गांवांत असतांना दररोज सकाळीं सदरी अर्काचे दोन थेंब घेतगेल्यानीं रोग होण्याचा मुळीच भीति नाहीं. मात्र पीत्तावर चालणार नाहीं इकडे लक्ष देणे. माहामारी व प्लेगाचे कारण हवेच्या व पाण्याच्या संबंधानें काळे तोंडाचे जंतु व वात पोटांत उत्पन्न होऊन वांती ढाळ व वातासंबंधी गांठ उत्पन्न होऊन प्राणनाश होतात तर जंतु व वात नाश करणारा हा पहिल्या नंबरचा अर्क आहे कारण याच्यांत भीमसेनी कापुर व केशर व अनेक औषधें पडून अर्क तयार केला आहे या रोगात कापुराचा फार उपयोग होतो हे प्रसिध्द आहे.

या औषधानें स्वप्नांतील धातु वाहणें बंद होते.

पंधरा मिनिटांत गुण दाखविणारे रोगावर जर गुण न आला तर खर्च झालेली औषधीचेही दाम न घेता तुमची साबीत किंमत औषधे परत केल्यास वापस करुं हेच आमचे सर्टिफिकीट आहे. एक तोळ्याचे बाटलीची किंमत एक रुपया एकदम बारा बाटल्या घेणारास एक बाटली फुकट देऊं. व्ही. पी. ने मागणी करावी. बाटलीपैकी निमे औषधी खर्च झाली व गुण न आला तर निमे राहिलेली औषधी आमचेकडे वापस करून आपली पूर्ण किंमत घेणें. अनुपान खर्डाबाटली सोबत मिळेल. सदर अर्क खरीदी करणारास आमचेकडुन पावती मिळेल. किंमत तो. १ चे. बाटलीस १ रु.

## नयनामृत सुरमा.

या सुरम्यानी डोळयाचें सर्व विकार नाहिसे होऊन डोळे साफ रहतील. जसें कपड्याला साबण त्या प्रमाणें डोळयाला सदर्हू सुरमा आहे फार दिवस उपयोग केल्यानीं चषम्याची सुद्धा जरूर नाहीं. वाचन करणार. बारीक सुइचे काम करणार, अग्निजवळचे काम करणारे, कारकून वगैरे लोकांनीं जरूर संग्रहीं ठेवावा. किंमत नंबर १ दरतोळ्यास ४ रुपये नंबर २ दर तोळयास २ रु० नंबर ३ दर तोळ्यास आठ आणे.

### केश कल्प.

सफेद केश काळेभोर पुर्वी प्रमाणें होणार त्रास नाहीं लावून लागलीच बाहेर फिरावयास जाणें शिशी एकची कि. दहा आणे. सवात्तिक असून कोणत्याही तऱ्हेची वाण नाहीं सुकल्यावर रंग येऊं लागतो.

### गजकरण, नायटे, खरुज. खवडे.

याजवर मलमाची डबी किंमत एक डबीस चार आणे. व ज्यास्त घेणारास कमीशन मिळेल.

### वज्रदंती.

दाताची कीड, रक्त, दुर्गंधी दांत हालणें, वगैरे दांतासंबंधी रोग याजवर मंजन केल्यानीं सर्व विकार नाहींसे होउन दांत साफ रहातात व दांतांची फणी हालत असल्यास सक्त होऊन बळकट होते. एक डबीची किंमत सहा आणे.

### अश्वचोळी मात्रा.

ही मात्रा नवद रोगावर चालणारी आहे. वातावर फारच उपयोगी अनुपान वेगळे वेगळे आहे. दर तोळ्यास किंमत तीन ३ रुपये.

### अग्निकुमार.

अग्निमांद्य व शुळ याजवर दर तोळयास १ रुपया.

### बंगभस्म.

प्रमेह, खरपडणे, व पौष्टीक, छत्तीस रोगांवर चालणारे. अनुपान वेगळे वेगळे किंमत दर तोळयास २ रुपये.

### सुदर्शन चूर्ण.

जीर्णज्वर व ज्वर याजवर या विषयीं दृष्टांत जसें दानवांचा नाश करणारे सुदर्शन चक्र आहे तसें ज्वरांचा नाश करणारे हें सुदर्शन चूर्ण आहे. किं. दर तोळ्यास दोन आणें.

या शिवाय वांझस्त्रिची परिक्षा तीन प्रकारची व सात रोगापासून स्त्रियांस गर्भ धारण होत नाहीं. तरी सात रोगांची परिक्षा करून औषध देण्यांत येईल. याची जाहिरात वेगळी आहे भेटिअंती खुलासा होईल. व रोग बहूत प्रकारचे आहेत तरी बुद्धीपुरस्सर रोगांवर इलाज करितां येईल सदर्हू आह्मी देशी औषधाचा कारखाना उभारला आहे. तरी आमचे देशबांधव उदार आश्रय देऊन हस्ते परहस्ते उत्तेजन देऊन अनुभवानें खात्री करून घेतील तर मजला ही या कामीं मेहनत घेण्यास जास्त उमेद येईल. रोग्याचे घरीं ( गांवांतील गांवात ) जाण्याची फी एक रुपया. परगांवी जाण्याची फी २ रुपये रोगी घरीं चालून आल्यास फी नाहीं. कमीशनाबद्दल पत्रानें ठराव करूं

विनंती:– जाहीरात वाचून फेकूं नये कारण वर गणपतीची मूर्ति आहे, करितां दर्शनीं ठेवणें.

आमचा पत्ता:— रा

आकाला — इकडे लक्ष द्या.

# वतननदार



किंमत कमी केली.

साधुवृंदाचा ग्रुप किं ०४ शिवाय श्रीमत् शंकराचार्यांचा फोटो बक्षीस. वतनदार प्रेसांत विकत मिळेल

## — छापखान्याचें

## १९०५ सालचें सचित्र क्यालेंडर.

**फुकट**— ज्या गिऱ्हाईकांनीं १९०४ सालांत १० रुपयांवर काम छापण्यांस दिलें त्यांना आमचे खर्चानें फुकट पाटविलें जाईल.

इतरांस पाहिजे असल्यास ०२ पाठवावें.

### वर्तमानसार.

जर्मनीची राजधानी बर्लीन येथें आबझर्व्हेटरी जोडून मोठमोठी ३०० घड्याळें विजेच्या साह्यानें चालणारीं तयार केलीं आहेत.

तेलगु भाषेंत 'सावित्री' व 'हिंदु सुंदरी' या नांवाची दोन मासिक पुस्तकें केवळ स्त्रियांनी चालविलेलीं आहे.

गेल्या तारीख १२ जुलै रोजी लंडन येथें हिंदुस्थानांतील एका मोठ्या राजाचें अत्यंत मौल्यवान जवाहीर विकण्यांत आले

तारीख २ आगष्ट रोजीं सिंधू नदीस जंगी पूर आल्यामुळें अपर सिंध मधील काशमोर बंड नांवाचें धरण फुटून गेलें.

समाजाला व राज्यकर्त्यांला अशी स्थिती फारच धोक्याची !

## दुसरा खून

हिवरें खुर्द ता० मेहकर येथील मंजी मर्द कुण्बा ही तारीख १०-१२-०४ रोजीं पहाटेस आपल्या घराजवळील एका गर्धीत बाळंत झाली, व तिला जो मुलगा झाला होता तो मेलेला दृष्टीस पडला. त्यावेळीं त्याच्या गळ्या भोंवतीं नाळ गुंडाळलेला दिसला. सदर्हू मुलगा मंजी इजला आपल्या नवऱ्यापासून झाला नसल्याचें तिनें कबूल केलें, ह्यावरून सदर्हू मुलगा जन्मल्या नंतर मंजी हिनें स्वतःचें जारकर्म लपविण्याचे हेतूनें त्यास ठार मारलें असावें अशा बद्दल मंजीवर आरोप होता. ह्या मोकदम्यांत महत्वाचे साक्षीदार मंजीची शेजारीण व नातेवाईक यमनी व मेहेकर येथील हॉस्पिटल असिस्टंट मि. अजमतुल्ला हे होत. मंजी बाळंत झाल्या नंतर तिनें आपली शेजारीण व नातेवाईक यमनी हिला बोलाविलें व तिला पाटी आणण्यास सांगितलें यमनीनें आणून दिलेल्या पाटींत मंजी हिनें मूल ठेवून तें बरांत नेलें असें यमनीनें कळविलें. परंतु यमनी मंजी जवळ होती तोंपर्यंत मूल रडल्याचें तिनें ऐकलें नाहीं किंवा त्यावेळीं अंधार असल्यामुळें तिनें त्याचे हात पाय हलल्याचेंहि पाहिलें नाहीं, तथापि मुलाचा नाळ न कापतां, जार गळ्या भोंवतीं लपेटलेला असून तसाच पाटींत ठेवलेला होता असें तिनें सांगितलें परंतु पंचनाम्याचे वेळीं पंच व हेड कॉन्स्टेबल शेख कालू ह्यांच्या समक्ष यमनीची जबानी झाली त्या वेळीं गळ्या भोंवतीं असलेला नाळ यमनीनें पाहिल्यावर जन्मते वेळीं मुलाच्या गळ्याभोंवतीं असणाऱ्या वारा प्रमाणें हा वार असल्याचें सांगितल्या बद्दल शेख कालू ह्यानें आपल्या जबानींत सांगितल्यावरून यमनीचें ह्मणणें खोटें ठरलें. डॉकटर ह्यांची जबानी झाली त्यांत मयताच्या डाव्या मानेवर बोटाच्या दाबाची खूण व माने भोंवतीं वाराचे दोन वेढे पाहिल्याचें त्यांनीं सांगितलें; व त्यांच्या मतें मयत मूल मेलें लें न निपजतां जन्मास येऊन नंतर मेलें असावें; व सदर्हु मुलाचें मरण मुलाच्या मानेवर असलेल्या बोटाच्या दाबानें व वाराच्या फासानें श्वासोच्छ्वास बंद होण्यानें झालें असावें. डॉकटर साहेबांनीं जें मत प्रदर्शित केलें त्याच्या उलट वस्तुस्थिती विद्वान डॉकटरांच्या मतानें, शक्य असल्यामुळ, डॉक्टर साहेब ह्यांच्या मतास विशेष वजन देतां येत नाहीं; ह्यामुळें व मूल जन्मल्या नंतर जिवंत असल्या बद्दल स्वतंत्र पुरावा नसल्यामुळें सदर्हु मुलास मंजी हिनें मारलें असावें असें मानण्यास कारण नाहीं अशा आशयाचें मत प्रदर्शित करून सेशन कोर्टानें सदर्हु मंजीस निर्दोषी ठरवून सोडून दिलें.

## तिसरा खून

हा खटला मंगरूळपीर तालुक्यांतील हाल्डा येथील लुंगड्या वल्लद टोला बंजारी याचा २९ मार्च १९०४ रोजीं झालेल्या खुना संबंधाचा होता. लुंगड्या हा त्याच मंगळवारीं सायंकाळीं नाहींसा झाला. पुढें तपास करितां करितां तीन दिवसांनीं एका शेतामध्यें एका माणसाचें धड सांपडलें. त्याला शीर नव्हतें व उजवा हात नव्हता. लुंगड्याच्या बापानें तें धड आपल्या मुलाचें आहे असें ओळखलें, त्या जागेच्या आसपास त्याची बंडी रक्तानें भरलेली सांपडली. त्याचें पागोटें, शेला व धोतर हीं एका गाठोड्यांत ठेविलेलीं आढळलीं आणि या सर्व जिनसा मुलाच्या आईबापांनीं पक्क्या ओळखल्या. पण खून करणाऱ्याचा पत्ता आणखी चार दिवस पर्यंत लागला नाहीं. पुढें बंजाऱ्यांची पंचाईत पोलिसांनीं भरविली तेव्हां चंद्या नांवाच्या बंजाऱ्यानें कबूल केलें कीं माझी भावजय मोती वय १६ इजविषयीं मला शंका आली होती; दोन महिन्यापासून मयत लुंगड्याची व तिची खराब दोस्ती होती आणि खुनाच्याच दिवशीं दिवसां तीन चार वाजतां तीं दोघेही एका वडाच्या झाडाखालीं कुकर्म करीत होती तेव्हां तें सर्व दुरून माझ्या दृष्टीस पडलें; मला संताप आला, मी महादू धनगराला सांगितलें कीं या लुंगड्याला साकर डोहाच्या भट्टीवर दारू पिण्यासाठीं घेऊन चल, त्या संकेताप्रमाणें ते दोघेही पुढें चालले, सायंकाळचा समय टळला होता थोड्याशा अंतरावर रस्त्याच्या बाजूला दोघेही शौचास बसले. ही संधी पाहून मी पाठीमागून लुंगड्याच्या डोक्यांत कुऱ्हाड घातली आणि त्याला तेथें च ठार केलें. पुढें त्याला साकर डोहाच्या नदींत महाद्याच्या मदतीनें उचलून नेलें, तेथें तें प्रेत नागवें केलें, शिर कापून पुरून टाकलें, व दुसरे दिवशीं पुनः सकाळीं हातही कापून पुरले. महाद्यानें जवळ जवळ असाच कबूली जबाब दिला. मोतीनें ती व्यभिचाराची गोष्ट कोर्टासमोर कबूल केली. महाद्याला माफी देऊन सरकार तर्फेचा साक्षीदार बनविला. प्रथम चंद्या खुनाविषयीं कबूल होता तरी त्यानें सांगितल्या प्रमाणें पुरलेल्या शिराचा किंवा हाताचा पत्ता लागला नाहीं. हा प्रत्यंतरी पुरावा न मिळाल्यामुळें, इतर पुराव्यांतील व्यंग्यामुळें आणि पोलिसांच्या अव्यवस्थित चौकशी मुळें सेशन जज्जांनीं आरोपीला सोडून दिलें. या कामांत पोलिसांची चौकशी फार कच्ची दिसली किंवा चंद्यानें दिलेला कबूली जबाब ह्मणजे जबरदस्तीचा रामराम असावा असा साधारणपणें कोर्टाचा अभिप्राय पडला.

---

## शेतीचा तावा

(त्या पायीं खून)

दरसाल मृगनक्षत्राच्या सुमाराला शेतीच्या ताब्यासंबंधाचे तंटेबखेडे पुष्कळ होतात. जेथें शेती विषयीं तंटा असतो तेथें उभय पक्षांचा असा विचार असतो कीं आपला तावा शेतीवर व्हावा आणि प्रतिपक्षानें दिवाणी कोर्टाचा रस्ता धरावा. दिवाणीचें काम मोठ्या खर्चाचें असतें, मोठ्या दिरंगाईचें असतें आणि शेताच्या पिकाचा पुरावा नसल्यामुळें दिवाणीचा निकाल होईपर्यंत शेताचें पीक विरुद्ध पक्षकाराला सुखानें खावयास सांपडतें. अशा कारणामुळें जो तो दिवाणींत दावा करण्याला भितो, आणि प्रत्येकाला वाटतें कीं ही दिवाणीचो गदा उलट पक्षावर पडावी ह्मणजे ठीक होईल. शेतीचा तावा सर करण्याविषयीं उभय पक्षकारांचा मनापासून संकल्प असतो आणि तो संकल्प पुरा करण्यासाठीं दांडगाई, जबरदस्ती आणि बंडाळी करावी लागली तरी हरकत नाहीं असें वाटूं लागतें. अशा कामाला दांडगे तंटेबाज लोक लागतात आणि पैशाच्या आशेनें असे लोक ठिकठिकाणीं पुष्कळसे मिळूं शकतात. उभय बाजूची मंडळी या मार्गाचा स्वीकार करितात. चांगले पैसे खर्चतात आणि बेकाळनाच्या, दांडग्या व धटिंगण अशा मजुरांच्या शेतांत लढाया सुरूं होतात. ज्याचा पक्ष विजयी त्याचा शेतीवर कायदेशीर तावा होतो आणि उलट पक्षाच्या माणसाला दुर्मुख होऊन दिवाणी कोर्टांत वाद मांडावा लागतो.

अलिकडे शेताच्या ताब्याचे दंगेधोपे विशेष होऊं लागले आहेत. कित्येक बिनरोजगारी उडाणटप्पू मंडळीच्या टोळ्याच असतात आणि त्यांचा धंदा ह्मणजे एवढाच कीं त्यांचें साह्य मागणाऱ्या लोकांस तंट्यांतील शेतीचा तावा मिळवून द्यावा. पुष्कळशा मारामाऱ्याचे, डोके फोडीचे आणि जुलूम जबरदस्तीचे प्रकार या पेरणीच्या वेळीं दृष्टीस पडतात. या दांडगाईच्या प्रकारांचा हंगामच या पेरणीच्या वेळीं असतो. थोड्या दिवसापूर्वीं या तालुक्यांतील निंभोरे येथें एका आकोल्याच्या मुसलमानाचा खूनही झाला. येथून वसि पंचवीस मंडळी रोजंदारीनें शेताचा तावा करण्याला गेली होती आणि त्यांच्याच पैकीं एकाचा खून झाला असें ह्मणतात. कित्येक जखमी व घायाळही झाले आहेत. आकोटास, बाळापुरास असे दंगे धोपे झाल्या विषयीं बातम्या ऐकूं येतात. एकंदरीनें शेतीचा तावा करण्याविषयीं जे नानाविध दांडगाईचे प्रकार होत असतात ते आतां कळसाला पोचले आहेत असें ह्मटलें असतां चालेल. या संबंधानें जिल्हा माजिस्ट्रेट व पोलिस सुपरिंटेंडेंट यांनीं फार सक्तीचे नियम अमलांत आणिले पाहिजेत. जेथें शेतीविषयीं तंटा आहे तेथें दोन्हीही बाजूंच्या लोकांनीं सरकारी हुकुमा शिवाय शेता मध्यें पांच दहा माणसापेक्षां अधिक लोक नेऊं नयेत असा कांहीं तरी धरबंध पाहिजे. शेती संबंधाचे असे दंगे एकदम बंद करण्यांत आले पाहिजेत. शेतीच्या ताब्याविषयीं थोडा जरी वाद असला तरी योग्य अंमलदाराच्या परवानगी शिवाय कोणी शेती पेरूं नये अशा प्रकारचा कांहीं नियम अवश्य पाहिजे. स्थावराच्या ताब्याविषयीं फौजदारी कायद्यांत जो प्रतिबंधक उपाय घालून दिलेला आहे त्याचेंही अवलंबन विशेष झालें पाहिजे असें आमचें मत आहे. या संबंधानें आमचे जिल्हा माजिस्ट्रेट मेजर मॉडवी साहेब विशेष बारकाईची चौकशी करितील अशी आह्मांस बळकट आशा आहे.

---

## वऱ्हाडवृत्त

हवामान— शनिवारच्या सायंकाळा पासून पावसानें अगदीं बहार करून सोडली. पाऊस अगदीं ऐन वेळेवर व मोठा जोरदार असा झाला. रोगराई कांहीं नाहीं.

गेल्या शुक्रवारा पासून लेफटेनंट-कर्नल वारन हेस्टिंग्स हे कमिशनरीचें काम पाहूं लागले.

रा. रा. मीडो साहेब सेशन जज्ज हे गेल्या गुरुवारीं आपलें येथील काम पुरें करून उमरावतीस गेले.

रा० रा० शेख महमद इस्मायल एक्स्ट्रा असिस्टंट कमिशनर हे वाशिमाहून आकोल्यास आले आणि त्यांनीं येथील सिव्हिल जज्जाचे कोर्टाचा चार्ज गेल्या शनिवारीं घेतला.

आणि रा० रा० गोपाळ वामन बापट बी. ए. एल एल. बी. यांस स्पेशल कामावर नेमण्यांत आलें. यांच्या पुढें येथील तुरुंगांतील आगी संबंधाचा खटला सुरूं आहे. या तुरुंग प्रकरणांतलि खटले सर्वच यांच्यापुढें चालावयाचे आहेत आणि याच स्वतंत्र कामावर यांची नेमणूक मुद्दाम करण्यांत आली आहे.

तारीख २८ जून पासून नागपुरास भूमितीवर व्याख्यानें देण्यांत येत आहेत. उद्यांचें व्याख्यान शेवटलें होय. जबलपुरच्या नार्मल स्कूलचे प्रोफेसर हे व्याख्याते आहेत. या व्याख्याना निमित्त वऱ्हाडांतील सर्व आंग्लोव्हर्नाक्युलर शाळांतून एक एक शिक्षक मुद्दाम धाडण्यांत आलेला आहे. ही टूम नवीनच होय!

---

## आकोला बाजारभाव

| | | | |
|---|---|---|---|
| हुंडी दर्शनी | | | १००।- |
| सोनें २४।= | | चांदी ७१। | |
| जवारी ९२-९९ | | जवस ७७॥ | |
| गहू काठे ८० | | बनशी ८९ | |
| सरकी | | | ९ |
| मीठ | | | ३॥ रु. मण |
| चणे | | | २॥ रु. मण |
| तूप | | | १० रु. मण |
| तेल | | | ४। रु. मण. |
| रुई जीन | | | ७८ |

---

## वर्तमानसार

गेल्या वाढदिवसाच्या उत्सवा निमित्त ज्या पदव्या देण्यांत आल्या त्यामध्यें एकही पदवी आमच्या प्रांताच्या वांटणीला आली नाहीं त्यामुळें पुष्कळशा उमेदवारांचा हिरमोड झाला. नामदार फेरोजशहा मेथा यांस 'सर' हा किताब मिळाला. हा मुंबई इलाख्याचाच काय पण सर्व देशाचा बहुमान होय. अशा सत्पात्रानेंच त्या पदवीला खरी शोभा येते. सर मेथा यांच्या सारखे निस्सीम देशभक्त, रसाळ वक्ते, आणि शांत व विचारी मुत्सद्दी फार विरळा !

जपानचा विजय—जपानी लष्करानें कैपिंग घेतलें आणि त्या बाजूनें जपानची इतकी तटबंदी बसली आहे कीं रशियाला माघेंच सरकावें लागत आहे. पोर्टआर्थरच्या आग्नेय बाजूचे किल्ले जपाननें सर केले आहेत. रशियाला सर्वत्र पळ काढावा लागत आहे. रुसो-जपान लढाई हें विसावे शतकाचें नवल होय !

### सुभाषितें—

आज शहाणपण सुचलें, तर आज कायतें करून टाकावें. उद्यां तें शहाणपण राहीलच अशी खात्री बाळगूं नये.

काम करण्यापेक्षां काम करून घेण्यालाच अक्कल अधिक लागते.

पैशानें वस्तू विकत मिळतात. पण प्रेमानें त्या आपोआप जवळ येतात.

**मानसशास्त्राचे दवाखाने**—औषधानें रोग बरे न करितां मानसशास्त्राच्या प्रयोगानें रोग बरे करण्याचे दवाखाने अमेरिका, न्यूयार्क येथें निघत आहेत. अमेरिका व यूरोप खंड येथें पुष्कळ लोकांस मानसशास्त्राच्या अभ्यासाचा नाद लागला आहे. व या शास्त्रावर निघणाऱ्या पुस्तकांचा खपही जारीनें सुरू आहे.

**हातच छाटला**—बर्मा स्टेट रेल्वेमधून गेल्या आठवड्यांत एक श्रीमंत ब्रह्मी स्त्री हातांत सोन्याच्या बांगड्या व इतर बरेच सोन्याचे दागिने घालून आगगाडीच्या खिडकीच्या बाहेर हात टाकून बसली होती. इतक्यांत एकजण गाडींत चढण्याच्या पाटीवर येऊन त्यानें तिचा हात तरवारीनें छाटून टाकला. अंगावर दागिनें वापरणाऱ्या स्त्रियांनीं यावरून सावध रहावें.

**बोलवा**—मुंबई येथें होणाऱ्या राष्ट्रीय सभेच्या वेळीं मि. दादाभाई नारोजी, सर डब्लु वेडरबर्न, व मि. ह्यूम हे तिघेजण विलायेतहून येथें येणार आहेत अशी बोलवा आहे.

**चमत्कारिक हुकूम**— अहमदनगर येथें टोळ व त्यांचीं अंडीं यांचा नाश करण्याकरितां सरकारनें सर्क्युलर काढून पाटील, कुळकर्णी यांस असें फर्माविलें आहे कीं त्यांनीं गांवच्या लोकांच्या मदतीनें रात्रीं २ ते ६ वाजेतों टेंभे हिलाळ लावून टोळ मारावेत.

**आपला धर्म**- आमच्या प्राणापेक्षांही प्रिय असणारी जिन्नस, आमचे जीवन, आमच्या मोक्षाची पायरी, आमच्या उन्नतीचें बीज, आमच्या ज्ञानाचें भांडार, आमच्या जीवनाचा आधार, आह्मां हिंदूंचा कलिजा, आमचें सर्वस्व असा जो आमचा सनातन धर्म त्यास आह्मी विसरून जात आहोंत हें बरें नव्हे.

**एका साहेबांचा प्रश्न**- हिंदुस्थानांत मोठमोठे महात्मे आहेत, व हिंदु लोकांचे धर्मग्रंथ फार अमोलिक आहेत, असें जर आहे तर हिंदुस्थानांतील लोक अति दरिद्री, अडाणी, देवभोळे आणि मूर्ख कसे झाले ! यास काय उत्तर द्यावें !

**रोपें लौकर उगवण्यास उपाय**— धान्याचें बीं कर्पुरमिश्रित पाण्यांत कांहीं वेळ भिजवून मग पेरावें ह्मणजे रोपा लौकर उगवतो. अनुभव अवश्य घ्यावा.

**इंद्रियउत्पाटन** — वाई तालुक्यांत पसरणी येथें बैल बांधण्याचा तंट्यावरून दोघा इसमांत मारामारी होऊन एकानें दुसऱ्याचें इंद्रिय मुळासकट उपटलें आहे. भांडण केव्हां कोणच्या थरावर जाईल याचा खरोखर नेम नाहीं.

**४०० मैल वेग**-एका अमेरिकन प्रोफेसरानें वीज आणि लोहचुंबकाच्या कळीचें एक एंजिन तयार केलें असून त्याची गती एका तासांत ४०० मैल प्रदेश आक्रमण करण्या इतकी आहे ह्मणतात.

**कीर्तनांत साप सोडला** — वाई येथें कीर्तन चाललें असतां कांहीं लबाड लोकांनीं मध्येंच जिवंत साप सोडला. त्याबरोबर कीर्तन बंद होऊन सर्वांची दाणादाण उडाली. ही पुण्याचीही वर ताण ह्मणावयाची !

**नवीन यंत्र** — लहान बोटी व होड्या दर तासास २० मैल या वेगानें नेतां येतील असें एक चक्र दक्षिण हिंदुस्थानांतील नारायण बाकुलय्या नांवाच्या इसमानें तयार केलें आहे. या चक्रास वल्हीं लावलेलीं असून तें चक्र एक माणूस चालवूं शकतो.

**चमत्कारिक चाल**- जेवण व फराळ या संबंधानें जपानी लोकांत भेदाभेद नाहीं. एखाद्या ठिकाणीं जेवावयास गेले असतां, निःशंकपणें भाकरी खिशांत घालून ते घराकडे येतात. घराकडे परत जातेवेळीं, वाढलेल्या ताटांत जें अन्न शिलक राहतें, तें एका पेटींत घालून त्यास नेण्याकरितां देतात. भोजनाचे शेवटीं प्रत्येक मनुष्यापुढें एक मोठा खरबरीत तांबडा व हिरवा असा मासा ठेवितात व हा मासाही सदर पेटींत घालून त्यास देतात.

**रेशीम काढण्याचें चमत्कारिक यंत्र** —अमेरिकेंत डाक्टर ल्वेर्स नांवाच्या एका शोधकानें, एक नवीन यंत्र तयार केलें असून, त्या यंत्रांत रेशमाच्या किड्याच्या शरीरांतील रचनेप्रमाणें रचना केली आहे. या यंत्रांत तुतीचा पाला घातला असतां, तें, तो पाला आपोआप खाऊन गिळून, किड्यांच्या पोटांत पाला गेला असतां जशी क्रिया होते, तशी सर्व होऊन, आपोआप रेशिमाचे तंतू बाहेर पडण्यास सुरुवात होते. या रेशिमांत आणि किड्यापासून उत्पन्न होणाऱ्या रेशिमांत बिलकूल फरक नाहीं. कारण हें रेशीम तुतीच्याच पाल्यापासून उत्पन्न झालेलें, बळकट, मऊ व रंगांत सर्व प्रकारें सारखें आहे, आणि किंमतीनें हल्लींच्या रेशिमापेक्षां फार सोयीचें आहे. ह्मणजे साधारणतः कापसाच्या सुताच्या किमतीनें हें विकतां येईल असें या यंत्रकर्त्या डाक्टर साहेबांचें ह्मणणें आहे.

**विलक्षण न्याय**- ट्रान्सवालांतील न्यायाची कल्पना विलक्षण दिसते. बिनगोऱ्या इसमानें गोऱ्या स्त्रीवर जबरी केली तर त्यास फांशीची शिक्षा मिळते. अशा तऱ्हेनें ४ नेटिव लोक जोहानस्बर्ग व ईस्ट लंडन येथें फांशी देण्यांत आले. सर्व जगांत गोऱ्यांनीं काळ्या स्त्रीवर जुलूम केला तर शिक्षा कोणती मिळते ?

**जपानी लोकांचा उद्योग**- जपानमधील ओयागी नांवाच्या गांवीं कांहीं तरुण मंडळींनीं एक 'जंको-काई' नांवाची संस्था स्थापन केली आहे. या संस्थेचे सभासद आजूबाजूच्या शेतांतून फिरून तेथें काम करीत असलेले शेतकरी लोक लढाईवर जाण्यास तयार असल्यास त्यांच्यामागें शेतांची सर्व व्यवस्था करण्याचे जोखीम आपल्या अंगावर घेतात व त्याबद्दल कोणत्याही तऱ्हेचा मोबदला घेत नाहींत. याप्रमाणें लढाईस होईल तितकी मदत करण्याची खटपट जपानी लोकांनीं चालविली आहे.

**गोरक्षणाचे अभिमानी मुसलमान**— —मुसलमान लोकांत गोरक्षणाचा अभिमान बाळगणारे लोक क्वचित् आढळतात. पण हल्लीं एक मुसलमान गृहस्थ गोरक्षणासंबंधानें वर्तमानपत्रद्वारें योग्य समर्थन करून लोकांत जागृति उत्पन्न करावयाचा प्रयत्न करीत असल्याचे आढळून आले आहेत. हे गृहस्थ राजपुताना गॅझेट पत्राचे मालक होत. हे जातीचे मुसलमान असून मोठे स्पष्टवादी आहेत. हिंदुस्थान देश शेतकीचा असल्यामुळें, गोरक्षणाशिवाय त्याची स्थिति सुधारणार नाहीं अशी यांची खात्री झाली आहे. त्यांनीं आपल्या पत्रांत गोरक्षणाचें समर्थन चांगल्या रीतीनें केलें आहे. या थोर मनाच्या गृहस्थां प्रमाणेंच सर्व हिंदुमुसलमानांनीं आपआपसांतील मतभेद बाजूस ठेवून गोरक्षणासारख्या महत्वाच्या कामीं मनोभावें झटावें.

**भलतीच चूक**- मलबारकडील मानोनतोंडी नजीक एका गांवीं एक मनुष्य आपल्या घराच्या कपाउंडमध्यें ब्लँकेट पांघरून बसला असतां त्याच घरांतील दुसऱ्या एका मनुष्यास वाघ बसला आहे असा भास होऊन त्यानें त्यावर गोळी सोडून त्यास ठार केलें. मागाहून चुकी ध्यानांत आली. पण उपयोग काय ?

**सहज गोष्ट प्राणावर गेली** — धारवाड येथें दत्ताचे देवळांत कांहीं मुलें खेळत होती. एक मुलगा जास्त दंगा करू लागला ह्मणून पुजाऱ्यानें सहज मारलें तों तो मार त्याच्या वर्मी लागून मुलगा मेला. पुजाऱ्यावर खटला चालू आहे.

**सुई दोऱ्याचीं झाडें** —मेक्झिकोमध्यें मस्वे नांवाचें झाड सांपडलें आहे या झाडाच्या पानाच्या टोंकास सुई सारखें एक हत्यार असतें आणि ही सुई तोडली ह्मणजे सुईत दोरा ओंवल्याप्रमाणें या सुईबरोबर बळकट तंतु त्या झाडांतून बाहेर पडतो. या लक्षणावरून त्या झाडास सुई दोऱ्याचें झाड ह्मणतात.

---

## आज्ञापत्र

( श्रीद्वारकापीठाचे शंकराचार्यांकडून )

केवळ सनातन वैदिधर्म रक्षणार्थ जे श्रीगुरुस्थानांतून प्रयत्न सुरू आहेत त्यांतच धर्मसंबंधीं कामांत कालज्ञानाची प्रथमतः अवश्यकता आहे. इतकेंच नव्हे तर एकादश्यादि कित्येक व्रतें तिथिप्रधान असून कित्येक नक्षत्रप्रधान व कित्येक तिथी व नक्षत्र उभय प्रधान आहेत. देवस्थानचे पर्व आणि उत्सव तसेंच पिंड पितृयज्ञ दर्शपौर्णिमास इत्यादि यावत् श्रौत स्मार्त व नित्यनैमित्तिक कर्म आणि व्यवहार कालज्ञानावांचून होतच नाहींत, व त्या कालज्ञानाचें साधन पंचांग आहे. या साठीं निर्दोष व शुद्ध पंचांग असणें हें काम अति महत्वाचें व जरूरीचें आहे आणि या संबंधांत गुरुस्थानची स्वारी मुंबई येथें आल्यावर कितीएक धर्मनिष्ट सद्गृहस्थांकडून यथार्थ पंचांग होण्याबाबद विनंती पत्रें ही सादर झाली आहेत यासाठीं या आज्ञापत्रिकेद्वारें कळविण्यांत येत आहे तें असें:—

हल्लीं जीं अनेक पंचांगें पहाण्यांत येतात त्यावरून कोणाचा मेळ कोणाशीं नाहीं इतकेंच नव्हे तर तिथी व नक्षत्रादिकांत १४ घटिका पर्यंत आणि अधिक मासांत दोन महिन्यांचा फरक नजरेस आला आहे. त्यास प्रत्यक्ष प्रमाण बहुतेक पंचांगांत अधिक मास हल्लीं ज्येष्ठ महिना आहे आणि केरोपंती पंचांगांत श्रावण मास अधिक आहे. अर्थात केरोपंती पंचांगावरून चालणारे लोकांत विवाहादि कार्ये मुद्रां झालीं असतील व होण्याचा संभव आहे. तसेंच तिथी व नक्षत्रांत नेहमीं फरक येत आहे त्यामुळें प्रदोषादि व्रतें आणि कर्मे काळविधिविरुद्ध होऊन नुसतीं निष्फळ होतात; एवढेंच नव्हे, परंतु व्रत आणि कर्म उक्तवेळीं न झाल्यानें व्रतभंग होऊन करणारा ईश्वरी क्षोभास पात्र होतो. अशी पंचांगांच्या चुकीनें फार मोठी धर्महानि होत आहे व ही अडचण जरूर दूर झाली पाहिजे. या साठीं आज्ञा केली जाते कीं, या आपले भरतखंडांत ज्या ज्या ठिकाणीं जे जे विद्वान ज्योतिषी, पंचांग करणोरे आणि हा विषय जाणणारे असतील त्यांनीं ही आज्ञापत्रिका अवलोकन करितांच पंचांगसंबंधीं ज्याला जितकी माहिती असेल व जितके ग्रंथावलोकन असेल व ज्याच्याजवळ जे जे ग्रंथ या विषयासंबंधीं असतील त्यांसह मुंबई येथें येण्यास तयार व्हावें, आणि इकडेस नांव गांव पोस्टाचे ठिकाणासह कळविण्याचें करावें. अशी पत्रें निदान आषाढ शुद्ध पौर्णिमे पर्यंत ( इंग्रजी तारीख २७ जुलई सन १९०४ इ०) येऊन पोहोंचतील अशीं पाठवावी ह्मणजे येथें सर्व मंडळी जमविण्याचा दिवस मुकरर करून कळविण्यांत येईल. पंचांगाचा उपयोग सर्व धर्माच्या व पंथांच्या लोकांस अति महत्वाचा असल्यानें या कामीं श्रीगुरुस्थानीं सर्वत्रांची मोठ्या तत्परतेनें आणि उत्सुकतेनें अनुकूलता व साह्यता रहावी.

स्वारी मुक्काम गिरगांव ठाकुरद्वार रोड,
आंग्र्याचे वाडीसमोर

---

## नोटीस.

रा. रा. रावजी रामजी टाले राहणार अरेगांव यांसः—

खालीं सही करणार याज कडून नोटीस देण्यांत येते कीं तुमचे मजकडेस गहाणखतावरून असलेले कर्जाचा निकाल भाऊसाहेब पिंपरकर आदिकरून चार संभावीत मंडळीचे समक्ष होऊन ठरलें कीं ४०० रुपये व दोन नंबर घेऊन भल्याचा नंबर मजकडेस ठेवावा व मला चुकती पावती द्यावी त्याप्रमाणें मी तुह्मास ४०० रुपये त्याच वेळेस दिले व वरील दोन्ही नंबर ही तुमचे ताब्यांत दिले. तर आतां त्या नंबरांचे शेतसाऱ्या बद्दल तुह्मी जबाबदार आहात. आतां मजकडेस तुमचें कांहीं एक देणें राहीलें नाहीं तर तुह्मी ही नोटीस पावल्या पासून १५ दिवसांचें आंत चुकते खात्याची पावती द्यावी. न दिल्यास आह्मी कोणतेंच प्रकारें जबाबदार राहणार नाहीं. सदरहू नंबर तुह्मी सांगाल त्यावेळेस तुमचे नांवें करून देण्यास मी तयार आहें कळावें. तारीख ३० जून १९०४ इ०

सही

रामजी रोहाजी पळसकर
राहणार डोमगांव
निशाणी रेघ —

## नोटीस

बेशनी—गणपत वल्लद सोनाजी शिरसोळे राहणार मोरगांव ( माकऱ्याचें ) तहशील आकोला. यांस—

खाली सही करणार यानकडून कळविण्यांत येते की माझी मुलगी नामें तानी ही तुमची लग्नाची बायको असून ती शहाणी झाली आहे. अडीच वर्षापासुन ती माहेरींच आहे. तिला तुमच्या घरीं तुह्मापाशी नांदण्यास पाठवावी पण तुह्मी तिला जवळच येऊं देत नाहीं. तुमची प्रकृती नीट होत नाहीं आणि तुह्माला बायकोची व संसाराची गरज नाहीं असें तुह्मी समक्ष सांगितलें व फारकतही देऊन तानीवरचा हक्क सोडून देण्याला तुह्मी कबूल झाला. लेखी फारकतनामा फक्त व्हावयाचा राहिला आहे. या जाहिर नोटिशीनें मी कळवितों कीं तुह्मी आपल्या बायकोशी संसार करावा किंवा तुमच्यापाशीं संसार होण्यासारखी अनुकूलता नसेल तर तुह्मी तोंडीं दिलेली फारकत लेखी करून द्यावी. आजपर्यंतचा गेल्या अडीच वर्षाचा पोटापाण्याचा खर्च तुह्मावर पडेल आणि त्या शिवाय नोटिशीचा खर्च द्यावा लागेल. या सर्व गोष्टी नोटीस पोचल्या तारखे पासून आठ दिवसांत होणार नाहींत तर आह्मी दिवाणी फौजदारी करून योग्य ती दाद कोर्टमार्फत मिळवूं आणि तोंडी दिलेली फारकत खरी समजून मुलीचा दुसरा घरठाव करून देऊं. कळावें. ता. २९ जून १९०४ इ.

सही

विठोबा वल्लद मनाजी मनसुरे
राहणार भोनगांव तालुका
खामगाव निशाणी रेघ.

---

## नोटीस

रा. रा. रामदत्त किसनदयाल मयत वारस पुत्र १ गोवर्धन, २ मारकीनाथ, ३ गिरधारिलाल, ४ नंदलाल व ५ ब्याहारीलाल पैकीं ३।४।५ अज्ञान पालन करणार बंधु गोवर्धन व मारकीनाथ तर्फे मुखत्यार तनसुखराय राधाकिसन मारवाडी दुकान आकोला यांसः—

खालीं सही करणार यांजकडून कळविण्यांत येतें कीं आह्मी तुह्मांस ९ मार्च १९०२ रोजीं ताबेगहाणाच्या व्यवहारासंबंधानें जाहिर नोटीस दिली होती. त्या नोटिशी प्रमाणें तुह्मी योग्य व कायदेशीर तजवीज केली नाहीं. तुमच्या अशा दांडगाईच्या वर्तनामुळें माझें मोठें नुकसान झालें आहे. या नुकसानी संबंधाची जबाबदारी तुह्मावर आहे आणि त्याबद्दल मी तुह्मावर योग्य कोर्टांत दावा करून मला पाहिजे ती दाद मिळवून घेईन.

सध्यां पुनः नोटिशीनें कळवितों कीं मला गहाण माल जें दुकान तें फार कमी किंमतीला विकावें लागलें आहे. हें दुकान आह्मी मे. उमरखां लालखान सौदागर दुकान आकोला यांस विकलें आहे आणि त्यांच्याशी असा करार केला आहे कीं २१ आक्टोबर १९०४ रोजीं दुकान ताब्यात देऊं. आणि ताब्यात न देऊं तर नुकसानीः भरून देऊं. तुमचे गहाणाचें रुपये 'सिलीमखान दाऊदखान' यांच्या दुकानाचे मालक मे. अमानखा सिलिमखान राहणार आकोला यांच्या दुकानावरून घेऊन जावे आणि त्यास चुकती पावती द्यावी. तुह्मी दुकानाचा ताबा वेळेवर न द्याल तर तुह्माला दररोज २५ रुपये प्रमाणें दुकान मोडें आमच्या ताब्यांत दुकान येईपर्यंत द्यावें लागेल आणि तुमच्या गहाणाची रकम सावकाराच्या घरीं बिनव्याजी अमानत पडल्यामुळें त्या रकमेवर दुहोत्रा प्रमाणें व्याज द्यावें लागेल. या नोटिशीचा खर्च तुह्मावर आहे. कळावें. २८ जून १९०४ इ.

सही ( मारवाडींत )

लक्षीनारायण वल्लद हुकूमचंद
साहू दुकान आकोला
दस्तुर खुद.

---

## नोटीस.

चुनीलाल सिवचंद तर्फे देवीदत्त रामदत्त दुकान आकोट यांसः—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुह्मी तारीख ७-६-१९०४ इसवी रोजीं वऱ्हाडसमाचार वर्तमानपत्रांतून नोटीस दिलेली आह्मास तारीख १८-६-०४ रोजीं मिळाली. त्याचें उत्तर देण्यात येते कीं आमचे जवळ जे गहाणखत रुपये तीनशेचें आहे त्यांत रकम वसूल देईन त्यांत आधी व्याज काढून घ्यावें आणि बाकी राहिलेली रकम मुद्दलांत वसूल धरावी व वसूल दिला नाहीं तर तुह्मी व्याजास व्याज व मुदलास व्याज देऊ अशी शर्त लिहिलेली आहे या शर्ती प्रमाणें आह्मी तुमचे पासून पैसे घेऊ कमी घेणार नाहीं. जर या शर्ती प्रमाणें तुह्मास आमचे गहाणाची रकम देणें असेल तर आमचे रुपये ९८६।८।२ घेणें निघतें तर तुह्मास नोटीस पावताच वरील रकम आमचे दुकानीं आणून द्यावी. आणि गहाणखतावर भरपाई करून घ्यावी असे न केल्यास तुमचेवर दिवाणींत फिर्याद करून नोटिशीचे खर्चा समेत आणि कोर्ट खर्चा संगत रुपये वसूल केले जातील. ही नोटीस दिली. तारीख २९-६-०४ इसवी०

सही

साहेबराम मोतीलाल मालक
रामरतन साहेबराम दुकान
पनज पोस्ट— आकोट.

---

## नोटीस

गोविंदा वल्लद नारायण बोचरे माळी राहणार लाखनवाडा यांसः—

कळविण्यांत येते कीं १६ जून १९०४ चे शुद्धवऱ्हाडी पत्रांत तुह्मी दिलेली नोटीस खोटी आहे. लाखनवाडा येथील सर्वे नंबर १६ वर आमचा हुकूमनामा तुमचे विरुद्ध झाला आहे त्याचे फेडींत ११ पिकें आह्मांस देण्याचे तुह्मी कबूल केले. आह्मीही ती गोष्ट कबूल केली. तुह्मी ११ पिकाचा पट्टा देण्याचे नाकबूल केले सबब तुमचा करार राहिला नाहीं. तथापि अजून ८ दिवसाचे आंत गहाणाचे हुकूमनाम्याचे फेडींत ११ वर्षाचा पट्टा रजिष्टर करून देत असल्यास आह्मी शेत घेण्यास तयार आहों आमचे दुकानचे इतर कर्ज व खाते बाकी बद्दल तुमचा आमचा मुळींच करार झाला नव्हता. तुमचे ह्मणणें कपटाचें व लबाडीचें आहे. ८ दिवसांत वर लिहिल्या प्रमाणे हुकूमनाम्याचे फेडींत रजिष्टर पट्टा करून न दिल्यास आह्मी हुकूमनाम्याची आमलबजावणी करून गहाण माल हरास करण्याची तजवीज करूं. कळावें. ता. २८।६।०४ इसवी.

सही

दुलीचंद फुलचंद शेट मारवाडी
वहिवाटदार तोताराम शिवआपा
वाणी राहणार लाखनवाडा

---

## नोटीस

बेशमी भिवरी मर्द गणू माळीण वय १६।१७ वर्षें राहणार किसन वल्लद रंजाजी उगले वस्ती आसलगांव तालुका जळगांव यांचे घरीं. ईसः—

खाली सही करणार इजकडून या जाहिरखबरीनें कळविण्यांत येते कीं तूं माझी सवत आहेस. तुझपाशीं गंधेव लागल्यानंतर पांच सहा महिन्यांनींच आपला नवरा मरण पावला. त्यांच्या पश्चात तूं चांगल्या रितीनें वागलीस तर तुला जन्मभर अन्नवस्त्राला कहीं कमी नाहीं. पण तुझी वृत्ती अगदीं चळली आहे. गेल्या चार महिन्यांतच तूं घरून निघून गेलीस. तूं आपल्या आईबापाच्या घरीं न जाता मध्यंतरीं आपल्या बहिणीच्या घरीं राहिली आहेस. तेथें तिच्या नवऱ्याच्या सांगण्या प्रमाणें तूं वागतेस. त्याच्या मनांतून सर्व जिनगी खारीज करून स्वतांच लुटण्याचा त्याच्या विचार दिसतो. तूं अंगावरील दागदागिना अदमासे १०० रुपये किंमतीचा त्याच्या घरीं नेऊन ठेविला आहेस. तुला अजून दुनियेदारी ता काहींच माहित नाहीं. तूं लबाड लोकांच्या नादीं लागून इस्टेटीची विल्हेवाट करशील तर मी तुला तसें करूं देणार नाहीं. मी असेंही ऐकतें कीं तुझे साथीदार लोक तुझ्या मांडीवर कोणी पोराला दत्तक देऊन इस्टेट हिसकावून घेऊं असें ह्मणतात. तूं अजून सज्ञान नाहींस. तूं गंधर्वाचा दुसरा नवराही ठरविला आहेस असें कळतें. माझ्या संमती शिवाय तुला कोणतीच गोष्ट करितां येणार नाहीं. आणि जर तू जिनगी गहाण खरेदी वगैरे देशील किंवा दत्तक घेशील तर तो सर्व व्यवहार बेकायदा होऊन बातल होईल. तूं दागदागिने घेऊन घरीं परत ये ह्मणजे मी तुला कधींही अंतर देणार नाहीं. तसें करण्यास चुकशील तर तुझ्यावर आणि तुझ्या मदतनीस मंडळीवर दिवाणी व फौजदारी करून कोर्ट मार्फत सर्व व्यवस्था करावी लागेल. कळावें. तारीख २६ जून १९०४ इ०

सही

पुती मर्द गणू एणकर माळी
राहणार असलगांव निशाणी
बांगडी

---

## जाहिरात

सर्वंत्र लोकांस कळविण्यांत येते कीं माझी सवत नामें भिवरी ही वयानें अज्ञान असून तिला फसविणारे लोक पुष्कळ असून त्यांनीं तिला घरांतून काढून नेलें आहे. तिला नवऱ्याच्या हातची इस्टेट विकण्याचा किंवा गहाण वगैरे ठेवण्याचा कोणत्याच प्रकारचा हक्क नाहीं. तिची पालन कर्ती मी आहे. तिच्याशी व्यवहार करून कोणी साहु सावकारांनीं फसूं नये ह्मणून ही जाहिरात मुद्दाम दिली आहे. जो तिच्याशी व्यवहार करील तो इस्टेटीवर त्या व्यवहाराची जोखीम बसवूं शकणार नाहीं. कळावें. तारिख २६ जून १९०४ इसवी.

सही

पुती मर्द गणू एणकर माळी
राहणार असलगाव निशाणी बांगडी

---

## नोटीस

बेशमी— आनंदाबाई मर्द गोंडू पाटील राहणार मौजे बोराळे बुजरुख तलुके जळगांव जिल्हा आकोला यांसः—

खाली सही करणार यानकडून नोटीस देण्यात येते कीं मौजे बोराळे बुजरुख तालुका जळगांव येथील शेत.

| सर्व्हे नंबर | एकर गुंठे | आकार रु० |
|---|---|---|
| २७ | ८।३१ | २१ |
| ५६ पैकीं | २।१० | ५ |
| ५३ पैकीं | ३।१० | १० |

या तिन्ही शेतांचें खातें आमच्या नावानें असून सर्व जमीन आमच्याच ताब्यात आहे. तूं माझी चुलती असून आपण सर्वजण एकत्र अविभक्त कुटुंबांतले आहों. आपली चुलती तुह्मी आहा ही गोष्ट लक्षपात आणून न गावांतील काहीं लबाड लोकांनीं तुह्मास फरेफ दिला आहे आणि तुमच्या कडून जिनगीचें खरेदीखत, किंवा गहाणखत, किंवा बक्षीसपत्र करून द्यावें आणि इस्टेट कशी तरी पचवावी असा त्यांचा विचार दिसतो ही गोष्ट माझ्या ऐकण्यांत आली ह्मणून या जाहिर नोटिशीनें सक्त मनाई करणें भाग पडलें आहे. तुह्मी शेती कोणाही खरिदी, गहाण किंवा बक्षीस देऊं नये. तसा व्यवहार करण्याचा तुह्माला अधिकार नाहीं. तुह्मी अन्नवस्त्राच्या मालकीण आहां आणि तुह्मी घरीं येऊन राहिल्यास तुह्माला अन्नवस्त्रासाठीं कांहीं कमी नाहीं. तुह्मी जो व्यवहार कराल तो रद्द व बातल समजला जाईल आणि त्याची जोखीम इस्टेटीवर पडणार नाहीं. कळावें. तारिख २७ जून १९०४ इसवी.

सही

माधो वल्लद रादो पाटील
राहणार बोराळें बुजरुक
. दस्तुर खुद

---

## जाहिरात

सर्वत्र लोकांस कळावण्यांत येते कीं आमची चुलती नामें आनंदाबाई मर्द गोंडू पाटील यांस आमची स्थावरजंगम इस्टेट विकण्याचा अधिकार नाहीं. तेव्हां त्यांच्या कडून कोणीही कोणतीच इस्टेट खरिदी, गहाण, किंवा बक्षिस घेऊं नये. साहू सावकारांनीं फसूं नये ह्मणून मुद्दाम

ही जाहिर खबर दिली आहे. कळावें तारीख २७ जून १९०४ इसवी.

सही

माधो वलद यादो पाटील
राहणार बोराळें बुद्रुक
दस्तुर खुद्द

## नोटीस.

रा. रा. रामाजी वलद राणुजी पाटील राहणार मौजे शेलू तालुके मुर्तिजापूर जिल्हे उमरावती यांस:—

खाली सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुम्ही आम्हांपासून तारीख २३ माहे जून सन १९०४ इसवी रोजीं रकम रुपये १००० एक हजाराचें पोकळ खरेदीखत लिहून घेऊन नोंदून घेतलें सदरहू खरेदीखतांत मौजे टाकळी तालुके आकोला येथील शेत सर्व्हे नंबर १४ एकर ३२-१२ आकार रुपये ६९ हे आम्हांस अडसुद्दा लिहिलें आहे सदरहू शेता संबंधानें आम्ही आपणास असे कळविलें आहे कीं तें शेत आमचे कबज्यांत नसून भावसिंग वलद रायसिंग व शंकर वलद बनसिंग राहणार जवळ बुद्रुक तालुके आकोले याचे कबज्यांत आहे सदरहू शेता पैकीं ½ हिस्सा सुमारें १० वर्षां पूर्वी भवानसिंग याजला खरेदी दिला आहे व बाकीचा ½ हिस्सा शंकर वलद बनसिंग याजला सुमारे ६ वर्षे पूर्वी विकत दिलेला आहे. व वरील इसमांनी सदरहू हिस्से खरेदी घेतल्या पासून ते त्यांचेच कबज्यांत आजवर आहेत अशी गोष्ट आम्ही तुम्हांस सांगितली असतां तुम्ही आम्हास असें म्हटलें कीं काहीं हरकत नाहीं. तुम्ही आमचे नावें पोकळ खरेदीखत करून द्यावें व नंतर आम्ही जबरदस्तीनें, शेताचा कबजा घेऊन नंतर तुम्हांस तिमे जमीन वाहण्यास देऊं असें तुम्ही आम्हास भर दिल्या वरून आम्ही तुमचे नांवें वरील शेताचें पोकळ खरेदीखत करून दिलें आहे. त्याचे दामां पैकीं काहीं एक रकम आम्हांस मिळाली नाहीं एवढेंच नाहीं तर उलट स्टांप करितां व नोंदणी करितां जो खर्च लागला तो तुमचे म्हणण्यावर आम्हीच केला या तुमचे बोलण्यावर आम्ही फसून वरील पोकळ खरेदीखत तुम्हांस करून दिलें आहे तरी या नोटिसीनें कळवितो कीं तुम्हास जे आम्ही खरेदीखत करून दिलें आहे तें रद्द आहे असें समजावें सदरहू शेताचा कबजा आम्ही तुम्हास कोणत्याही प्रकारे दिला नाहीं. तुम्ही वरील खरेदीखताचे आधारानें जबरदस्तीनें कबजा घेण्यास जाल तर त्याजबद्दलची सर्व प्रकारे जबाबदारी तुमचेवर राहील. वरील जबाबदारीस आम्ही कोणतेही प्रकारे पात्र होणार नाहीं. या नोटिसीचा खर्च तुम्हापासून भरून घेतला जाईल. कळावें. ता० ३०।६।०४ इसवी.

सही.

किसन वलद बापूजी पाटील राहणार टाकळी पोस्टाची तालुके आकोला निशाणी मोहर.

बळीराम वलद बापूजी पाटील राहणार टाकळी पोस्टाची पोस्ट कुरणखेड ता० आकोला निशाणी खुद्द.

श्रीनमःश्री गणेशाय.

आर्यवनौषधालय— मुर्डी ता० दापोली आमच्या खात्रीच्या औषधांचा गुण शंभरांतून एक दोन रोग्यास कदाचित् न आला तर पैसे परत देऊं व त्यांचे आरोग्यार्थ दुसरी एखादें उत्तम औषध द्यावे लागल्यास तें फुकट देऊं.

### मदनामृतसंजीवनी

धातुवर्धक, अत्यंत कामोत्तेजक व पौष्टिक, वीर्यस्तंभक, रक्तशोधक, मनोत्साहक, कांतिबुद्धिवर्धक, अशी सुवर्णमाक्षिक, मौक्तिक, कस्तुरी व अनेक वनस्पतीमिश्र अद्भुत

## गुटिका

उपयुक्त वनस्पतींचें मिश्रण केलें असल्यामुळें यांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून खालील विकारावर या अत्यंत उपयोगी आहेत.

यांच्या सेवनानें नपुंसकत्व, स्वप्नजन्य व इतर धातुपात, उन्हाळे, इंद्रिय शिथिलता कडकी, गर्मी संबंधी मुरलेले विकार, मूत्रसं, कोच, धातुचा पातळपणा, स्त्रियांची धुपणी ज्ञातींतील रोग, हातपाय, मूत्रस्थान व नेत्र याचा दाह, क्षय पांडुरोग, मुलाची खर, जीर्णज्वर, अग्निमांद्य, मस्तकशूळ, मूळव्याधी वातरोग, निद्रानाश, पित्तविकार, बाळंतरोग मुष्टिमैथुनादि घातक संवयीनें आलेली कृशता इत्यादि अनेक विकार खात्रीनें बरे होऊन शरीर निरोगी, मजबूत व सतेज बनतें, पचन शक्ति व स्मरण शक्ति भरपूर वाढून धातु व रक्त याची वृद्धि, वीर्यस्तंभन व भरपूर कामोद्दीपन होतें. शक्ती भरपूर वाढून मनास उत्साह येतो. दूध व जडान्न भरपूर पचूं लागतें. गुणाबद्दल असंख्य सर्टिफिकिटें मिळाल्या व नित्य मिळत आहेत. पथ्य सेवनाची गरज मुळींच नसून स्त्रिया, पुरुष, व मुलें यांस पाहिजे त्या दिवसांत घेण्यास अत्यंत उपयोगि आहे.

गुटिका रुपयाचे आंत मिळणार नाहींत एकदम चार रुपयांवर कितीही घेणारास टपाल खर्च माफ. चार रुपयाचे आंत ट० ४६ आणे पडेल. अनुपान खर्डा सोबत रोखीनें किंवा व्ही. पी. नें खालील पत्त्यावर मिळतील. दर:—

| | | | |
|---|---|---|---|
| ३६ गो० | १ रु० | ७६ गो० | २ रु० |
| ११६ गो० | ३ रु० | १६६ गो० | ४ रु० |
| २७६ गो० | ६ रु० | ५५० गो० | १० रु० |

आमचेकडे या शिवाय मोठमोठे रोगांवर अनेक औषधें असून ग्रंथस्थ रसायनें धातुची भस्में, पाक गुटिका वगैरेही माफक दरानें मिळतात विशेष गुणवर्णनाचा सर्व सामानाचा मोठा क्याटलाग मागवावा, फुकट देऊं टपाल खर्च वेगळा पडेल. रोखीनें किंवा व्ही. पी. नें पाठवूं.

सूचना—अलिकडे २।३ वर्षे आंजर्ले वगैरे ठिकाणीं केवळ आपमतलबी ढोंगी लोकांच्या जाहिरातीस ऊत आला असून त्यांनीं आमचेच जाहिरातीची हुबेहूब कापी करून ते ग्राहकाचे डोळ्यांत धूळ फेकीत आहेत. करितां आमची सकल देशबंधुस अशी सविनय प्रार्थना आहे कीं, ज्यांस खरी शास्त्रोक्त औषधें घेणें असतील त्यांनीं आमचीच औषधें खालील बिनचूक सही पत्त्यावरच मागवावी.

पत्ता-कृष्णशास्त्री पेंडसे वैद्य.
मु० मुर्डी ता. दापोली
जि० रत्नागिरी


# ORIENLTAL

## GOVERNMENT SECURITY

LIFE ASSURANCE COMPANY, LIMITED,
Established 1874,
Head Office—**BOMBAY**
*Chief Agency for C. P. Berar & Khandesh*
Head—quarters—Nagpur, C. P.
FUNDS EXCEED

# TWO CRORES AND TEN LAKHS

Claims paid for over One Crore and Fifteen Lakhs.

**IMMEDIATE SETTLEMENT OF CLAIMS**

IF there be one thing of more importance than another in connection with Life Assurance, it is, when Claims arise, that the amonut due under the Policy be paid to the Claimants at the earliest possible date. This the Directors of the " Oriental " keep well before them, and act up to treating their clients with the utmost liberality.

UNQUESTIONABLE SECURITY

IT is not sufficient to read that a Company's Funds amount to given sum, but it is essential to know how such Funds are invested if in miscellaneous and risky investments or how secured.

THE Funds of the " Oriental " are invested in Government Securities, and lodged with the Government Official Trustee of Bombay, in terms of the Company's Trust Deed, as Security for Claims arising through decease of assured lives, and endowment policies matured.

GOVERNMENT Officers, Professional men, Tradesmen and others, by employing a portion of their annual income or profits in effecting life policies, at once create a fund equivalent to the savings of many years.

CREDITORS who expect the repayment of debts at some future period, may protect themselves from loss by the failure of life in the intermediate period, by an assurance on the life of the debtor

NO man can be sure how long he will live; and although he may save money, yet if he die early, before he has had time to save much, his wife and family may be in distress. Life Assurance, is a means by which this danger is got over. Lfe being so uncertain, the sooner a man makes up his mind to assure his life the better. Once satisfied of the propriety of the step, do not delay. There are numerous instances in the records of the ' Oriental ' where the delay of a month or less, has left the family without the intended provision.

INFLUENTIAL AND ENERGETIC AGENTS WANTED. FOR TERMS PLEASE APPLY TO UNDER—SIGNED.

Prospectuses, forms, and any further information, can be obtained on application to—

M. De SOUZA,
CHIEF AGENT
*for C. P. Berar and Khandesh,*


## मुंबई बँकची सेव्हिंग्स बँक

या बँकेत खाली लिहिल्या अटींवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ली जानेवारी आणि ३१ दिसेंबर यांच्या दरम्यान एक हजार रुपया पर्यंत पैसा ठेविता येईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवितां येतील. आणि तो पैसा त्या पैकीं एकास अथवा जास्त इसमास अगर त्यांपैकीं मयताचे मागें राहील त्यास काढतां येईल.

व्याज दरसाल दर शेंकडा ३ तीन रुपये या प्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं.

नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक आकोला ११।७।०३ } J. Kinniburgh एजंट

## जाहिरात

### स्टोअर सप्लायर्स

आम्ही गिरण्या, जिनिंग फॅक्टरी, म्युनिसिपालिटी, वाटरवर्क्स, इंजिनिअर्स इरिगेशन लोकल बोर्डस् वगैरेना लागणारे व मुंबईतील इतर सर्व प्रकारचे सामान फारच माफक दरानें पुरवितों.

धी ग्लोब स्टोअर्स कंपनी.

मनरक परचन्दस्
काळबा देवी पोस्ट
मुंबई.

☞ हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. N.

बाहेरगांवीं टपालहाशिलांसह ........ २ ६
वर्गणी आगाऊच दिली पाहिजे.
किरकोळ अंकास......................२ आणे
नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस.........८११
दुसरे खेपेस.... ........८१

Mofussil ... ... ... 2 ( With postage
All Subscriptions to be paid in advance.
Single copy .......................... 2 as

Advertisement
below 10 lines ...... 2 Rs
Per line over 10 ......3 as
Repetitions Per line ,, 2 as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

VOL XXXVIII AKOLA MONDAY 11 JULY 1904 NO 27

वर्ष आकोला सोमवार तारीख ११ माहे जुलै सन १९०४ इ० अंक २७

### कापडाचें दुकान

( एक भाव व माफक दर )

आमच्या दुकानीं सर्व प्रकारचा रेशमी व सुती माल विक्रीस आहे. आमच्या कापडाचें भाव फारच थोडा नफा घेऊन आकारलेले आहेत. बाहेर गांवीं व्हाल्यु-पेवलने माल पाठविण्याची सोय केली आहे. एक वेळ आमच्या दुकानचा माल पडताळून दुकानाच्या सचोटीचा अनुभव अवश्य घ्यावा.

शा० नागसी भाई लध्धा

ठिकाणा—कॉटन मार्केटा समोर कच्छी बाजार, आकोला.

### नटीस

रुखमी मर्द सदाजी माळी बोराडे राहणार आकोट इजला:—

खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येते कीं तूं मजला तारीख २७ जून १९०४ इसवीचे वऱ्हाडसमाचार पत्रांत नोटीस दिली तिचे उत्तर – सदरहू शेताचे संबंधानें तुजला कांहींच माहिती नाहीं. शेती मजकडेस कोणच्या कारणानें वहितीस आली हें तुजला ठाऊक नसल्यामुळें आतां सज्ञान झाली असें दर्शवून उगीच नोटीस देऊन मजला खर्चांत घातलें आहे हें बरोबर नाहीं. सदर्हू शेतें खानापूर व कान्हेरी व आकोट अशा ३ गांवचे जमिनीचे माझे मालकीचे नांवें खरिदपत्र असून त्यावरून कबजा माझा आहे. यापैकीं आकोट येथील जमीन तूच वाहते हें तुझे नोटिसीनें मजला आतां दर्शविलें म्हणून तुला कळवितो कीं ही नोटीस पावले दिवसा पासून ८ दिवसांत माझी जमीन आकोट येथील मजला देऊन निकाल करावा. नाहीं पेक्षा सदर्हू जमीन कबज्यांत मिळण्या बद्दल तुजवर दावा करून खर्च भरून घेईन. कान्हेरी व खानापूर येथील शेतें तुजला आपसांत मी देत नाहीं. तुजला वाटेल तर दिवाणी कोर्टांत दावा करून कबज्यांत घ्यावी याचें उत्तर आल्या बरोबर तुजवर मी दावा करीन हे खूप समजावें. कळावें. तारीख ९ माहे जुलै १९०४ इ०

सही

काशी मर्द रामजी खानोने माळी राहणार सोमवार-पेठ आकोट निशाणी डांगडी

### नोटीस.

... हस्तनापूर तालुके बाळापूर पोस्ट—शेगांव. यांस:—

खाली सही करणार याजकडून कळविण्यांत येते कीं आह्मी तुह्मांस आमचे घर मौजे हस्तनापूर येथील दर महिन्यास २ आणे प्रमाणें भाड्यानें दिले. भाड्यानें दिलेल्या तारखेपासून तों आज तारखेपावेतो माहे १८४ झाले तें तुह्मी द्यावें व आमची जागा खालीं करून द्यावी. ही नोटीस पावतांच ८ आठ दिवसांत जागा खाली केली नाहीं तर कोर्टमार्फत जागा खाली करून घेऊं व भाड्याचे पैसे व नोटिशीचा खर्च तुमचे पासून भरून घेऊं कळावें. तारीख ७।७।०४ इसवी.

सही.

रुंजाजी वल्दद बापुजी पाटील राहणार टाकळी खोजबोड तालुके बाळापूर पोष्ट शेगांव निशानी खुद.

### नाटीस

मे० शाबासखा वल्दद महिबूबखा मुसलमान राहणार लाखनवाडा बुजरुख तालुके बाळापूर पोष्ट लाखनवाडा. यांस:—

खाली सही करणार याजकडून कळविण्यांत येते कीं आह्मी शेख महिबूब वल्दद शेख पीरमहमद राहणार लाखनवाडा यानवर माझे कांहीं रुपये असल्या कारणानें मी त्याचेवर फिर्याद करून हुकूमनामा मिळविला. पुढें त्यानें मला आपसांत तंटा मिटवा ह्मणून ४ पंचा समक्ष ह्मटल्यावरून मी कबूल केलें त्यानंतर तडजोडीचा निकाल होऊन दोन बैल, एक म्हैस, एक गाडी हे घेऊन शिवाय ४० रुपये त्यानें मजला द्यावे व मी हुकूमनाम्याबद्दल पावती द्यावी असें ठरलें परंतु त्यानें तूर्त रुपये नाहींत मी आठ दिवसानी आणून देतो ह्मणून सांगितल्यावरून मी ती गोष्ट नाकारली तितक्यांत तुह्मी बोलले कीं त्या ४० रुपयाबद्दल एक बैल आहे तो घेत असल्यास मी देतो ते मी कबूल केल्यावर तुह्मी मजला तुमचा बैल दाखविला मी तो पसंत केला. तुह्मी ह्मटले कीं सध्या बैल पाथीवर आहे १।२ दिवसांनीं पोहचता करीन असें तुह्मी ह्मटल्यावरून तुह्मी मजजवळून त्या हुकूमनाम्याबद्दल पावती घेऊन गेले. तुह्मी सभ्य मनुष्य ह्मणून तुमचे खात्रीवर राहून मी देशास गेलो. तुह्मी माझे पश्चात बैल माझे मनुष्याबरोबर लावून दिला. त्याचे दुसरे दिवशींच माझे पश्चात माझे मनुष्या जवळून बैल घेऊन गेले व माझे मनुष्यास सांगितले कीं बैल ह्मणून माझा मनुष्य बैल देत नसतां तुह्मी जबरीनें घेऊन गेले व पावती तेथेंच टाकली. देशावरून परत आलों व रुपये तुह्मास मागितले असतां तुह्मी आज देतों उद्या देतो असें ह्मणून चाळविता परंतु रुपये देत नाहीं. व साफ झगता कीं फिर्याद करा. तरी ही नोटीस पावताच ८ दिवसाच्या आंत रुपये ४० व त्याचे आज मित्ती पावेतों व्याज आणून द्यावें शिवाय नोटीशीचा खर्च द्यावा असें मुदतशीर न केल्यास मी कोर्टांत फिर्याद करून या नोटीशीच्या खर्ची सुद्धा व कोर्ट खर्ची सुद्धा सर्व खर्च भरून घेईन. कळावें. तारीख ७।७।०४

सही

दुलीचंद फुलचंद मारवाडी दुकान लाखनवाडा मालक फुलचंद गणेशदास मारवाडी दस्तुर खुद.

### नोटीस

गोविंदा वल्दद तानाजी रेवाळे भामटी हल्लीं राहणार ताजनापेठ तेलीपुरा आकोला यांस:—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं २०।६।०४ चे वऱ्हाडसमाचार पत्रांत तूं मजला नोटीस दिली ती खोटी आहे. मी आपले बापाचे घरीं ६ महिने झाले आजारी आहे. तुझे घरीं मी लग्न झाल्यापासून अज्ञानपणांत कदाचित् आले असेन, त्याची मजला आठवणही नाहीं. माझे अज्ञानपणांत माझे बापानें तुला वरजावई केले होते तो करारही तूं पाळीला नाहींस; इतकेंच नाहीं तर आज अजमास १। – १॥ महिना झाला तूं माझे बापाचे घरीं आलास त्यावेळीं माझा बाप तुजला माझे संसारा बद्दल विचार पूस करीत असतां त्यावेळीं गांवातील चार पंचानीं चावडीवर माझे बापास तुझे मारफतीनें बोलावूं पाठविले आणि तूं मजला नांदवीत नाहींस अशी पंचाचे मनाची खात्री झाल्यावर पंचानीं तुजला नांदीव ह्मणून पुष्कळ आग्रह केला परंतु ती गोष्ट तूं नाकबूल करून माझी लुगडें चोळी माझे बापापासून तूं घेऊन मजला तोंडीं घडी फाडून तोंडीं फारकती ही पंचाचे मारफतीनें दिली. करितां मजवर तुझा नवरेपणाचा कांहीच हक्क राहिला नाहीं. व तुझे माझे लग्न झाल्या बद्दल, मी अज्ञान असल्या मुळें मजला कांहींच माहीत नाहीं. तूं तोंडी पंचा समोर फारकती दिली मुळें मी तुझे घरीं आता नांदण्यास मुळीच कबूल नाहीं. माझे बापानें माझे अन्नवस्त्रा करितां आजपर्यंत ६०० रुपये खर्च केले आहेत. जो कोणी इतकी रकम माझे बापाची फेडील त्याचे बरोबर मी माझे इच्छे प्रमाणें घरटाव तोंडी फारकतीचे आधारें दुसरा घरटाव करण्यास अडचण नसल्यामुळें मी आज मित्ती पासून ८।१९ दिवसाचे आंत दुसरा घरटाव करते. ही नोटीस दिली. कळावें ता० ६।७।०४ इ०

सही

तानी मर्द गोविंदा रेवाळे भामटी राहणार विवर निशाणी हातची बांगडी

### नोटीस

रा. रा. पुंजाजी वल्दद सिताराम रंगारी राहणार नांदुरा बुजरुख तालुके मलकापूर यांस:—

खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येते कीं तूं माझा लग्नाचा नवरा असून लग्न झाल्यास सुमारे १९।१६ वर्षें झालीं. मी शहाणी होऊन सुमारें ४ वर्षें झालीं. तुमचे येथें मी शहाणे झाल्यावर ३।४ वेळां राहिले परंतु तुह्मी प्रपंच करण्यास योग्य नाहीं व तुमचे येथें राहूनही प्रपंचसुख मिळेल अशी मुळींच मला खात्री वाटत नाहीं. पंचांनीही मला तुमचे घरीं आणून घातले त्या प्रमाणें मी पंचास मान देऊन राहिल्ये परंतु त्यापासून कांहींच निष्पन्न झालें नाहीं. अशी पंचाचीहि खात्री झाली आहे. ह्मणून तुह्मास मी फारकत मागितली असता तीही देत नाहीं. माझे प्रपंचाचे दिवस व्यर्थ चालले आहेत. मला दुसरा घरटाव केल्यावाचून गत्यंतर नाहीं करितां या नोटिशीनें कळविते कीं ही नोटीस पावतांच आठ दिवसांत मला फारकत देऊन तुमचे ताब्यांतून मुक्त करावें. व मला दुसरा घरटाव करण्यास परवानगी द्यावी. मी आपले आई बापाचे घरीं असतांनां सावकाराचें सुमारे शहाणे झाल्या पासून ह्मणजे ४ चार वर्षांपासून दरसाल ५० रुपये प्रमाणें २०० रुपये कर्ज काढलें. ते देऊन टाकावे व त्यांची पावती घ्यावी असे मुदतींत न केल्यास हीच नोटीस फारकत समजून दुसरा घरटाव करीन. व खावटीचे पैशाबद्दल व नोटीशीचे खर्चाबद्दल कोर्टांत फिर्याद करून सर्व खर्च भरून घेतला जाईल. दुसरा घरटाव केल्यावर मग तुमचे नवरेपणाचा हक्क राहणार नाहीं. मी तुमचे घरीं नांदलेहि असते परंतु तुमचे येथें नांदण्यांतच अर्थ नाहीं ह्मणून दुसरा घरटाव करणें मला भाग आहे. ह्मणून दिली नोटीस. कळावें ता० ८ जुलई १९०४ इसवी.

सही

रुपी मर्द पुंजाजी रंगारी रा. नांदुरे बुजरुक दस्तुर गणपतसा महादुसा रंगारी रा. निमकवळें

## नोटीस

बेशमी हेमराज वल्लद रामाजी अळितकर जालनेवाला राहणार शेट तुळशीराम बावाजी अळीतकर मुक्काम–चांद्रे खाडी यांच्या घरीं. चांद्रे—जिल्हा कुलाबा. यांसः—

खाली सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुमची बहीण नामें सुंदर इजला माझा भाऊ रामचंद्र याजला दिली आणि माझा विवाह तुह्माबरोबर झाला. हा साटालोट्याचा संबंध चार वर्षे पर्यंत ठीक चालला. पुढें उभयपक्षीं वाद पडला तेव्हां उभयपक्षीं हा संबंध तोडण्यांत आला. तुह्मी आपल्या बहिणीचा पाट दुसऱ्याशी लाऊन दिला. स्वतां दुसरें लग्न केलें व त्या लग्ना पासून तुह्माला मूलबाळहि झालें आहे. आणि इकडे माझ्या भावाचेंही दुसरें लग्न झाले. तुह्मी मला तोंडी फारकत दिलेलीच आहे पण मला आतां दुसरा घरटाव करावयाचा आहे तेव्हां मजजवळ तुमची लेखी फारकत लोकांच्या खात्रीसाठीं पाहिजे. तुमचा नवरेपणाचा हक्क पूर्वीच तुटलेला आहे; पण मज गरीबावर कृपाकरून लेखी फारकत ही नोटीस पोचल्या तारखे पासून आठ दिवसांचे आंत पाठवून द्यावी ह्मणजे मी संसाराला लागून दुनियेदारी करीन. आपल्या लेखी फारकतीची वाट पाहूनही उत्तर न येईल तर ही नोटीस हीच फारकत समजून मी दुसरा घरठाव करीन. तुमच्या माहिति करितां ही मुद्दाम जाहिर नोटीस दिली आहे. कळावें. तारीख १० जुलै सन १९०४ इसवी. सही.

तुळसाबाई बाप मोतीराम अळीतकार
राहणार नवाबपुरा, आकोला.
निशाणी बांगडी.

## नोटीस

बेशमी— मथुरादास सुरजमल्ल मारवाडी दुकान लाखनवाडा बुजरुख तालुका बाळापुर यांसः—

तुह्मी शुद्धवऱ्हाडी पत्रांतून दिलेली नोटीस पोचली. तुमच्या नोटीशींतला मजकूर पुष्कळसा खोटा आहे. तुमच्या नोटिशीवरून आह्मी गहाणखताची नक्कल काढली तेव्हां कळलें कीं तुह्मी सालबंदी १९९९ पासून सुरू व्हावयाची तेथें १९९८ पासून असें गहाण रोख्यांत लिहून घेतलें आहे. पण हा कागद झाला तेव्हां पंचा समक्षच ठरलें होतें कीं पहिली सालबंदी १। वर्षानें द्यावयाची आहे. १९९९ सालची पहिली सालबंदी देणें झाल्यावर मी तुह्माकडे ८० रुपये घेऊन आलो. आणि ६० रुपये १ ले सालबंदीकडे आणि बाकीचे रुपये चिल्हरखात्याकडे जमा करावे असें ह्मटलें असतां तुह्मी हो ह्मणून वेळ मारून नेली आणि मागाहून ह्मणूं लागला कीं चिल्हर खात्यांतच सर्व रकम जमा केली. पुढें तुमच्याच ह्मणण्या प्रमाणें दोन्ही सालबंदीचे सव्याज रुपये देऊं लागलों तर तुह्मी नोटिशींत लटापटीच्या गोष्टी सांगतां या रितीचा तुमची लबाडि सरकार चालूं देणार नाहीं हें पक्कें समजावें. मी तुमचे रुपये अमानत ठेविले आहेत. तुमच्या दुकानावरही समक्ष घेऊन येतो. ते घेऊन थकलेल्या दोन्ही सालबंदीची चुकती पावती द्यावी. असें करणें नसल्यास तुह्मी आमच्यावर बेलाशक दिवाणींत दावा करावा. सर्व खर्च तुह्मावर पडेल. कळावें. तारीख १० माहे जुलै सन १९०४ इसवी. सही

रहिमानखा वल्लद नामदारखा
राहणार लाखनवाडा बुजरुख
दस्तुर खुद्द.

वऱ्हाडसमाचार

मिती जेष्ठ वद्य १३ शके १८२६

## क्रीडोपवनें

आमच्या गांवाला रम्य क्रीडावनाची व आरामाच्या बागबगिच्यांची मोठी उणीव आहे. शहरच्या वस्तीला या गोष्टी फार आवश्यक आहेत. घराला घरें अगदीं लागून असून मलमूत्रादिकांच्या विसर्जनामुळें प्रत्येक घराचे विशिष्ट भाग अगदीं दूषित होऊन गेलेले असतात; आणि शहराची लोकसंख्या पुष्कळच वाढत गेल्यामुळें लोकांची खेंचाखेंची व गर्दी मोठी होत असते. अशा शहरच्या वस्तीमध्यें राहण्यापासून शरिरावर परिणाम फार वाईट होतात. शहरच्या माणसाची शरीरप्रकृती अगदीं नाजूक व भिकार बनते. त्याला मोकळी हवा, स्वच्छ प्रकाश आणि वनस्पतींची संगती ही कधींच मनसोक्त मिळत नाहींत. मनुष्याची सर्व जीवनकला या तीन साधनांवर अवलंबून आहे. मोकळी हवाही शरिराला गती व चलन देते, स्वच्छ प्रकाश शरिराच्या अंतस्थ यंत्राला सर्व शक्ती देतो आणि वनस्पतींची सृष्टी शरिराच्या वृद्धीला इष्ट असा भूमिप्रांत सनिध आणून ठेविते. या तिन्ही गोष्टी परस्परांत पुष्टीदायक असून त्यांच्या संमेलना पासून शरिराची संपदा अगदीं वर्णनीय अशी बनते. शहराच्या वस्तींतून या तिन्ही साधनांस फांटाच दिलेला असतो. लोक वस्तीची रचनाच अशी होत जाते कीं तेथें प्राणाच्या या तिन्ही जिव्हाळ्यापासून माणूस हा दूर दूर फेंकून दिला जातो. अशा स्थितींत मोठमोठीं क्रीडावनें आणि सार्वजनिक बागबगीचे यांनीं मोकळी हवा, स्वच्छ प्रकाश व वनस्पतींची संगती यांचा लाभ शहरच्या लोकवस्तीला दिला पाहिजे. हीं क्रीडावनें व आरामबाग ह्मणजे खर्चाच्या बाबी होत; पण हा खर्च न केल्यापासून सार्वजनिक आरोग्यावर दुष्परिणाम पुष्कळ घडतात. हे दुष्परिणाम चटकन दृष्टीस पडणारे नसतात. सार्वजनिक आरोग्याला हा खर्च फार आवश्यक आहे पण आमची मुनसिपालिटि या बाबतींत फार काटकसर करणारी दिसते.

क्रीडावनें व आरामबाग यांची आमच्या शहरीं मोठीच उणीव आहे. येथील जुना टॅंपलबगीचा ह्मणजे एक ओसाड व भयाण असा भूमिप्रांत दिसतो. त्यांत येण्या-सारखा असा एकही ह्या शहरीं बगीचा नसावा ही गोष्ट या शहराला मोठी लाजिरवाणी होय. आमच्या शहराच्या मध्य भागांतून नदी वाहत असल्यामुळें शहरच्या दोन्ही भागाला नैसर्गिक शोभा विशेष असून मोकळी हवा व स्वच्छ प्रकाश यांचा लाभ आपोआप अधीक मिळतो व शहराची स्वच्छता अधीक राहते. तथापि येथें क्रीडावनाची आणि आरामाच्या बागाची मोठीच कमतरता आहे.

या दोन्ही गोष्टी आकोल्यास नसल्यामुळें येथील शालागृहांतील विद्यार्थ्यांस देखील नानाविध खेळ खेळण्यास क्रीडास्थळें नाहींत आणि सृष्टी सौंदर्याची महती समजून घेण्याला आणि फुलझाडें, फळझाडें इत्यादिकांची माहिती करून घेण्याला मुख्य साधन जो बागबगीचा तोही आमच्या येथें उपलब्ध नाहीं. विद्यार्थ्यांच्या डोळ्यांपुढें हीं उपवनांचीं नैसर्गिक पुस्तकें अवश्य उघडीं पाहिजेत. छापील पुस्तकांपेक्षां क्रीडावनें व बागबगीचे पुष्कळ गोष्टी अधीक शिकवितात. शाळा खात्यानें देखील ही उणीव अवश्य दूर करण्या सारखी आहे.

## औद्योगिक मंडळी

आकोल्याची औद्योगिक मंडळी झोंपी गेली आहे असा आमचा ग्रह झाला होता. पण तिची आठवण आह्मांस गेल्या ८ दिवसांपूर्वी तिच्या एका समारंभामुळें झाली. हा समारंभ गेल्या ३ रे तारखेस येथील नेटिव जिनिंग व स्पिनिंग फ्याक्टरींत झाला. या वार्षिक समारंभा करितां कुमार श्रीहरभाजी रवाजी हे मुद्दाम बुलढाण्याहून आले होते. या संस्थेची स्थापना यांच्याच हातून दोन वर्षांपूर्वी झालेली आहे. राजश्री कुमार साहेब यांची विलक्षण आस्था व कळकळ पाहून मोठा आनंद वाटतो; आणि त्यांच्या सारख्या मंडळी मुळेंच या औद्योगिक मंडळींत कांहीं जीव आहे असें मानण्यास थोडाबहुत आधार मिळतो. कुमार साहेब आमच्या जिल्ह्यांत होते तेव्हां या मंडळीमध्यें विलक्षण जोम दिसत होता पण त्यांच्या बदलीमुळें ही मंडळी लोपल्या सारखीच झाली. ५० रुपयांचा एक शेअर असे दोन हजार शेअर्स या मंडळीचे आहेत आणि त्यांपैकीं ६९० शेअर्स भरलेले आहेत असें कळतें. या मंडळीच्या हातून पुष्कळ गोष्टी होण्या सारख्या आहेत परंतु काय काय गोष्टी होऊं शकल्या नाहींत अशाविषयींचाच आजचा मुख्य इतिहास आहे.

या कंपनीचा पहिला प्रयत्न फ्लायशटलच्या हातमागाचा उपयोग लोकांस शिकविण्याच्या बाजूनें करण्यांत आला. कांहीं हातमाग तयार करविले, कांहीं कोष्टी जमविले आणि थोडा बहुत माळही या मागांवर काढविला. पण कांहीं तरी कारणें घडून आली. आणि हा प्रयत्न चांगला सफळ झाला नाहीं. वीणकाम शिकण्याला विद्यार्थीच मिळेनासे झाले. आणि या मुळें फ्लायशटलच्या मागांची गोष्ट बाजूस टाकावी लागली. दुसरा प्रयत्न गोरगरीब शेतकऱ्यांस मदत करण्याच्या दिशेनें करण्यांत आला. या बाजूनें थोडीशी यशाची रेषा उमटेल असा अंदाजा आहे. गांव-मंडळी स्थापून पैसा व धान्य त्यांचें भांडवल उभारून त्याची वाटणी शेतकऱ्यामध्येंच कर्जाच्या रूपानें करावी असा या गांव–मंडळीचा उद्देश आहे. या उद्देशाच्या दिशेनें मंडळीचा प्रयत्न चालू आहे. नुकताच जो सहाय्यकारी– मंडळीचा कायदा इंडिया सरकारानें केला आहे त्याच्याच धोरणानें ही गांव–मंडळी पुढें चालविण्यांत येईल. गांव–मंडळीला औद्योगिक मंडळी पैशानें मदत करण्याला तयार आहे.

औद्योगिक मंडळीचा बाकीचा कार्यभाग कल्पना सृष्टीच्या मैदानां बाहेर न आल्यामुळें त्या संबंधानें विशेष उल्लेख करण्याचें सध्यां प्रयोजन दिसत नाहीं. आह्मी राजश्री कुमार साहेब यांचा धन्यवाद गातों कीं त्यांच्या मध्यें औद्योगिक मंडळी विषयीं जी एवढी प्रेमाची कळकळ आहे तीच या संस्थेचा अभ्युदय लवकर समीप आणील.

## बक्षीस समारंभ

उमरावतीस गेल्या शनिवारीं एक उत्कृष्ट बक्षीस–समारंभ झाला. हा रा. रा. गणेश श्रीकृष्ण खापर्डे यांच्या टेलेंजग वाड्यांत झाला. समारंभ तथील दोन नंबराच्या कन्याशाळेंतील मुलींस बक्षिसें वाटण्यासंबंधाचा होता. इतर बक्षीस समारंभापेक्षां या बक्षीस समारंभाला आह्मी विशेष महत्व देतों. येथें सरकारी परीक्षक मंडळींनीं बक्षीसें वाटलीं नाहींत तर स्त्रियांनींच आपला मेळा भरविला आणि नानाविध आनंदाच्या गोष्टी व संभाषणें करून मुलींस बक्षीसें देऊन त्यांचें अभिनंदन केलें. श्रीमती विठाबाई दंडे यांनीं फार परिश्रमानें हा समारंभ घडवून आणिला. या त्या शाळेच्या मुख्य अध्यापक आहेत. श्रीमती सौभाग्यवती लक्ष्मीबाई खापर्डे यांनीं आपल्या मैत्रिणींच्या साह्यानें सर्व कार्यप्रसंग उत्कृष्ट प्रकारें सिद्धीस नेला. स्त्रियांनीं एकत्र जमून असे हळदीकुंकवाचे समारंभ करावे आणि तेथें मुलींस बक्षीसें वांटावी ही गोष्ट आपल्या नेटिव विचाराला फार आवडते. वर्षभरा मागें टिपऱ्यांचा खेळ मुलींकडून करवून पुरुष समुहापुढें मुलींच्या मर्यादशील पणाची भीड थोडी बहुत मोडली अशा संबंधानें कांहीं विचार प्रदर्शित करण्यांत आले होते. या प्रकारच्या आक्षेपांस या समारंभांत बिलकूलच स्थळ मिळालें नाहीं. शनिवारीं सायंकाळीं ५ वाजण्याच्या सुमाराला शेकडों सुवासिनींच्या रम्य व शोभिवंत मूर्ती खापर्ड्यांच्या वाड्यासमोर जेव्हां जमूं लागल्या तेव्हांच बक्षीसें वाटण्याचा तो मंगळ समारंभ फार खुलूं लागला तो आणि आनंदाच्या नानाविध उपसाहित्यांनीं फारच रमणीय असा झाला.

## लढाईची हकीकत

सध्यां लढाईचें मुख्य तोंड ह्मटलें ह्मणजे पोर्ट आरथर होय. पोर्ट आरथरचें रक्षण करण्याकरितां रशियन लोक फार

झटत आहेत पण जपानी लोक तें सर करण्याकरितां विलक्षण प्रयत्न करित आहेत. पोर्ट आरथरच्या आसपासचे घाट, किल्ले, टेकड्या, डोंगर आणि कांहीं ठिकाणें हीं जपाननें काबीज केलीं आहेत. तसेंच पोर्ट आरथरची कांहीं ठिकाणची तटबंदी जपाननें पाडून टाकली असून रशियानें स्वसंरक्षणासाठीं जे सुरुंग पसरले होते तेहि जपाननें काढून टाकले आहेत. येणें प्रयाणें वेळ साधून जपानी लोक पोर्ट आरथरवर एक सारखे हल्ले करीत आहेत. किल्यापासून चार पांच मैलपर्यंत त्यांनीं मजल मारली आहे. किल्यांतील रशियन लोकांसहि मोठी भीति वाटत आहे कीं थोडक्याच दिवसांत एक निकराची व निकालाची लढाई होऊन पोर्ट आरथरचा एकदाचा सोक्षमोक्ष होईल.

पोर्ट आरथरच्या पाठी मागून 'व्हलाडीव्होस्टाकच्या रशियन छावणीचा समाचार घेण्यांत येईल असें अनुमान केलेलें आहे. आणि ह्मणून वरील छावणीचा कडेकोट बंदोबस्त राखण्या बद्दल रशियन सेनापतीचा सक्त हुकूम सुटला आहे. म्यांचुरिआकडे पाऊस झाल्यामुळें लढाईची आग थंडावली आहे. तरी रशियन सैन्यांच्या ट्रेनीच्या ट्रेनी दररोज म्यांचुरिआंत येऊन थडकत आहेत. सध्यां सव्वा लक्षाजवळ जवळ रशियन सैन्य जमलें आहे. पाऊस थिरावल्यावर हा रशियन सेनासमुद्र खवळून जाऊन आपल्या पोटांत जपानी लोकांची आहुती घेईल असा कित्येकांचा तर्क आहे.

---

तिबेटकडील हकीकत विशेष कांहीं नाहीं. तिबेटी लोकांनीं ग्यांटसीचा किल्ला इंग्लिशांच्या स्वाधीन करून द्यावा अशी इंग्रजांची अट पडली आहे व ती अट पुरी करण्याचें तिबेटी लोक सवेशेल नाकारीत आहेत. अर्थात् इंग्रजांना तोफांची सरवत्ती करून किल्ला हस्तगत करून घेणें भाग आलें. सबब त्यांनीं तोफा लावून किल्याच्या कांहीं भिंतीचा भाग पाडून टाकला व ६ ७ तास लढून ग्यांटसी शहरचा कांहीं भागहि घेतला. तिबेटी लोक आपल्या कडून जिवाची आशा न ठेवितां लढत आहेत. तरी इंग्रजी नव्या दमाचें सैन्य लौकरच तेथें जाऊन एकदांचा ग्यांटसीचा किल्ला घेऊन तेथील तिबेटी लोकांस हाकलून देतील असा अदमास आहे.

---

## मृत्यूची आवडी

रूसो-जपानी लढाई सुरूं झाल्यापासून आणि विशेषतः जपान विजयी झाल्यापासून जपानी लोकांचा आयुष्यक्रम, त्यांची राजनीति, त्यांचीं अचाट कृत्यें, त्याचें शौर्यादिगुण वगैरे अनंत गोड गोड कथा पुष्कळ ऐकूं येऊं लागल्या. आणि या कथा मोठ्या प्रेमानें, आवडीनें व गुण लुब्ध होऊन श्रवण करण्याचा छंद श्रोतृजनास फारच लागला. आहे. जपानी लोकांच्या पुष्कळ गुणांपैकीं एक विशेष गुण ह्मटला ह्मणजे मृत्यूची हौसही होय. मनुष्यास स्वतांचा प्राणी अत्यंत प्यारी वस्तू वाटते पण जपानी लोकांस मरण हीच एक प्राणापेक्षांहि प्यार चीज वाटते. सिगारट ओढून झाल्यावर अवशिष्ट भाग जितक्या बेपरवाईनें मनुष्य फेकून देतो तितक्या बेपरवाईनें जपानचे लोक आपला प्राण वेचून टाकतात. त्यांच्या गोष्टी ऐकल्या ह्मणजे पुराणांतारिच्या क्षत्रियां व इतिहासांतील रजपूतांच्या गोष्टीचा फार आठवण होते. पराजित होऊन व शत्रूस पाठवून, आपलें काळें तोंड आपल्या लोकांस दाखविण्यापेक्षां लढाई मारतां मारतां धारातीर्थीं पतन पावण हें लोकांस फार आवडतें.

आमचे हिंदुस्थानचे लोक सुद्धां मरणाच्या कामीं फार शूर आहेत. देवावर हवाला टाकून ते आपल्या मरणाची शांततेनें वाट पहात बसतात. प्लेगाच्या प्रसंगीं हजारों लोक स्वस्थपणें मरत असतांना पाहून पायोनिअर पत्रकर्त्यानीं असें ह्मटलें होतें कीं हिंदुस्थानच्या लोकांनां समाधानवृत्तीनें कसें मरावें हें चांगलें ठाऊक अहे. दुसऱ्या देशामध्यें हिंदुस्थाना प्रमाणें मृत्यूचा कहर उडाला असतां किंवा दुष्काळांनीं ग्रासले असतें तर त्या देशांतील लोक कधींहि असे स्वस्थ राहिलें नसते. पोटाची आग व मृत्यूची धाड या गोष्टींनीं राज्यक्रांत्या घडवून आणल्या आहेत. परंतु हिंदुस्थानच्या लोकांची अशा दुर्धर प्रसंगी दिसणारी स्थिरवृत्ती व मनाची समता फार अवर्णनीय आहे. परंतु ही वृत्ती ह्मणजे मृत्यूची हौस आहे असें मात्र ह्मणतां येणार नाहीं.

जपानी लोकांना लढाईत शत्रूच्या हातीं सांपडण्यापेक्षां मरणें फार आवडतें. आपली पराभव होत आहे असें दिसल्यास शत्रूस शरण गेलें ह्मणजे प्राण रक्षणासाठीं मग कांहीं करावें लागत नाहीं. शत्रूंनीं आपणांस कैदी ह्मणून धरलें तर प्राणत्याग करणें ह्मणजे सध्यांचे काळीं वेडेपणाच होय. असा वेडेपणा प्रत्यक्ष इंग्रज लोकांनीं किंवा बोअर लोकांनीं कधीं केला नाहीं. परंतु जपानी लोकांस असली प्राणधारणा मरणापेक्षांही फार दुःखी कष्टी करिते. शत्रूच्या छावणींत कारागृहवासापेक्षां मृत्यूची संगती अधिक श्रेयकर व प्रियकर आहे असें जपानी लोकांस वाटतें व त्याप्रमाणें पुष्कळ जपानी लोक मोठ्या प्रेमानें आत्महत्या करीत आहेत. ही गोष्ट ते वेडाच्या लहरींत करीत नसून ती त्यांच्या मानी स्वभावास अनुरूपच होत आहे. इतका मानी स्वभाव इतरत्र क्वचितच आढळेल! ज्या प्रमाणें रजपूत स्त्रिया शत्रूच्या हातीं आपलें नखही लागूं ह्मणून त्या मोठ्या शौर्यानें अग्निप्रवेश करीत असत तद्वत जपानी लोक आपले प्राण स्वहस्तें नाहींसे करितात. हीच गोष्ट सध्यांच्या लढाईतल्या मोठ्या चतुराईची व कर्तबगारीची होय. जीवाचा ज्यास यत्किंचितही लोभ आहे त्यांच्या हातून जपानी लोकांसारखी साहसाचीं कामें होणार नाहींत. साहसाच्या कामास असलें पर्वतप्राय कठोर च काळीज पाहिजे! प्रत्यक्ष रशियन लोकही कबूल करितात कीं, जपानी लोकांचे हल्ले इतके कठीण असतात कीं जगांतलें कोणचेंही सैन्य त्यापुढें टिकाव धरणार नाहीं. असले जे जपानी लोक ते काय करूं शकणार नाहींत ? आपले प्राण देऊनच ते आपले प्राण वांचवीत आहेत. आपलीं हाडें, मांस, रक्त व जीव यांचें उत्कृष्ठ खत घालून जपानी लोक जो एक जीवनाचा वृक्ष लावीत आहेत तो कांहीं कालांतरानें फार उंच वाढून त्यास अमृततुल्य गोड फळें आलेलीं दृष्टीस पडतील.

---

## मरून जिवंत रहा

जपानी लोकांना अशाप्रकारें मरण्यामध्यें जी एक प्रकारची हौस वाटते व जो एक प्रकारचा मोठा मान वाटतो तसा आपल्या लोकांना वाटूं लागला तर एक निराळें संकटच आपल्या देशावर ओढवेल. जीवाच्या लोभानें वा आत्महत्या केली असतां शिक्षा होईल या भीतीनें आले लोक, मेल्याप्रमाणें कां होईना, पण जिवंत राहतात हें बरें आहे नाहींतर हिंदुस्थान देश ओसाड पडला असतां व आपल्या सरकारस दासदासी मिळाल्या नसत्या. आपण दुसऱ्यासाठीं दासपणाचीं कामें करितों हा आपण केवढा तरी उपकार करीत आहों व अशा उपकृतींत आपलें आयुष्य जातें ह्मणून आपणांस आपण धन्यच समजलें पाहिजे. दुसऱ्यांनीं आपला कितीहि पाणउतारा केला, व आपणांस कितीहि दुर्जनांनीं संबोधिलें तरी आपण आपली प्रशांत वृती बिघडूं देत नाहीं. आपली साधु वृती आतां इतकीं आपले अंगीं ठाम बाणली आहे कीं, कोणी कसलेंहि कृत्य सांगितलें तरी आपण गपचीप करूं व आपली कितीहि मानखंडणा केली तरी आपण थोडातरी राग किंवा द्वेष कधीं करूं असें कोणी स्वप्नींहि अणूं नये. आपल्या ह्या कोडग्या स्वभावामुळें आपणांस आपल्या पानापमानाची खंतीहि वाटेनाशी झाली आहे. आणि हेंच रक्त व बाळकडू आपल्या मुला बाळांच्या रक्तांत भिनत आहे.

पण ही साधुवृत्ती फार वाईट आहे. असल्या कोडग्या स्वभावामुळें आपण उच्च नीच व चांगलें वाईट यांची ओळख विसरत चाललों आहों. आपल्या उदात्त मनोवृत्ती जागच्या जागीं मरत चालल्या आणि त्यायोगें आपला देशहि मृत्युंगत होऊं पहात आहे. आपण आपलें मन चांगल्या गोष्टींच्या आवडीकडे व वाईट गोष्टींच्या तिरस्काराकडेच वळविलें पाहिजे. ज्या चित्तवृत्ती आपले गुण मुळांतच खुरटून टाकीत आहेत अशा चित्तवृत्तीचा संस्पर्श व विटाळ आपणांस होऊं देतां कामा नये. कोणी दुष्ट आपला देह व मन विटाळीत असल्यास तो विटाळून राहण्यापेक्षां त्याचा नाश आपण आपल्या स्वकरें तात्काळ करावा. सत्कृत्याच्या सुयशासाठीं आणि नीचकृत्याच्या बीमोडासाठीं आपण आपले प्राण देण्यास शिकलें पाहिजे. आणि ह्या शिक्षणांतील पहिला धडा ह्मणजे मेलेलें जिवंत राहण्यापेक्षां मरून जिवंत राहणें बरें हा होय.

---

## साधू समाधिस्त झाले

अंजनी खुर्द ( मेहेकर )

तारीख ७।७।०४

पाऊस पाणी व हवामान ठीक आहे. रोगराई कांहीं नाहीं. टोळधाड पिकाचा फन्ना उडवीत आहेत. भारी दुष्काळाची दुष्चिन्हें अंतःकरणाचा लचका तोडून नागरिकांना हवालदील करून सोडीत आहेत ! ईश्वरी सत्ता काय असेल ती खरी ! ! विदर्भ प्रांतांतील विरज क्षेत्र ज्याला लोणार ह्या आधुनिक नांवानें ओळखतात त्या क्षेत्राची अपूर्व ख्याती ऐकून आनंद न पावणारा प्राणी विरळा ! प्रत्यक्ष पाहून समाधान खास झालेंच पाहिजे. ह्या सुंदर क्षेत्रीं ४० वर्षें ज्यांचा क्षेत्राच्या उर्जितावस्थेंत काळ गेला व ज्यांचें नांव अमर झालें आहे आणि " तनू त्यागितां कीर्ति मागें उरावी " ह्या रामदासोक्ती प्रमाणें ज्यांची विमल सत्कीर्ति नांदत होती, आहे, व राहील अशा सत्पुरुषास अगर परमहंस महाराजांस ईश्वरी विभूती कोण ह्मणणार नाहीं. ह्या क्षेत्री सच्चिदाश्रमस्वामी ह्या नामाभिधानें दीर्घकाल योग क्षेम चालवून ठरलेल्या वेळे प्रमाणें जेष्ट शुद्ध शनिवारीं रात्रीं १२ वांजून २० मिनिटांनीं सदरहु स्वामी निजधामास गेले. सायंकाळ पासून ब्रह्मवृंद कोणी श्रीमद्भगवत्गीतेचें पारायण, कोणी भीष्मस्तवराज व गंगामहात्म्याचे पाठ, कोणी रामनामाचा व नारायण नामाचा गजर व कोणी वेदाचा मंत्रोच्चार करीत होते. महाराज आसनमांडी घालून ध्यानस्थ बसले होते. त्या वेळची त्यांची ध्यानमुद्रा, दिव्यरूप व अनुपम कांती चित्ताकर्षक होती. अशा जयघोषांत महाराज अखंड समाधिस्त झाले नंतर उत्तरक्रियेला प्रारंभ होऊन ती यथायोग्य पूर्ण झाली. दररोज पुराण सुरूं होतें. पुण्यतिथी पर्यंत चार हजारावर पात्र झालें. रात्रीं पालखींतून मिरवणूक निघाली होती. त्यांच्या चीरत्रावर कीर्तन झालें. एकंदर प्रेक्षणीय थाट झाला.

हयांत असतांना महाराजांनीं कधीं फोटो उतरूं दिला नाहीं. अखेर समाधिस्त झाल्यावर फोटो उतरून घेऊन बऱ्याचशा प्रती तयार केल्या होत्या. महाराजांच्या वियोगामळें सर्वत्रांना फार हळहळ वाटत आहे ! तसबिरींतील ध्यानस्थ रूप बघून मनाचें समाधान मानून घेण्यापलीकडे उपाय नाहीं. असो. त्यांचे अल्प जीवनचरित्र लोणार वर्णन नांवाच्या पुस्तकांचे शेवटीं जोडलेलें आहे. व स्वतंत्र चरित्र संस्कृत प्राकृत मिश्र आर्यावृत्तांत रचण्याच्या स्तुत्य उद्योगांत एक गृहस्थ आहेत व त्यांपैकीं दोन भाग तयार झालेले असून ते बरे साधले आहेत.

---

## वऱ्हाडवृत्त

हवामान— पाऊस मधून मधून पडतो. एकंदर पाऊस ९।१० इंच झाला पेरणीचीं कामें झपाट्यानें पुरीं होत आलीं आहेत. किरकोळ हागवण, ताप वगैरे दुखणीं बरींच वाढलीं आहेत.

नवे कमिशनर लेफ्टनंट- कर्नल वारन हेस्टिंगस हे लवकरच तीन चार महिन्यांच्या रजेवर जाणार असून त्या रजेंत राजश्री व्याटन साहेब कमिशनर होतील अशी दाट वदंता आहे.

रा. रा. काशीनाथ श्रीराम नठार असिस्टंट कमिशनर हे रजेवरून परत येऊन वाशिमास आपल्या कामावर रुजू झाले.

---

## वर्तमानसार

**कुऱ्हाडीनें सिंह मारला—** जेतपूर नजीक एका खेडेगांवीं एका भरवाड जातीच्या इसमानें नुकताच कुऱ्हाडीच्या साहायानें एक जंगी सिंह मारल्याची खबर प्रसिद्ध झाली आहे. हा सिंह त्या इसमाच्या घरांत शिरून एक लहान मूल उचलून जात होता. इतक्यांत त्याजकडे घराच्या मालकाची दृष्टी गेल्यामुळें त्यानें त्याचा पाठलाग करून कुऱ्हाडीनें त्यास ठार मारलें.

**परीक्षेचें वेड—** सुमारें वीस वर्षांपासून निरनिराळ्या पदव्या मिळविण्याचा सारखा प्रयत्न करीत असलेले एक गृहस्थ लंडनमध्यें आहेत. या गृहस्थांस आपल्या नांवापुढें अतोनात पदव्या असाव्या अशी फार हौस आहे. त्यांनीं आर्ट्स, लॉ, सायन्स, मेडिसिन वगैरे शाखांतील पदव्या आजपर्यंत मिळविल्या असून त्याशिवाय एम्. आर. सी. एस्. एफ्. आय्. सी. वगैरे पदव्या मिळविल्या आहेत. त्यांच्या नांवापुढें सर्व अक्षरांच्या संख्येपेक्षां अधिक पदव्या हल्लीं आहेत. व आणखी जास्त मिळविण्याचा त्यांचा प्रयत्न चालू आहे. आश्चर्याची गोष्ट ही कीं, ते चांगले विद्वान असून कोणताही धंदा न करितां पदव्या मिळविण्याच्या खटपटींत आपला आयुष्यक्रम करीत आहेत.

**भलताच नियम—** कोणी आजारी असलेला मनुष्य औषध देऊन बरा होणार नाहीं अशी खात्री पटल्यावर त्यास विनाकारण दुःखद स्थितींत न ठेवतां मृत्यु लवकर येण्याचें औषध देण्याचा नियम न्यूयार्क येथील मेडिकल असोसिएशन नांवाच्या मंडळीनें केला आहे. पण हा नियम अगदीं सुमार होय.

**हा काय चमत्कार आहे!—** राजपुतान्यांतील बुंदी नांवाच्या गांवीं चतुर्भुज नांवाच्या देवळाच्या पुजाऱ्याचा एका सापावर पाय पडून तो साप त्यास चावला. पुजाऱ्यास घरीं नेलें, इतक्यांत तो बेशुद्ध झाला. पण पुनः आंथरुणावर बसला व तो पुजारी वदला, तुह्मी औषध वगैरे मिळविण्याच्या नांदी लागूं नका, मी या पुजाऱ्यास मारणार नाहीं. ह्यास मी चावलों तो दोघांचाही अपराध नाहीं. मी उमेचंद नांवाचा सावकार होतों व माझे वंशज हल्लीं येथेंच सावकार आहेत. आतां मला दूध द्या व माझें डोकें पाय पडून सुजलें आहे तें शेका. मी अमुक ठिकाणीं रहातों. हें ऐकून मंडळी दूध घेऊन त्या ठिकाणीं गेली तों तेथें एक सर्प होताच. तो तें दूध प्याला पण त्याचें डोकें शेकण्याची कोणास हिंमत झाली नाहीं ह्मणून त्यांनीं त्या पुजाऱ्याचें डोकें शेकलें. वरील उमेचंदाचे वंशज आज खरोखरच तेथें आहेत. पुजारी आतां अगदीं बरा झाला आहे!

**फार जुने व प्रचंड वृक्ष—** अमेरिकेमधील कालिफोर्निया येथें जुनीं झाडें पुष्कळ आहेत. तितकीं जुनीं झाडें पृथ्वींत इतर ठिकाणीं कोठेंही नाहींत. एकेक झाड ५।६ हजार वर्षांच्या उमरीचें आहे व त्यांची उंची ६०० फूट पर्यंत असते. त्यांच्या फांद्या पासून २० हात रुंदीच्या फळ्या निघतात.

**सालीचीं वस्त्रें—** अमेरिकेंत पानामा संयोगभूमीवर ४०।५० फूट उंचीचीं कांहीं झाडें आहेत त्यांची अंतरसाल अगदीं हुबेहूब रेशमासारखी असते, तिचीं वस्त्रें करितात.

**चमत्कारिक लग्नाचा मासला—** प्रुशिया देशांत कालमर या गांवीं एका गृहस्थाचें एका तरुणीशीं लग्न ठरलें होतें. दैवयोगानें लग्नापूर्वींच कांहीं दिवस वधू मरण पावली ह्मणून पुढें तिच्या वडील बहिणीशीं त्याच्या लग्नाचा वाङनिश्चय ठरला. कर्मधर्मसंयोगानें तीहि बिचारी लग्नापूर्वीं दोनच दिवस मृत्युमुखीं पडली. इतक्यानेंहि वरराज निराश न होतां त्यानीं ह्या दोन्ही मुलींच्या आईलाच शेवटीं आपली गृहिणी केली!!

**अद्भुत चमत्कार—** बऱ्हाणपूर येथील बगीच्या मध्यें त्रिवेणीच्या वृक्षाखालील पारावर अधिक मासानिमित्त श्रीमद्भागवताचा सप्ताह सुरू होता तेव्हां पुराणश्रवणार्थ रात्रौ लहानसें एक पाखरू येत असे व मोठ्या निष्ठेनें पुराण होई पर्यंत बसत असे. पुढें ज्या दिवशीं पुराण समाप्ति झाली त्या दिवशीं होमहवनाचे वेळीं हा निस्सीम पुराणभक्तपक्षी तेथें हजर राहून त्यानें श्रोते मंडळी प्रमाणें हवनास व पुस्तकास आपल्या चोंचीनें व मानेनें नमन केलें व होमकुंडास प्रदक्षिणा घातली. हा सर्व प्रकार श्रोते मंडळी मोठ्या कौतुकानें अवलोकन करीत होती. पुराण समाप्ती नंतर इतर श्रोत्याप्रमाणें हा पक्षी आकाशगामी झाला.

**हा उपदेश बरा काय?—** प्रसिद्ध रशियन तत्वज्ञानी कौंट टॉलस्टॉई यानें लंडन टाइम्समध्यें ९ कॉलमचा एक पत्र व्यवहार प्रसिद्ध केला आहे. यांत त्यानें झारवर कडक टीका करून, 'आपापल्या राजवाड्यांतून चैनींत लोळत पडणाऱ्या लोकांच्या अनीतीच्या महत्वाकांक्षेमुळेंच हें युद्ध उद्भवलें आहे; यासाठीं लोकांनीं व शिपायांनीं लढाईवर जाऊं नये' असा त्यानें त्यांत रशियन लोकांस उपदेश केला आहे!

**एका रशियन महंताचें भविष्य—** या युद्धांत जपानचा विजय होऊन त्याची व चीनची जूट होईल. नंतर चिनीजपानी फौज तयार होऊन आशिया व युरोप पादाक्रांत करील. फ्रान्स व जपान यांची जूट होऊन जर्मनी हतवीर्य होईल. राजक्रांतीचा फायदा घेऊन जपानी लोक पारिसवर झेंडे लावतील, व मग आपल्या ढाला इंग्लंडवर फिरवितील! पण ते त्याजकडून फक्त १ अब्ज पौंड खंडणी घेऊन इंग्लंडचें स्वातंत्र्य कायम राखतील. आशियाटिक लोकांचें वर्चस्व युरोपांत अर्धशतक राहिल्यानंतर युरोपांत जागृती होऊन हें वर्चस्व लयास जाईल; व शेवटीं युरोपांत सर्व राष्ट्रांचें युनायटेड स्टेटस होऊन सर्वत्र शांतता नांदेल!

**विषावर औषधी—** कुणास कोणतेंही विष चढलें, तरी त्यांस मोगली एरंडाचे पानाचा रस काढून पाजावा ह्मणजे विष उतरतें.

**कावळ्यावर धाड—** रंगून येथील म्युनिसिपालिटी, शहरांत कावळे फार घाण करितात ह्मणून, शहरांतील व आसपासचे कावळे मारण्याचा प्रयत्न करीत आहे. हें ऐकून जरा आश्चर्य वाटतें, कारण जेथें कावळे असतात ती जागा स्वच्छ समजली जाते. कावळे हे घाण नाहींशी करणारे प्राणी होत!

**वकिलांचा संप—** पंजाबचे डिस्ट्रिक्ट जज्ज यांनीं, आपल्या कोर्टांतील एका वकिलाचा अपमान केल्यामुळें, त्या कोर्टांतील एकंदर वकिलांनीं सदर जज्जापुढें काम न करण्याविषयीं संप केला आहे असें कळतें. अंगांत मानीपणा अवश्य पाहिजे.

**मोगलाई हुकूम—** सायंकाळचे ४ वाजल्यावर सिमला येथील रस्त्यांतून कुली, नोकर व भंगी ह्या लोकांस फिरण्याची मनाई करण्यांत आली आहे. ही गोष्ट खरी असल्यास इंग्रजी राज्यांत ही गोष्ट मोठ्याच जुलुमाची होय.

**नवें लघु लेखन यंत्र—** स्टीनोटायपर नांवाचें एक नवीन यंत्र निघालें असून त्याच्या योगानें लघुलेखनाचें काम फारच सोपें आणि अल्पकाळांत व अल्पश्रमांत होण्यासारखें आहे. लंडन येथें अनुभव घेऊन पाहतां ह्या यंत्रानें अगदीं थोड्या दिवसांच्या संवयीनें देखील दर मिनिटास शंभरपासून सवाशें शब्द लिहून घेतां येतात.

**युद्धाचा रथ—** एका रशियन शोधकानें, युद्धभूमीवर चालवितां येण्यासारखा, मोटारगाडीप्रमाणें रथ केला आहे. त्याच्या चाकाला चाकूची पातीं लावलीं आहेत. या रथाचा उपयोग, प्रस्तुत जपानाशीं जें युद्ध चाललें आहे, त्यांत जपानी लोकांच्या लहान लहान तुकड्यांचा नाश करण्याकडे चांगला होईल असें त्याच्या कल्पकाचें ह्मणणें आहे.

**चमत्कार खरा—** समुद्रावर वादळ होऊं लागलें ह्मणजे वरवर मोठाल्या लाटा उसळलेल्या दिसतात पण आंत पाहिलें असतां गंभीरता असते; आणि त्याच्याहि खालीं पहावें तर ज्या दिशेनें वारा वहात असतो त्याच्या उलट दिशेनें समुद्राच्या पोटांत पाण्याचे प्रवाह वहात असतात. हा काय चमत्कार आहे!

**फ्रान्सांत ही सुधारणा कशी नाहीं—** फ्रान्स देशांत पाश्चिमात्य चालीप्रमाणें लग्नाच्या पूर्वीं बायकांची मनधरणी करण्याची चाल नाहीं. नेत्रसंकेत, किंवा फार झालें तर साखरेचें चुंबन या पलिकडे अविवाहित स्त्रीपुरुषांनीं एकांतांत फार वेळ बसणें, किंवा दोघांनीं तास अर्धा तास बरोबर हवा खाण्यास जाणें, अथवा बायसिकलवर चढून जाणें, या गोष्टींची मनाई आहे.

**नवऱ्याच्या शिखावर स्त्रीची सत्ता—** अमेरिकेंतील संयुक्त संस्थानांपैकीं पेन्सिल्व्हेनिया येथील एका गृहस्थाची एकदा लहर लागली कीं मद्राशासारखें नेहमीं क्षौर करावें. परंतु पतिराजांना हा विचार पत्नीला पटला नाहीं. तिनें पूर्ण निषेध केला. पतिराज बऱ्या बोलानें ऐकत नाहींत असें पाहतांच पत्नीनें शेवटीं कोर्टांत फिर्याद मांडली! कोर्टानें नवऱ्याच्या शिखांवर बायकोची सत्ता ठरविली. अर्थात त्याला मग मुंडन करतां आलें नाहीं.

**अगदीं साधे चिनी लोक—** चीन देशांत चैनबाजी हा शब्द सुद्धां ठाऊक नाहीं तेथें सामान्य मध्यम प्रतीचे लोक गाड्यांतून बसत नाहींत. त्यांच्या घरीं गाड्याघोडे, आठ बारा आण्यांहून जास्त किंमतीच्या तसबिरी, आरसे, घंटा वगैरे कांहीं नसतात. ट्राम, आगगाड्या, पोस्ट हापीस, तारायंत्र वगैरेंचा उपयोग ते कधीं करीत नाहींत. पलंग, खुर्च्या, मेजें, कपाटें, पुस्तकें, पियानो वगैरे वाद्यें, मद्यें, मेणबत्त्या व नानातऱ्हेचे बैठे खेळ ह्या गोष्टी त्यांना ठाऊक नाहींत. साधे पण सुखी लोक खरे!

**नवीन यंत्र—** जमिनींत व समुद्राच्या तळाशी अशोधित धातूची खाण आहे किंवा नाहीं हें विजेच्या सहायानें तपासून पाहण्याचें एक नवें यंत्र निघालें आहे.

**किड्यांचा नाश करणाऱ्या मुंग्या—** अमेरिकेंत एका शोधकानें कापसाच्या बोंडास लागणाऱ्या किड्याचा नाश करणाऱ्या मुंग्यांचा शोध लाविला आहे. या किड्यास खाऊन रोग नाहींसा करितात. यांचा प्रसार करण्याची खटपट सुरू आहे.

---

## नोटीस

नथू वल्हद हिरालाल खत्री, व रामराव वल्हद सदाशिव पाटील राहणार कजबे देऊळघाट तालुके चिखली, यांस:-

खाली सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुह्मी उभयता व आह्मी उभयता मिळून भुसार व किराणा वगैरेची दुकान नबाब साहेबांचे सराईंत घातली त्यास अजमासे चार वर्षे होत आलीं. नबाबसाहेबांनीं सराई खाली करून मागितल्यावरून तुह्मापैकीं नथू वल्हद हिरालाल यांनीं नवीन दुकान बांधल्यामुळें त्या ठिकाणीं आपली दुकान लाविली आहे. दुकानाचे पुंजी करितां जी आह्मी रक्कम दिली आहे ती तुमचे दुकानेच वहींत जमा आहे. दुकानांत माल किती आला, विक्री काय झाली, माल शिल्लक किती राहिला व आजपर्यंत नफा काय झाला त्याचा हिशोब तुह्मांस मागितला असतां तुह्मी आह्मास देत नाहीं. व हिशोबा संबंधानें अनेक वेळां तुह्मास ह्मटलें असतां हिशोब देतो असे आह्मास चाळवितां. परंतु हिशोब देत नाहीं या वरून तुमचें मनांत पुरी बेमानी आहे असे आह्मी समजतों. ह्मणून ही नोटीस पावल्या पासून आठ दिवसाचे आंत हिशोब दाखवून नफा व मुदल आमचे आह्मांस द्यावे. असे न केल्यास तुमचेवर फिर्याद केली जाईल. व या नोटीसीचे खर्चीसुद्धां पैसे घेतले जातील. कळावें तारीख ७।७।०४ इसवी.

सही.

मिरखा वल्हद फाजलखा राहणार देऊळघाट निशानी खुद्द.

व साळुबा वल्हद बाळा तेली राहणार देऊळघाट दस्तुर खुद्द.

REGISTERED No. N.

बाहेरगांवीं टपालहाशिलांसह ........ २ ६
वर्गणी आगाऊच दिली पाहिजे.
कीरकोळ अंकास....................२ आणे
नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस........ ०१ ०६
दुसरे खेपेस .... .... ....०१

Mofussil ... ... ... 2 ( With postage
All Subscriptions to be paid in advance.
Single copy ...................... 2 as
Advertisement
below 10 lines ...... 2 Rs
Per line over 10 ...... 3 as
Repetitions Per line ,, 2 as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

VOL XXXVIII AKOLA MONDAY 11 JULY 1904 NO 27

वर्ष आकोला सोमवार तारीख ११ माहे जुलै सन १९०४ इ० अंक २७

### कापडाचें दुकान

( एक भाव व माफक दर )

आमच्या दुकानीं सर्व प्रकारचा रेशमी व सुती माल विक्रीस आहे. आमच्या कापडाचे भाव फारच थोडा नफा घेऊन आकारलेले आहेत. बाहेर गांवीं व्हाल्यु-पेबलने माल पाठविण्याची सोय केली आहे. एक वेळ आमच्या दुकानचा माल पडताळून दुकानाच्या सचोटीचा अनुभव अवश्य घ्यावा.

शा० नागसी भाई लध्धा

ठिकाणा—कॉटन मार्केटा समोर कच्छी बाजार, आकोला.

### नोटीस

रुखमी मर्द सदाजी माळी बोराडे राहणार आकोट इजला:-

खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येते कीं तूं मजला तारीख २७ जून १९०४ इसवीचे वऱ्हाडसमाचार पत्रांत नोटीस दिली तिचे उत्तर – सदरहू शेताचे संबंधानें तुजला कांहींच माहिती नाहीं. शेती मजकडेस कोणच्या कारणानें वहितीस आली हें तुजला ठाऊक नसल्यामुळें आतां सज्ञान झाली असें दर्शवून उगीच नोटीस देऊन मजला खर्चांत घातले आहे हें बरोबर नाहीं. सदर्हू शेतें खानापूर व कान्हेरी व आकोट अशा ३ गांवचे जमिनीचे माझे मालकीचे नांवें बक्षिसपत्र असून त्यावरून कबजा माझा आहे. यांपैकीं आकोट येथील जमीन तूच वाहते हें तुझे नोटिसीनें मजला आतां दर्शविले ह्मणून तुला कळवितो कीं ही नोटीस पावले दिवसा पासून ८ दिवसांत माझी जमिन आकोट येथील मजला देऊन निकाल करावा. नाहीं पेक्षा सदर्हू जमिन कबज्यांत मिळण्या बद्दल तुजवर दावा करून खर्च भरून घेईन. कान्हेरी व खानापूर येथील शेतें तुजला आपसांत मी देत नाहीं. तुजला वाटेल तर दिवाणी कोर्टांत दावा करून कबज्यांत घ्यावी याचें उत्तर आल्या बरोबर तुजवर मी दावा करीन हे खूप समजावें. कळावें. तारीख ९ माहे जुलै १९०४ इ०

सही

काशी मर्द रामजी खाजोने माळी राहणार सोमवार-पेठ आकोट निशाणी बांगडी

### नोटीस.

रा० रा० पुंजाजी नारायण राहणार हस्तनापूर तालुके बाळापूर पोस्ट—शेगांव. यांस:—

खाली सही करणार याजकडून कळविण्यांत येते कीं आह्मी तुह्मांस आमचे घर मौजे हस्तनापूर येथील दर महिन्यास २ आणे प्रमाणें भाड्यानें दिले. भाड्यानें दिलेल्या तारखेपासून तों आज तारखेपावेतो भाडें १८४ झालें तें तुह्मी द्यावें व आमची जागा खालीं करून द्यावीं. ही नोटीस पावतांच ८ आठ दिवसांत जागा खाली केली नाहीं तर कोर्टमारफत जागा खाली करून घेऊ व भाड्याचे पैसे व नोटिशीचा खर्च तुमचे पासून भरून घेऊं कळावें. तारीख ७।७।०४ इसवी.

सही.

रंगाजी वल्द बापुजी पाटील राहणार टाकळी खोजबोड तालुके बाळापूर पोष्ट शेगांव निशानी खुद.

### नोटीस

मे० शाबासखा वल्द महिबूबखा मुसलमान राहणार लाखनवाडा बुजरुख तालुके बाळापूर पोष्ट लाखनवाडा. यांस:-

खाली सही करणार याजकडून कळविण्यांत येते कीं आह्मी शेख महिबूब वल्द शेख पीरमहमद राहणार लाखनवाडा यानवर माझे कांहीं रुपये असल्या कारणानें मी त्याचेवर फिर्याद करून हुकूमनामा मिळविला. पुढें त्यानें मला आपसांत तंटा मिटवा ह्मणून ४ पंचा समक्ष ह्मटल्यावरून मी कबूल केलें त्यानंतर तडजोडीचा निकाल होऊन दोन बैल, एक म्हैस, एक गाडी हे घेऊन शिवाय ४० रुपये त्यांनें मजला द्यावे व मी हुकूमनाम्याबद्दल पावती द्यावी असें ठरलें परंतु त्यानें तूर्त रुपये नाहींत मी आठ दिवसानी आणून देतो ह्मणून सांगितल्यावरून मी ती गोष्ट नाकारली तितक्यांत तुह्मी बोलले कीं त्या ४० रुपयाबद्दल एक बैल आहे तो घेत असल्यास मी देतो ते मी कबूल केल्यावर तुह्मी मजला तुमचा बैल दाखविला मी तो पसंत केला. तुह्मी ह्मटले कीं सध्या बैल पाथीवर आहे १।२ दिवसांनीं पोहचता करीन असें तुह्मी ह्मटल्यावरून तुह्मी मजजवळून त्या हुकूमनाम्याबद्दल पावती घेऊन गेले. तुह्मी सभ्य मनुष्य ह्मणून तुमचे खात्रीवर राहून मी देशास गेलो. तुह्मी माझे पश्चात बैल माझे मनुष्याबरोबर लावून दिला. त्याचे दुसरे दिवशींच माझे पश्चात माझे मनुष्या जवळून बैल घेऊन गेले व माझे मनुष्यास सांगितले कीं बैल देत नाहीं मी ( ४० ) रुपये देईन. असे ह्मणून माझा मनुष्य बैल देत नसतां तुह्मी जबरीनें घेऊन गेले व पावती तेथेंच टाकली. देशावरून परत आलों व रुपये तुह्मास मागितले असतां तुह्मी आज देतों उद्या देतो असे ह्मणून चाळविता परंतु रुपये देत नाहीं. व साफ ह्मणता कीं फिर्याद करा. तरी ही नोटीस पावताच ८ दिवसाच्या आंत रुपये ४० व त्याचे आज मित्तो पावेतों व्याज आणून द्यावें शिवाय नोटीशीचा खर्च द्यावा असें मुदतशीर न केल्यास मी कोर्टांत फिर्याद करून या नोटीशीच्या खर्चा सुद्धा व कोर्ट खर्चा सुद्धा सर्व खर्च भरून घेईन. कळावें. तारीख ७।७।०४

सही

दुलीचंद फुलचंद मारवाडी दुकान लाखनवाडा मालक फुलचंद गणेशदास मारवाडी दस्तुर खुद.

### नोटीस

गोविंदा वल्द तानाजी रेवाळे भामटी हल्लीं राहणार ताजनापेठ तेलीपुरा आकोला यांस:—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं २०।६।०४ चे वऱ्हाडसमाचार पत्रांत तूं मजला नोटीस दिली ती खोटी आहे. मी आपले बापाचे घरीं ६ महिने झाले आजारी आहे. तुझे घरीं मी लग्न झाल्यापासून अज्ञानपणांत कदाचित् आले असेन, त्याची मजला आठवणही नाहीं. माझे अज्ञानपणांत माझे बापानें तुला घरजावई केले होते तो करारही तूं पाळीला नाहींस; इतकेंच नाहीं तर आज अजमास १।-१॥ महिना झाला तूं माझे बापाचे घरीं आलास त्यावेळीं माझा बाप तुजला माझे संसारा बद्दल विचार पूस करीत असतां त्यावेळीं गांवातील चार पंचानीं चावडीवर माझे बापास तुझे मारफतीनें बोलावूं पाठविले आणि तूं मजला नांदवीत नाहींस अशी पंचाचे मनाची खात्री झाल्यावर पंचानीं तुजला नांदीव ह्मणून पुष्कळ आग्रह केला परंतु ती गोष्ट तूं नाकबूल करून माझी लुगडें चोळी माझे बापापासून तूं घेऊन मजला तोंडीं घटी फाडून तोंडीं फारकतीही पंचाचे मारफतीनें दिली. करितां मजवर तुझा नवरेपणाचा कांहींच हक्क राहिला नाहीं. व तुझे माझे लग्न झाल्या बद्दल, मी अज्ञान असल्या मुळें मजला कांहींच माहीत नाहीं. तूं तोंडी पंचा समोर फारकती दिलें मुळें मी तुझे घरीं आतां नांदण्यास मुळीच कबूल नाहीं. माझे बापानें माझे अन्नवस्त्रा करितां आजपर्यंत ५०० रुपये खर्च केले आहेत. जो कोणी इतकी रकम माझे बापाची फेडील त्याचे बरोबर मी माझे इच्छे प्रमाणें घरटाव करण्यास मुखत्यार आहे. आतां मजला तुझे तोंडी फारकतीचे आधारें दुसरा घरठाव करण्यास अडचण नसल्यामुळें मी आज मित्ती पासून ८।१५ दिवसाचे आंत दुसरा घरठाव करते. ही नोटीस दिली. कळावें ता० ६।७।०४ इ०

सही

तानी मर्द गोविंदा रेवाळे भामटी राहणार विवर निशाणी हातची बांगडी

### नोटीस

रा. रा. पुंजाजी वल्द सिताराम रंगारी राहणार नांदुरा बुजरुख तालुके मलकापूर यांस:—

खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येते कीं तूं माझा लग्नाचा नवरा असून लग्न झाल्यास सुमारे १५।१६ वर्षे झालीं. मी शहाणी होऊन सुमारें ४ वर्षे झालीं. तुमचे येथें मी शहाणे झाल्यावर ३।४ वेळां राहिले परंतु तुह्मी प्रपंच करण्यास योग्य नाहीं व तुमचे येथें राहूनही प्रपंचसुख मिळेल अशी मुळींच मला खात्री वाटत नाहीं. पंचांनीही मला तुमचे घरीं आणून घातले त्या प्रमाणें मी पंचास मान देऊन राहिल्ये परंतु त्यापासून कांहींच निष्पन्न झालें नाहीं. अशी पंचाचीहि खात्री झाली आहे. ह्मणून तुह्मास मी फारकत मागितली असता तीही देत नाहीं. माझे प्रपंचाचे दिवस व्यर्थ चालले आहेत. मला दुसरा घरटाव केल्यावाचून गत्यंतर नाहीं करितां या नोटिशीनें कळविते कीं ही नोटीस पावतांच आठ दिवसांत मला फारकत देऊन तुमचे ताब्यांतून मुक्त करावें. व मला दुसरा घरटाव करण्यास परवानगी द्यावी. मी आपले आई बापाचे घरीं असतांनां सावकाराचें सुमारे शहाणे झाल्या पासून ह्मणजे ४ चार वर्षांपासून दरसाल ५० रुपये प्रमाणें २०० रुपये कर्ज काढलें. ते देऊन टाकावे व त्यांची पावती घ्यावी असे मुदतींत न केल्यास हीच नोटीस फारकत समजून दुसरा घरटाव करीन. व खावटीचे पैशाबद्दल व नोटीशीचे खर्चाबद्दल कोर्टांत फिर्याद करून सर्व खर्च भरून घेतला जाईल. दुसरा घरटाव केल्यावर मग तुमचे नवरेपणाचा हक्क राहणार नाहीं. मी तुमचे घरीं नांदलेहि असते परंतु तुमचे येथें नांदण्यांतच अर्थ नाहीं ह्मणून दुसरा घरटाव करणें मला भाग आहे. ह्मणून दिली नोटीस. कळावें ता० ८ जूलई १९०४ इसवी.

सही

रुपी मर्द पुंजाजी रंगारी रा. नांदुरे बुजरुक दस्तुर गणपतसा प्रल्हादसा रंगारी रा. निमकवळें दस्तुर खुद.

## नोटीस

बेशमी हेमराज वल्लद रामाजी अळितकर शालनेवाला राहणार शेट तुळशीराम बाबाजी अळीतकर मुक्काम—वांद्रे खाडी यांच्या घरीं. वांद्रे—जिल्हा कुलाबा. यांसः—

खाली सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुमची बहीण नामें सुंदर इजला माझा भाऊ रामचंद्र याजला दिली आणि माझा विवाह तुह्माबरोबर झाला. हा साटालोट्याचा संबंध चार वर्षें पर्यंत ठीक चालला. पुढें उभयपक्षीं वाद पडला तेव्हां उभयपक्षीं हा संबंध तोडण्यांत आला. तुह्मी आपल्या बहिणीचा पाट दुसऱ्याशी लाऊन दिला. स्वतां दुसरें लग्न केलें व त्या लग्ना पासून तुह्माला मूलबाळहि झालें आहे. आणि इकडे माझ्या भावाचेंही दुसरें लग्न झालें. तुह्मी मला तोंडी फारकत दिलेलीच आहे पण मला आतां दुसरा घरठाव करावयाचा आहे तेव्हां मजजवळ तुमची लेखी फारकत लोकांच्या खात्रीसाठीं पाहिजे. तुमचा नवरेपणाचा हक्क पूर्वींच तुटलेला आहे; पण मज गरीबावर कृपाकरून लेखी फारकत ही नोटीस पोचल्या तारखे पासून आठ दिवसाचे आंत पाठवून द्यावी ह्मणजे मी संसाराला लागून दुनियेदारी करीन. आपल्या लेखी फारकतीची वाट पाहूनही उत्तर न येईल तर ही नोटीस हीच फारकत समजून मी दुसरा घरठाव करीन. तुमच्या माहिती करितां ही मुद्दाम जाहिर नोटीस दिली आहे. कळावें. तारीख १० जुलै सन १९०४ इसवी. सही.

तुळसाबाई बाप मोतीराम अळीतकार
राहणार नवाबपुरा, आकोला.
निशाणी बांगडी.

---

## नोटीस

बेशमी— मथुरादास सुरजमल्ल मारवाडी दुकान लाखनवाडा बुजरुख तालुका बाळापूर यांसः—

तुह्मी शुद्धवऱ्हाडी पत्रांतून दिलेली नोटीस पोचली. तुमच्या नोटीशींतला मजकूर पुष्कळसा खोटा आहे. तुमच्या नोटिशींवरून आह्मी गहाणखताची नक्कल काढली तेव्हां कळलें कीं तुह्मी सालबंदी १९९९ पासून सुरू व्हावयाची तेथें १९९८ पासून असें गहाण रोख्यांत लिहून घेतलें आहे. पण हा कागद झाला तेव्हां पंचा समक्षच ठरलें होतें कीं पहिली सालबंदी ११ वर्षानें द्यावयाची आहे. १९९९ सालची पहिली सालबंदी देणें झाल्यावर मी तुह्माकडे ८० रुपये घेऊन आलो. आणि ६० रुपये १ ले सालबंदीकडे आणि बाकीचे रुपये चिल्हरखात्याकडे जमा करावे असें ह्मटलें असतां तुह्मी हो ह्मणून वेळ मारून नेली आणि मागाहून ह्मणूं लागला कीं चिल्हर खात्यांतच सर्व रकम जमा केली. पुढें तुमच्याच ह्मणण्या प्रमाणें दोन्ही सालबंदीचे सव्याज रुपये देऊं लागलों तर तुह्मी नोटिशींत लटापटीच्या गोष्टी सांगतां या रितीची तुमची लबाडी मरकार चालूं देणार नाहीं हें पक्कें समजावें. मी तुमचे रुपये अमानत ठेविले आहेत. तुमच्या दुकानावरही समक्ष घेऊन येतो. ते घेऊन थकलेल्या दोन्ही सालबंदीची चुकती पावती द्यावी. असें करणें नसल्यास तुह्मी आमच्यावर बेलाशक दिवाणींत दावा करावा. सर्व खर्च तुह्मावर पडेल. कळावें. तारीख १० माहे जुलै सन १९०४ इसवी. सही

रहिमानखा वल्लद नामदारखा
राहणार लाखनवाडा बुजरुख
दस्तुर खुद्द.

---

वऱ्हाडसमाचार

मिती जेष्ठ वद्य १३ शके १८२६

---

## क्रीडोपवनें

आमच्या गांवाला रम्य क्रीडावनाची व आरामाच्या बागबगिच्यांची मोठी उणीव आहे. शहरच्या वस्तीला या गोष्टी फार आवश्यक आहेत. घराला घरें अगदीं लागून असून मलमूत्रादिकांच्या विसर्जनामुळें प्रत्येक घराचे विशिष्ट भाग अगदीं दूषित होऊन गेलेले असतात; आणि शहराची लोकसंख्या पुष्कळच वाढत गेल्यामुळें लोकांची खेंचाखेची व गर्दी मोठी होत असते. अशा शहरच्या वस्तीमध्यें राहण्यापासून शरिरावर परिणाम फार वाईट होतात. शहरच्या माणसाची शरीरप्रकृती अगदीं नाजूक व भिकार बनते. त्याला मोकळी हवा, स्वच्छ प्रकाश आणि वनस्पतींची संगती ही कधींच मनसोक्त मिळत नाहींत. मनुष्याची सर्व जीवनकला या तीन साधनांवर अवलंबून आहे. मोकळी हवाही शरिराला गती व चलन देते, स्वच्छ प्रकाश शरिराच्या अंतःस्थ यंत्राला सर्व शक्ती देतो आणि वनस्पतींची सृष्टी शरिराच्या वृद्धीला इष्ट असा भूमिप्रांत संनिध आणून ठेविते. या तिन्ही गोष्टी परस्परांत पुष्टीदायक असून त्यांच्या संमेलना पासून शरिराची संपदा अगदीं वर्णनीय अशी बनते. शहराच्या वस्तींतून या तिन्ही साधनांस फांटाच दिलेला असतो. लोक वस्तीची रचनाच अशी होत जाते कीं तेथें प्राणाच्या या तिन्ही जिव्हाळ्यापासून माणूस हा दूर दूर फेंकून दिला जातो. अशा स्थितींत मोठमोठीं क्रीडावनें आणि सार्वजनिक बागबगीचे यांनीं मोकळी हवा, स्वच्छ प्रकाश व वनस्पतींची संगती यांचा लाभ शहरच्या लोकवस्तीला दिला पाहिजे. हीं क्रीडावनें व आरामबाग ह्मणजे खर्चाच्या बाबी होत; पण हा खर्च न केल्यापासून सार्वजनिक आरोग्यावर दुष्परिणाम पुष्कळ घडतात. हे दुष्परिणाम चटकन दृष्टीस पडणार नसतात. सार्वजनिक आरोग्याला हा खर्च फार आवश्यक आहे पण आमची मुनसिपालिटी या बाबतींत फार काटकसर करणारी दिसते.

क्रीडावनें व आरामबाग यांची आमच्या शहरीं मोठीच उणीव आहे. येथील जुना टेंपलबगीचा ह्मणजे एक ओसाड व भयाण असा भूमिप्रांत दिसतो. नांव घेण्यासारखा असा एकही ह्या शहरीं बगीचा नसावा ही गोष्ट या शहराला मोठी लाजिरवाणी होय. आमच्या शहराच्या मध्य भागांतून नदी वाहत असल्यामुळें शहरच्या दोन्ही भागाला नैसर्गिक शोभा विशेष असून मोकळी हवा व स्वच्छ प्रकाश यांचा लाभ आपोआप अधीक मिळतो व शहराची स्वच्छता अधीक राहते. तथापि येथें क्रीडावनाची आणि आरामाच्या बागाची मोठीच कमतरता आहे.

या दोन्ही गोष्टी आकोल्यास नसल्यामुळें येथील शालागृहांतील विद्यार्थ्यांस देखील नानाविध खेळ खेळण्यास क्रीडास्थळें नाहींत आणि सृष्टी सौंदर्याची महती समजून घेण्याला आणि फुलझाडें, फळझाडें इत्यादिकांची माहिती करून घेण्याला मुख्य साधन जो बागबगीचा तोही आमच्या येथें उपलब्ध नाहीं. विद्यार्थ्यांच्या डोळ्यांपुढें हीं उपवनांचीं नैसर्गिक पुस्तकें अवश्य उघडीं पाहिजेत. छापील पुस्तकांपेक्षां क्रीडावनें व बागबगीचे पुष्कळ गोष्टी अधीक शिकवितात. शाळा खात्यानें देखील ही उणीव अवश्य दूर करण्या सारखी आहे.

---

## औद्योगिक मंडळी

आकोल्याची औद्योगिक मंडळी झोंपी गेली आहे असा आमचा ग्रह झाला होता. पण तिची आठवण आह्मांस गेल्या ८ दिवसांपूर्वी तिच्या एका समारंभामुळें झाली. हा समारंभ गेल्या ३ रे तारखेस येथील नेटिव जिनिंग व स्पिनिंग फ्याक्टरींत झाला. या वार्षिक समारंभा करितां कुमार श्रीहरभाऊजी रवाजी हे मुद्दाम बुलढाण्याहून आले होते. या संस्थेची स्थापना यांच्याच हातून दोन वर्षांपूर्वीं झालेली आहे. राजश्री कुमार साहेब यांची विलक्षण आस्था व कळकळ पाहून मोठा आनंद वाटतो; आणि त्यांच्या सारख्या मंडळी मुळेंच या औद्योगिक मंडळींत कांहीं जीव आहे असें मानण्यास थोडाबहुत आधार मिळतो. कुमार साहेब आमच्या जिल्ह्यांत होते तेव्हां या मंडळीमध्यें विलक्षण जोम दिसत होता पण त्यांच्या बदलीमुळें ही मंडळी लोपल्या सारखीच झाली. ५० रुपयांचा एक शेअर असे दोन हजार शेअर्स या मंडळीचे आहेत आणि त्यापैकीं ६५० शेअर्स भरलेले आहेत असें कळतें. या मंडळीच्या हातून पुष्कळ गोष्टी होण्या सारख्या आहेत परंतु काय काय गोष्टी होऊं शकल्या नाहींत अशाविषयींचाच आजचा मुख्य इतिहास आहे.

या कंपनीचा पहिला प्रयत्न फ्लायशटलच्या हातमागाचा उपयोग लोकांस शिकविण्याच्या बाजूनें करण्यांत आला. कांहीं हातमाग तयार करविले, कांहीं कोष्टी कर्मचारी आणि थोडा बहुत मालही या मागांवर काढविला. पण कांहीं तरी कारणें घडून आली. आणि हा प्रयत्न चांगला सफळ झाला नाहीं. वीणकाम शिकण्याला विद्यार्थीच मिळेनासे झाले. आणि या मुळें फ्लायशटलच्या मागांची गोष्ट बाजूस टाकावी लागली. दुसरा प्रयत्न गोरगरीब शेतकऱ्यांस मदत करण्याच्या दिशेनें करण्यांत आला. या बाजूनें थोडीशी यशाची रेषा उमटेल असा अंदाजा आहे. गांव-मंडळी स्थापून पैसा व धान्य त्यांचें भांडवल उभारून त्याची वाटणी शेतकऱ्यामध्येंच कर्जाच्या रूपानें करावी असा या गांव—मंडळीचा उद्देश आहे. या उद्देशाच्या दिशेनें मंडळीचा प्रयत्न चालू आहे. नुकतांच जो सहाय्यकारी— मंडळीचा कायदा इंडिया सरकारानें केला आहे त्याच्याच धोरणानें ही गांव—मंडळी पुढें चालविण्यांत येईल. गांव—मंडळीला औद्योगिक मंडळी पैशानें मदत करण्याला तयार आहे.

औद्योगिक मंडळीचा बाकीचा कार्यभाग कल्पना सृष्टीच्या मैदानां बाहेर न आल्यामुळें त्या संबंधानें विशेष उल्लेख करण्याचें सध्यां प्रयोजन दिसत नाहीं. आह्मी राजश्री कुमार साहेब यांचा धन्यवाद गातों कीं त्यांच्या मध्यें औद्योगिक मंडळी विषयीं जी एवढी प्रेमाची कळकळ आहे तीच या संस्थेचा अभ्युदय लवकर समीप आणील.

---

## बक्षीस समारंभ

उमरावतीस गेल्या शनिवारीं एक उत्कृष्ट बक्षीस-समारंभ झाला. हा रा. रा. गणेश श्रीकृष्ण खापर्डे यांच्या टोलेजंग वाड्यांत झाला. समारंभ तेथील दोन नंबराच्या कन्याशाळेंतील मुलींस बक्षिसें वाटण्यासंबंधाचा होता. इतर बक्षीस समारंभापेक्षां या बक्षीस समारंभाला आह्मी विशेष महत्व देतों. येथें सरकारी परीक्षक मंडळींनीं बक्षीसें वाटलीं नाहींत तर स्त्रियांनींच आपला मेळा भरविला आणि नानाविध आनंदाच्या गोष्टी व संभाषणें करून मुलींस बक्षीसें देऊन त्यांचें अभिनंदन केलें. श्रीमती विठाबाई दंडे यांनीं फार परिश्रमानें हा समारंभ घडवून आणिला. या त्या शाळेच्या मुख्य अध्यापक आहेत. श्रीमती सौभाग्यवती लक्ष्मीबाई खापर्डे यांनीं आपल्या मैत्रिणींच्या साह्यानें सर्व कार्यप्रसंग उत्कृष्ट प्रकारें सिद्धीस नेला. स्त्रियांनीं एकत्र जमून असे हळदीकुंकवाचे समारंभ करावे आणि तेथें मुलींस बक्षीसें वांटावी ही गोष्ट आपल्या नेटीव विचारांला फार आवडते. वर्षभरामागें टिपऱ्यांचा खेळ मुलींकडून करवून पुरुष समुहापुढें मुलींच्या मर्यादशीळपणाची भीड थोडी बहुत मोडली अशा संबंधानें कांहीं विचार प्रदर्शित करण्यांत आले होते. या प्रकारच्या आक्षेपांस या समारंभांत बिलकूलच स्थळ मिळालें नाहीं. शनिवारीं सायंकाळीं ५ वाजण्याच्या सुमाराला शेकडों सुवासिनींच्या रम्य व शोभिवंत मूर्ती खापर्ड्यांच्या वाड्यासमोर जेव्हां जमूं लागल्या तेव्हांच बक्षीसें वाटण्याचा तो मंगल समारंभ फार खुलूं लागला तो आणि आनंदाच्या नानाविध उपसाहित्यांनीं फारच रमणीय असा झाला.

---

## लढाईची हकीकत

सध्यां लढाईचें मुख्य तोंड ह्मटलें ह्मणजे पोर्ट आरथर होय. पोर्ट आरथरचें रक्षण करण्याकरितां रशियन लोक फार

# ORIENLTAL

**GOVERNMENT SECURITY**

LIFE ASSURANCE COMPANY, LIMITED.

Established 1874,

Head Office—**BOMBAY**

*Chief Agency for C. P. Berar & Khandesh*

Head—quarters—Nagpur, C. P.

FUNDS EXCEED

## TWO CRORES AND TEN LAKHS

Claims paid for over One Crore and Fifteen Lakhs.

**IMMEDIATE SETTLEMENT OF CLAIMS**

IF there be one thing of more importance than another in connection with Life Assurance, it is, when Claims arise, that the amount due under the Policy be paid to the Claimants at the earliest possible date. This the Directors of the "Oriental" keep well before them, and act up to treating their clients with the utmost liberality.

UNQUESTIONABLE SECURITY

IT is not sufficient to read that a Company's Funds amount to given sum, but it is essential to know how such Funds are invested if in miscellaneous and risky investments or how secured.

THE Funds of the "Oriental" are invested in Government Securities, and lodged with the Government Official Trustee of Bombay in terms of the Company's Trust Deed, as Security for Claims arising through decease of assured lives, and endowment policies matured.

GOVERNMENT Officers, Professional men, Tradesmen and others, by employing a portion of their annual income or profits in effecting life policies, at once create a fund equivalent to the savings of many years.

CREDITORS who expect the repayment of debts at some future period, may protect themselves from loss by the failure of life in the intermediate period, by an assurance on the life of the debtor

NO man can be sure how long he will live; and although he may save money, yet if he die early, before he has had time to save much, his wife and family may be in distress. Life Assurance, is a means by which this danger is got over. Life being so uncertain, the sooner a man makes up his mind to assure his life the better. Once satisfied of the propriety of the step, do not delay. There are numerous instances in the records of the 'Oriental' where the delay of a month or less, has left the family without the intended provision.

INFLUENTIAL AND ENERGETIC AGENTS WANTED. FOR TERMS PLEASE APPLY TO UNDER—SIGNED.

Prospectuses, forms, and any further information, can be obtained on application to—

M. De SOUZA,
CHIEF AGENT
*for C. P. Berar and Khandesh,*



## मुंबई बँकचीं सेव्हिंग्स बँक

या बँकेंत खालीं लिहिल्या अटीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ली जानेवारी आणि ३१ डिसेंबर यांच्या दरम्यान एक हजार रुपया पर्यंत पैसा ठेविता येईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नावावर ठेविता येतील. आणि तो पैसा त्या पैकीं एकास अथवा जास्त इसमास अगर त्यापैकीं मयताचे मागें राहील त्यास काढतां येईल.

व्याज दरसाल दर शेंकडा ३ तीन रुपया प्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं.

नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक } J. Kinniburgh
आकोला ४।७।०३ } एजंट



## जाहिरात

स्टोअर सप्लायर्स

आह्मी गिरण्या, जिनिंग फॅक्टरी, म्युनिसिपालिटी, वाटरवर्क्स, इंजिनिअर्स इरिगेशन लोकल बोर्डस् वगैरेना लागणारे व मुंबईतील इतर सर्व प्रकारचे सामान फारच माफक दरानें पुरवितों.

धी ग्लोब स्टोअर्स कंपनी.
जनरल मरचन्टस
काळबा देवी पोस्ट
मुंबई.


☞ हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.


ॐनमःश्री .णशाय.

आर्यवनौषधालय— मुर्डी ता० दापोली

आमच्या खात्रीच्या औषधांचा गुण शंभरांतून एक दोन रोग्यास कदाचित् न आला तर पैसे परत देऊं व त्याचे आरोग्यार्थ जाणखी एखादें उत्तम औषध द्यावें लागल्यास तें फुकट देऊं.

### मदनामृतसंजीवनी

धातुवर्धक, अत्यंत कामोत्तेजक व पौष्टिक, वीर्यस्तंभक, रक्तशोधक, मनोत्साहक, कांतिवृद्धिवर्धक, अशी सुवर्णमाक्षिक, मौक्तिक, कस्तुरी व अनेक बनस्पतीमिश्र अद्भुत

## गुटिका

उपयुक्त वनस्पतींचें मिश्रण केलें असा त्यामुळें यांत अपायकारक पदार्थ मुळींच नसून खालील विकारावर या अत्यंत उपयोगी आहेत.

यांच्या सेवनानें नपुसकत्व, स्वप्नजन्य व इतर धातुपात, उन्हाळे, इंद्रिय शिथिलता कडकी, गर्मी संबंधीं मुरलेले विकार, मूत्रसं, कोच, धातूचा पातळपणा, स्त्रियांची धुपणी छातींतील रोग, हातपाय, मूत्रस्थान व नेत्र यांचा दाह, क्षय पांडुरोग, मुलाची खर, जीर्णज्वर, अग्निमांद्य, मस्तकशूल, मूळव्याधी वातरोग, निद्रानाश, पित्तविकार, बाळंतरोग मुष्टिमैथुनादि घातक संवयीनें आलेली कृशता इत्यादि अनेक विकार खात्रीनें बरे होऊन शरीर निरोगी, मजबूत व सतेज बनतें, पचन शक्ति व स्मरण शक्ति भरपूर वाढून धातु व रक्त यांची वृद्धि, वीर्यस्तंभन व भरपूर कामोद्दीपन होतें. शक्ती भरपूर वाढून मनास उत्साह येतो. दूध व जडान्न भरपूर पचूं लागतें. गुणाबद्दल असंख्य सर्टिफिकिटा मिळाल्या व नित्य मिळत आहेत. पथ्य सेवनाची गरज मुळींच नसून स्त्रिया, पुरुष, व मुलें यांस पाहिजे त्या दिवसांत घेण्यास अत्यंत उपयोगी आहे.

गुटिका रुपयाचे आंत मिळणार नाहींत एकदम चार रुपयांवर कितीही घेणारास टपाल खर्च माफ. चार रुपयांचे आंत ट० ८६ आणे पडेल. अनुपान चिठ्ठी सोबत रोखीनें किंवा व्ही. पी. नें खालील पत्त्यावर मिळतील. दरः—

| | | | |
|---|---|---|---|
| ३५ गो० | १ रु० | ७५ गो० | २ रु० |
| ११५ गो० | ३ रु० | १६५ गो० | ४ रु० |
| २७५ गो० | ६ रु० | ५५० गो० | १० रु० |

आमचेकडे या शिवाय मोठमोठे रोगांवर अनेक औषधें असून ग्रंथस्थ रसायनें धातूंचीं भस्में, पाक गुटिका वगैरेही माफक दरानें मिळतात विशेष गुणवर्णनाचा सर्व सामानाचा मोठा क्याटलाग मागवावा, फुकट देऊं टपाल खर्च वेगळा पडेल. रोखीनें किंवा व्ही. पी. नें पाठवूं.

सूचना—— अलीकडे २।३ वर्षे आंजर्लें वगैरे ठिकाणीं केवळ आपमतलबी ढोंगी लोकांच्या जाहिरातीस ऊत आला असून त्यानीं आमचेच जाहिरातीची हुबेहूब कापी करून ते ग्राहकांचे डोळ्यांत धूळ फेकीत आहेत. करितां आमची सकल देशबंधूस अशी सविनय प्रार्थना आहे कीं, ज्यांस खरी शास्त्रोक्त औषधें घेणें असतील त्यानीं आमचीच औषधें खालील बिनचूक सही पत्त्यावरच मागवावी.

पत्ता-कृष्णशास्त्री पेंडसे वैद्य.
मु० मुर्डी ता. दापोली
जि० रत्नागिरी




चिन्हें अंतःकरणाचा लचका तोडून नागरिकांना हवालदील करून सोडीत आहेत ! ईश्वरी सत्ता काय असेल ती खरी ! ! विदर्भ प्रांतांतील विरज क्षेत्र ज्याला लोणार ह्या आधुनिक नांवानें ओळखतात त्या क्षेत्राची अपूर्व ख्याती ऐकून आनंद न पावणारा प्राणी विरळा ! प्रत्यक्ष पाहून समाधान खास झालेंच पाहिजे. ह्या सुंदर क्षेत्रीं ४० वर्षे ज्यांचा क्षेत्राच्या उर्जितावस्थेंत काळ गेला व ज्यांचें नांव अमर झालें आहे आणि "तनू त्यागितां कीर्ति मागें उरावी" ह्या रामदासोक्ती प्रमाणें ज्यांची विमल सत्कीर्ति नांदत होती, आहे, व राहील अशा सत्पुरुषास अगर परमहंस महाराजांस ईश्वरी विभूती कोण ह्मणणार नाहीं. ह्या क्षेत्री सच्चिदाश्रमस्वामी ह्या नामाभिधानें दीर्घकाल योग क्षेम चालवून ठरलेल्या वेळे प्रमाणें जेष्ट शुद्ध शनिवारीं रात्रौं १२ वाजून २० मिनिटांनीं सदरहु स्वामी निजधामास गेले. सायंकाळ पासून ब्रह्मवृंद कोणी श्रीमद्भगवद्गीतेचें पारायण, कोणी भीष्मस्तवराज व गंगामहात्म्याचे पाठ, कोणी रामनामाचा व नारायण नामाचा गजर व कोणी वेदाचा मंत्रोच्चार करीत होते. महाराज आसनमांडी घालून ध्यानस्थ बसले होते. त्या वेळची त्यांची ध्यानमुद्रा, दिव्यरूप व अनुपम कांती चित्ताकर्षक होती. अशा जयघोषांत महाराज अखंड समाधिस्त झाले नंतर उत्तरक्रियेला प्रारंभ होऊन ती यथायोग्य पूर्ण झाली. दररोज पुराण सुरूं होतें. पुण्यतिथी पर्यंत चार हजारावर पात्र झालें. रात्रीं पालखींतून मिरवणूक निघाली होती. त्यांच्या चीरत्रावर कीर्तन झालें. एकंदर प्रेक्षणीय थाट झाला.

हयांत असतांना महाराजांनीं कधीं फोटो उतरूं दिला नाहीं. अखेर समाधिस्त झाल्यावर फोटो उतरून घेऊन बऱ्याचशा प्रती तयार केल्या होत्या. महाराजांच्या वियोगामळें सर्वत्रांना फार हळहळ वाटत आहे ! तसबिरींतील ध्यानस्थ रूप बघून मनाचें समाधान मानून घेण्यापलीकडे उपाय नाहीं. असो. त्यांचे अल्प जीवनचरित्र लोणार वर्णन नांवाच्या पुस्तकांचे शेवटीं जोडलेलें आहे. व स्वतंत्र चरित्र संस्कृत प्राकृत मिश्र आर्यावृत्तांत रचण्याच्या स्तुत्य उद्योगांत एक गृहस्थ आहेत व त्यापैकीं दोन भाग तयार झालेले असून ते बरे साधले आहेत.

## वऱ्हाडवृत्त

हवामान— पाऊस मधून मधून पडतो. एकंदर पाऊस ९।१० इंच झाला पेरणीचीं कामें झपाट्यानें पुरीं होत आलीं आहेत. किरकोळ हागवण, ताप वगैरे दुखणीं बरींच वाढलीं आहेत.

नवे कमिशनर लेफ्टेनंट- कर्नल वारन हेस्टिंगस हे लवकरच तीन चार महिन्यांच्या रजेवर जाणार असून त्या रजेंत राजश्री व्याटन साहेब कमिशनर होतील अशी दाट वदंता आहे.

रा. रा. काशीनाथ श्रीराम जठार असिस्टंट कमिशनर हे रजेवरून परत येऊन वाशिमास आपल्या कामावर रुजू झाले.

## वर्तमानसार

झटत आहेत पण जपानी लोक तें सर करण्याकरितां विलक्षण प्रयत्न करित आहेत. पोर्ट आरथरच्या आसपासचे घाट, किल्ले, टेकड्या, डोंगर आणि कांहीं ठिकाणें ही जपाननें काबीज केलीं आहेत. तसेंच पोर्ट आरथरची कांहीं ठिकाणची तटबंदी जपाननें पाडून टाकली असून रशियानें स्वसंरक्षणासाठीं जे सुरुंग पसरले होते तेहि जपाननें काढून टाकले आहेत. येणें प्रमाणें वेळ साधून जपानी लोक पोर्ट आरथरवर एक सारखे हल्ले करीत आहेत. किल्यापासून चार पांच मैलपर्यंत त्यांनीं मजल मारली आहे. किल्यांतील रशियन लोकांसहि मोठी भीति वाटत आहे कीं थोडक्याच दिवसांत एक निकराची व निकालाची लढाई होऊन पोर्ट आरथरचा एकदाचा सोक्षमोक्ष होईल.

पोर्ट आरथरच्या पाठी मागून 'व्हलाडीव्होस्टाकच्या रशियन छावणीचा समाचार घेण्यांत येईल असें अनुमान केलेलें आहे. आणि ह्मणून वरील छावणीचा कडेकोट बंदोबस्त राखण्या बद्दल रशियन सेनापतीचा सक्त हुकूम सुटला आहे. म्यांचुरिआकडे पाऊस झाल्यामुळें लढाईची आग थंडावली आहे. तरी राशीयन सैन्याच्या ट्रेनीच्या ट्रेनी दररोज म्यांचुरिआंत येऊन थडकत आहेत. सध्यां सव्वा लक्षाजवळ जवळ रशियन सैन्य जमलें आहे. पाऊस स्थिरावल्यावर हा रशियन सेनासमुद्र खवळून जाऊन आपल्या पोटांत जपानी लोकांची आहुती घेईल असा कित्येकांचा तर्क आहे.

---

तिबेटवरील हकीकत विशेष कांहीं नाहीं. तिबेटी लोकांनीं ग्यांटसीचा किल्ला इंग्लिशांच्या स्वाधीन करून द्यावा अशी इंग्रजांची अट पडली आहे व ती अट पुरी करण्याचें तिबेटी लोक सवेशेल नाकारीत आहेत. अर्थात् इंग्रजांना तोफांची सरबत्ती करून किल्ला हस्तगत करून घेणें भाग आलें. सबब त्यांनीं तोफा लावून किल्याच्या कांहीं भिंतीचा भाग पाडून टाकला व ६ ७ तास लढून ग्यांटसी शहरचा कांहीं भागहि घेतला. तिबेटी लोक आपल्या कडून जिवाची आशा न ठेवितां लढत आहेत. तरी इंग्रजी नव्या दमाचें सैन्य लौकरच तेथें जाऊन एकदांचा ग्यांटसीचा किल्ला घेऊन तेथील तिबेटी लोकांस हाकलून देतील असा अदमास आहे.

---

### मृत्यूची आवडी

रुसो-जपानी लढाई सुरूं झाल्यापासून आणि विशेषतः जपान विजयी झाल्यापासून जपानी लोकांचा आयुष्यक्रम, त्यांची राजनीति, त्यांचीं अचाट कृत्यें, त्यांचे शौर्यादिगुण वगैरे अनंत गोड गोड कथा पुष्कळ ऐकूं येऊं लागल्या. आणि या कथा मोठ्या प्रेमानें, आवडीनें व गुण लुब्ध होऊन श्रवण करण्याचा छंद श्रोतृजनास फारच लागला आहे. जपानी लोकांच्या पुष्कळ गुणांपैकीं एक विशेष गुण ह्मटला ह्मणजे मृत्यूची हौसही होय. मनुष्यास स्वतांचा प्राणी अत्यंत प्यारी वस्तु वाटते पण जपानी लोकांस मरण हीच एक प्राणापेक्षांहि प्यार चीज वाटते. सिगारट ओढून झाल्यावर अवशिष्ट भाग जितक्या बेपरवाईनें मनुष्य फेकून देतो तितक्या बेपरवाईनें जपानचे लोक आपला प्राण वेचून टाकतात. त्यांच्या गोष्टी ऐकल्या ह्मणजे पुराणांतरीच्या क्षत्रियां व इतिहासांतील रजपूतांच्या गोष्टींचा फार आठवण होते. पराजित होऊन व शत्रूस पाठवून, आपलें काळें तोंड आपल्या लोकांस दाखविण्यापेक्षां लढाई मारतां मारतां धारातीर्थी पतन पावणे हें लोकांस फार आवडतें.

आमचे हिंदुस्थानचे लोक मुद्धां मरणाच्या कामीं फार शूर आहेत. देवावर हवाला टाकून ते आपल्या मरणाची शांततेनें वाट पहात बसतात. प्लेगाच्या प्रसंगीं हजारों लोक स्वस्थपणें मरत असतांना पाहून पायोनिअर पत्रकर्त्यांनीं असें ह्मटलें होतें कीं हिंदुस्थानच्या लोकांनां समाधानवृत्तीनें कसें मरावें हें चांगलें ठाऊक आहे. दुसऱ्या देशामध्यें हिंदुस्थाना प्रमाणें मृत्यूचा कहर उडाला असतां किंवा दुष्काळांनीं ग्रासले असतें तर त्या देशांतील लोक कधींहि असे स्वस्थ राहिलें नसते. पोटाची आग व मृत्यूची धाड या गोष्टींनीं राज्यक्रांत्या घडवून आणल्या आहेत. परंतु हिंदुस्थानच्या लोकांची अशा दुर्धर प्रसंगी दिसणारी स्थिरवृत्ती व मनाची समता फार अवर्णनीय आहे. परंतु ही वृत्ती ह्मणजे मृत्यूची हौस आहे असें मात्र ह्मणतां येणार नाहीं.

जपानी लोकांना लढाईत शत्रूच्या हातीं सांपडण्यापेक्षां मरणें फार आवडतें. आपली पराभव होत आहे असें दिसल्यास शत्रूस शरण गेलें ह्मणजे प्राण रक्षणासाठीं मग कांहीं करावें लागत नाहीं. शत्रूंनीं आपणांस कैदी ह्मणून धरलें तर प्राणत्याग करणें ह्मणजे सध्यांचे काळीं वेडेपणाच होय. असा वेडेपणा प्रत्यक्ष इंग्रज लोकांनीं किंवा बोअर लोकांनीं कधीं केला नाहीं. परंतु जपानी लोकांस असली प्राणधारणा मरणापेक्षांही फार दुःखी कष्टी करिते. शत्रूच्या छावणींत कारागृहवासापेक्षां मृत्यूची संगती अधिक श्रेयकर व प्रियकर आहे असें जपानी लोकांस वाटतें व त्याप्रमाणें पुष्कळ जपानी लोक मोठ्या प्रेमानें आत्महत्या करीत आहेत. ही गोष्ट ते वेडाच्या लहरींत करीत नसून ती त्यांच्या मानी स्वभावास अनुरूपच होत आहे. इतका मानी स्वभाव इतरत्र क्वचितच आढळेल! ज्या प्रमाणें रजपूत स्त्रिया शत्रूच्या हातीं आपलें नखही लागूं ह्मणून त्या मोठ्या शौर्यानें अग्निप्रवेश करीत असत तद्वत जपानी लोक आपले प्राण स्वहस्तें नाहींसे करितात. हीच गोष्ट सध्यांच्या लढाईतल्या मोठ्या चतुराईची व कर्तबगारीची होय. जीवाचा ज्यास यत्किंचितही लोभ आहे त्यांच्या हातून जपानी लोकांसारखी साहसाचीं कामें होणार नाहींत. साहसाच्या कामास असलें पर्वतप्राय कठोरच काळीज पाहिजे! प्रत्यक्ष रशियन लोकही कबूल करित आहेत कीं, जपानी लोकांचे हल्ले इतके कठीण असतात कीं जगांतलें कोणतेंही सैन्य त्यापुढें टिकाव धरणार नाहीं. असले जे जपानी लोक ते काय करूं शकणार नाहींत ! आपले प्राण देऊनच ते आपले प्राण वांचवीत आहेत. आपलीं हाडें, मांस, रक्त व जीव यांचें उत्कृष्ट खत घालून जपानी लोक जो एक जीवनाचा वृक्ष लावीत आहेत तो कांहीं कालांतरानें फार उंच वाढून त्यास अमृततुल्य गोड फळें आलेलीं दृष्टीस पडतील.

---

### मरून जिवंत रहा

जपानी लोकांना अशाप्रकारें मरण्यामध्यें जी एक प्रकारची हौस वाटते व जो एक प्रकारचा मोठा मान वाटतो तसा आपल्या लोकांना वाटूं लागला तर एक निराळें संकटच आपल्या देशावर ओढवेल. जीवाच्या लोभानें वा आत्महत्या केली असतां शिक्षा होईल या भीतीनें आले लोक, मेल्याप्रमाणें कां होईना, पण जिवंत राहतात हें बरें आहे नाहींतर हिंदुस्थान देश ओसाड पडला असतां व आपल्या सरकारास दासदासी मिळाल्या नसत्या. आपण दुसऱ्यासाठीं दासपणाचीं कामें करितों हा आपण केवढा तरी उपकार करीत आहों व अशा उपकृतींत आपलें आयुष्य जातें ह्मणून आपणांस आपण धन्यत्व समजलें पाहिजे. दुसऱ्यांनीं आपला कितीहि पाणउतारा केला, व आपणांस कितीहि दुर्वचनांनीं संबोधिलें तरी आपण आपली प्रशांत वृत्ती बिघडूं देत नाहीं. आपली साधु वृत्ती आतां इतकी आपले अंगीं ठाम बाणली आहे कीं, कोणी कसलेंहि कृत्य सांगितलें तरी आपण गपचीप करूं व आपली कितीहि मानखंडणा केली तरी आपण थोडातरी राग किंवा द्वेष कधीं करूं असें कोणी स्वप्नींहि आणूं नये. आपल्या ह्या कोडग्या स्वभावामुळें आपणांस आपल्या पानापमानाची खंतीहि वाटेनाशी झाली आहे. आणि हेंच रक्त व बाळकडू आपल्या मुला बाळांच्या रक्तांत भिनत आहे.

पण ही साधुवृत्ती फार वाईट आहे. असल्या कोडग्या स्वभावामुळें आपण उच्च नीच व चांगलें वाईट यांची ओळख विसरत चाललों आहों. आपल्या उदात्त मनोवृत्ती जागच्या जागीं मरत चालल्या आणि त्यायोगें आपला देशहि मृत्युंगत होऊं पहात आहे. आपण आपलें मन चांगल्या गोष्टींच्या आवडीकडे व वाईट गोष्टींच्या तिरस्काराकडेच वळविलें पाहिजे. ज्या चित्तवृत्ती आपले गुण मुळांतच खुरटून टाकीत आहेत अशा चित्तवृत्तींचा संस्पर्श व विटाळ आपणांस होऊं देतां कामा नये. कोणी दुष्ट आपला देह व मन विटाळीत असल्यास तो विटाळून राहण्यापेक्षां त्याचा नाश आपण आपल्या स्वकरें तात्काळ करावा. सत्कृत्याच्या सुयशा साठीं आणि नीचकृत्याच्या बीमोडा साठीं आपण आपले प्राण देण्यास शिकलें पाहिजे. आणि ह्या शिक्षणांतील पहिला धडा ह्मणजे मेलेलें जिवंत राहण्यापेक्षां मरून जिवंत राहणें हें हा होय.

---

### साधू समाधिस्त झाले

अंजनी खुर्द (मेहेकर)

तारीख ७।७।०४

पाऊस पाणी व हवामान ठीक आहे. रोगराई कांहीं नाहीं. टोळधाड पिकाचा फन्ना उडवीत आहेत. भावी दुष्काळाची दुष्ट चिन्हें अंतःकरणाचा लचका तोडून नागरिकांना हवालदील करून सोडीत आहेत ! ईश्वरी सत्ता काय असेल ती खरी ! ! विदर्भ प्रांतांतील विरज क्षेत्र ज्याला लोणार ह्या आधुनिक नांवानें ओळखतात त्या क्षेत्राची अपूर्व ख्याती ऐकून आनंद न पावणारा प्राणी विरळा ! प्रत्यक्ष पाहून समाधान खास झालेंच पाहिजे. ह्या सुंदर क्षेत्रीं ४० वर्षे ज्यांचा क्षेत्राच्या उर्जितावस्थेंत काळ गेला व ज्यांचें नांव अमर झालें आहे आणि "तनू त्यागितां कीर्ति मागें उरावी" ह्या रामदासोक्ती प्रमाणें ज्यांची विमल सत्कीर्ति नांदत होती, आहे, व राहील अशा सत्पुरुषास अगर परमहंस महाराजांस ईश्वरी विभूती कोण ह्मणणार नाहीं. ह्या क्षेत्रीं सच्चिदाश्रमस्वामी ह्या नामाभिधानें दीर्घकाल योग क्षेम चालवून ठरलेल्या वेळे प्रमाणें जेष्ट शुद्ध शनिवारीं रात्रौ १२ वाजून २० मिनिटांनीं सदरहु स्वामी निजधामास गेले. सायंकाळ पासून ब्रह्मवृंद कोणी श्रीमद्भगवद्गीतेचें पारायण, कोणी भीष्मस्तवराज व गंगामहात्म्याचे पाठ, कोणी रामनामाचा व नारायण नामाचा गजर व कोणी वेदाचा मंत्रोच्चार करीत होते. महाराज आसनमांडी घालून ध्यानस्थ बसले होते. त्या वेळची त्यांची ध्यानमुद्रा, दिव्यरूप व अनुपम कांती चित्ताकर्षक होती. अशा जयघोषांत महाराज अखंड समाधिस्त झाले नंतर उत्तरक्रियेला प्रारंभ होऊन ती यथायोग्य पूर्ण झाली. दररोज पुराण सुरूं होतें. पुण्यतिथी पर्यंत चार हजारावर पात्र झालें. रात्रीं पालखींतून मिरवणूक निघाली होती. त्यांच्या चीरत्रावर कीर्तन झालें. एकंदर प्रेक्षणीय थाट झाला.

हयांत असतांना महाराजांनीं कधीं फोटो उतरूं दिला नाहीं. अखेर समाधिस्त झाल्यावर फोटो उतरून घेऊन बऱ्याचशा प्रती तयार केल्या होत्या. महाराजांच्या वियोगामुळें सर्वत्रांना फार हळहळ वाटत आहे ! तसबिरींतील ध्यानस्थ रूप बघून मनाचें समाधान मानून घेण्यापलीकडे उपाय नाहीं. असो. त्यांचे अल्प जीवनचरित्र लोणार वर्णन नांवाच्या पुस्तकाचे शेवटीं जोडलेलें आहे. व स्वतंत्र चरित्र संस्कृत प्राकृत मिश्र आर्यावृत्तांत रचण्याच्या स्तुत्य उद्योगांत एक गृहस्थ आहेत व त्यांपैकीं दोन भाग तयार झालेले असून ते बरे साधले आहेत.

---

### वऱ्हाडवृत्त

हवामान— पाऊस मधून मधून पडतो. एकंदर पाऊस ९।१० इंच झाला पेरणीचीं कामें झपाट्यानें पुरीं होत आलीं आहेत. किरकोळ हागवण, ताप वगैरे दुखणीं बरींच वाढलीं आहेत.

नवे कमिशनर लेफ्टेनंट- कर्नेल वारन हेस्टिंगस हे लवकरच तीन चार महिन्यांच्या रजेवर जाणार असून त्या रजेंत राजश्री व्यायन साहेब कमिशनर होतील अशी दाट वदंता आहे.

रा. रा. काशीनाथ श्रीराम जठार असिस्टंट कमिशनर हे रजेवरून परत येऊन वाशिमास आपल्या कामावर रुजू झाले.

---

### वर्तमानसार

**कुऱ्हाडीनें सिंह मारला**— जेतपूर नजीक एका खेडेगांवीं एका भरवाड जातीच्या इसमानें नुकताच कुऱ्हाडीच्या साहायानें एक जंगी सिंह मारल्याची खबर प्रसिद्ध झाली आहे. हा सिंह त्या इसमाच्या घरांत शिरून एक लहान मूल उचलून जात होता. इतक्यांत त्याजकडे घराच्या मालकाची दृष्टी गेल्यामुळें त्यानें त्याचा पाठलाग करून कुऱ्हाडीनें त्यास ठार मारलें.

**पदवीचें वेड**-सुमारें वीस वर्षांपासून निरनिराळ्या पदव्या मिळविण्याचा सारखा प्रयत्न करीत असलेले एक गृहस्थ लंडनमध्यें आहेत. या गृहस्थांस आपल्या नांवापुढें अतोनात पदव्या असाव्या अशी फार हौस आहे. त्यांनीं आर्ट्स, लॉ, सायन्स, मेडिसिन वगैरे शाखांतील पदव्या आजपर्यंत मिळविल्या असून त्याशिवाय एम्. आर. सी. एस्. एफ्. आय्. सी. वगैरे पदव्या मिळविल्या आहेत. त्यांच्या नांवापुढें सर्व अक्षरांच्या संख्येपेक्षां अधिक पदव्या हल्लीं आहेत. व आणखी जास्त मिळविण्याचा त्यांचा प्रयत्न चालू आहे. आश्चर्याची गोष्ट ही कीं, ते चांगले विद्वान असून कोणताही धंदा न करितां पदव्या मिळविण्याच्या खटपटींत आपला आयुष्यक्रम करीत आहेत.

**भलताच नियम**— कोणी आजारी असलेला मनुष्य औषध देऊन बरा होणार नाहीं अशी खात्री पटल्यावर त्यास विनाकारण दुःखद स्थितींत न ठेवतां मृत्यु लवकर येण्याचें औषध देण्याचा नियम न्यूयार्क येथील मेडिकल असोसिएशन नांवाच्या मंडळीनें केला आहे. पण हा नियम अगदीं सुमार होय.

**हा काय चमत्कार आहे!**— राजपुतान्यांतील बुंदी नांवाच्या गांवीं चतुर्भुज नांवाच्या देवळाच्या पुजाऱ्याचा एका सापावर पाय पडून तो साप त्यास चावला. पुजाऱ्यास घरीं नेलें, इतक्यांत तो बेशुद्ध झाला. पण पुनः अंथरुणावर बसला व तो पुजारी वदला, तुह्मी औषध वगैरे मिळविण्याच्या नांदीं लागूं नका, मी या पुजाऱ्यास मारणार नाहीं. ह्यास मी चावलों तो दोघांचाही अपराध नाहीं. मी उमेचंद नांवाचा सावकार होतों व माझे वंशज हल्लीं येथेंच सावकार आहेत. आतां मला दूध द्या व माझें डोकें पाय पडून सुजलें आहे तें शेका. मी अमुक ठिकाणीं रहातों. हें ऐकून मंडळी दूध घेऊन त्या ठिकाणीं गेली तों तेथें एक सर्प होताच. तो तें दूध प्याला पण त्याचें डोकें शेकण्याची कोणास हिंमत झाली नाहीं ह्मणून त्यांनीं त्या पुजाऱ्याचें डोकें शेकलें. वरील उमेचंदाचे वंशज आज खरोखरच तेथें आहेत. पुजारी आतां अगदीं बरा झाला आहे!

**फार जुने व प्रचंड वृक्ष**— अमेरिके मधील कालिफोर्निया येथें जुनीं झाडें पुष्कळ आहेत. तितकीं जुनीं झाडें पृथ्वींत इतर ठिकाणीं कोठेंही नाहींत. एकेक झाड ५१५ हजार वर्षांच्या उमरीचें आहे व त्यांची उंची ६०० फूट पर्वेतों असते. त्यांच्या फांद्या पासून २० हात रुंदीच्या फळ्या निघतात.

**सालीचीं वस्त्रें**— अमेरिकेंत पानामा संयोगभूमीवर ४०५० फूट उंचीचीं कांहीं झाडें आहेत त्यांची अंतरसाल अगदीं हुबेहूब रेशमासारखी असते, तिचीं वस्त्रें करितात.

**चमत्कारिक लग्नाचा मामला**— रुशिया देशांत कालमर या गांवीं एका गृहस्थाचें एका तरुणीशीं लग्न ठरलें होतें. दैवयोगानें लग्नापूर्वीच कांहीं दिवस वधू मरण पावली ह्मणून पुढें तिच्या वडील बहिणीशीं त्याच्या लग्नाचा वाङ्निश्चय ठरला. कर्मधर्मसंयोगानें तीहि बिचारी लग्नापूर्वी दोनच दिवस मृत्युमुखीं पडली. इतक्यानेंहि वरराज निराश न होतां त्यानें ह्या दोन्ही मुलींच्या आईलाच शेवटीं आपली गृहिणी केली!!

**अद्भुत चमत्कार**— बऱ्हाणपूर येथील बगीच्या मध्यें त्रिवेणीच्या वृक्षाखालील पारावर अधिक मासानिमित्त श्रीमद्भागवताचा सप्ताह सुरू होता तेव्हां पुराणश्रवणार्थ रात्रीं लहानसें एक पाखरू येत असे व मोठ्या निष्ठेनें पुराण होई पर्यंत बसत असे. पुढें ज्या दिवशीं पुराण समाप्ति झाली त्या दिवशीं होमहवनाचे वेळीं हा निस्सीम पुराणभक्तपक्षी तेथें हजर राहून त्यानें श्रोते मंडळी प्रमाणें हवनास व पुस्तकास आपल्या चोंचीनें व मानेनें नमन केलें व होमकुंडास प्रदक्षिणा घातली. हा सर्व प्रकार श्रोते मंडळी मोठ्या कौतुकानें अवलोकन करीत होती. पुराण समाप्ती नंतर इतर श्रोत्याप्रमाणें हा पक्षी आकाशगामी झाला.

**हा उपदेश बरा काय?**— प्रसिद्ध रशियन तत्वज्ञानी कौंट टॉलस्टॉई यानें लंडन टाइम्समध्यें ९ कॉलमचा एक पत्रव्यवहार प्रसिद्ध केला आहे. यांत त्यानें झारवर कडक टीका करून, 'आपापल्या राजवाड्यांतून चैनींत लोळत पडणाऱ्या लोकांच्या अनीतीच्या महत्वाकांक्षेमुळेंच हें युद्ध उद्भवलें आहे; यासाठीं लोकांनीं व शिपायांनीं लढाईवर जाऊं नये' असा त्यानें त्यांत रशियन लोकांस उपदेश केला आहे!

**एका रशियन महंताचें भविष्य**— या युद्धांत जपानचा विजय होऊन त्याची व चीनची लूट होईल. नंतर चिनीजपानी फौज तयार होऊन आशिया व युरोप पादाक्रांत करील. फ्रान्स व जपान यांची लूट होऊन जर्मनी हतवीर्य होईल. राजक्रांतीचा फायदा घेऊन जपानी लोक पारिसवर झेंडे लावतील, व मग आपल्या दाला इंग्लंडवर फिरवितील! पण ते त्याजकडून फक्त १ अब्ज पौंड खंडणी घेऊन इंग्लंडचें स्वातंत्र्य कायम राखतील. आशियाटिक लोकांचें वर्चस्व युरोपांत अर्ध शतक राहिल्यानंतर युरोपांत जागृती होऊन हें वर्चस्व लयास जाईल; व शेवटीं युरोपांत सर्व राष्ट्रांनीं युनायटेड स्टेट्स होऊन सर्वत्र शांतता नांदेल!

**विषावर औषधी**— गुराला कोणतेंही विष बाधलें, तरी त्यास मोगली एरंडाचे पानाचा रस काढून पाजावा ह्मणजे विष उतरतें.

**कावळ्यावर धाड**— रंगून येथील म्युनिसिपालिटी, शहरांत कावळे फार घाण करितात ह्मणून, शहरांतील व आसपासचे कावळे मारण्याचा प्रयत्न करीत आहे. हें ऐकून जरा आश्चर्य वाटतें, कारण जेथें कावळे असतात ती जागा स्वच्छ समजली जाते. कावळे हे घाण नाहींशी करणारे प्राणी होत!

**वकिलांचा संप**— पंजाबचे डिस्ट्रिक्ट जज्ज यांनीं, आपल्या कोर्टांतील एका वकिलाचा अपमान केल्यामुळें, त्या कोर्टांतील एकंदर वकिलांनीं सदर जज्जापुढें काम न करण्याविषयीं संप केला आहे असें कळतें. अंगांत मानीपणा अवश्य पाहिजे.

**मोगलाई हुकूम**— सायंकाळचे ४ वाजल्यावर सिमला येथील रस्त्यांतून कुली, नोकर व भंगी ह्या लोकांस फिरण्याची मनाई करण्यांत आली आहे. ही गोष्ट खरी असल्यास इंग्रजी राज्यांत ही गोष्ट मोठ्याच जुलुमाची होय.

**नवें लघु लेखन यंत्र**— स्टीनोटायपर नांवाचें एक नवीन यंत्र निघालें असून त्याच्या योगानें लघुलेखनाचें काम फारच सोपें आणि अल्पकाळांत व अल्पश्रमांत होण्यासारखें आहे. लंडन येथें अनुभव घेऊन पाहतां ह्या यंत्रानें अगदीं थोड्या दिवसांच्या संवयीनें देखील दर मिनिटास शंभरपासून सवाशें शब्द लिहून घेतां येतात.

**युद्धाचा रथ**— एका रशियन शोधकानें, युद्धभूमीवर चालवितां येण्यासारखा, मोटारगाडीप्रमाणें रथ केला आहे. त्याच्या चाकाला चाकूचीं पातीं लावलीं आहेत. या रथाचा उपयोग, प्रस्तुत जपानाशीं जें युद्ध चाललें आहे, त्यांत जपानी लोकांच्या लहान लहान तुकड्यांचा नाश करण्याकडे चांगला होईल असें त्याच्या कल्पकाचें ह्मणणें आहे.

**चमत्कार खरा**— समुद्रावर वादळ होऊं लागलें ह्मणजे वरवर मोठाल्या लाटा उसळलेल्या दिसतात पण आंत पाहिलें असतां गंभीरता असते; आणि त्याच्याहि खालीं पहावें तर ज्या दिशेनें वारा वहात असतो त्याच्या उलट दिशेनें समुद्राच्या पोटांत पाण्याचे प्रवाह वहात असतात. हा काय चमत्कार आहे!

**फ्रान्सांत ही सुधारणा कशी नाहीं**— फ्रान्स देशांत पाश्चिमात्य चालीप्रमाणें लग्नाच्या पूर्वी बायकांची मनधरणी करण्याची चाल नाहीं. नेत्रसंकेत, किंवा फार झालें तर साखरेचें चुंबन या पलिकडे अविवाहित स्त्रीपुरुषांनीं एकांतांत फार वेळ बसणें, किंवा दोघांनीं तास अर्धातास बरोबर हवा खाण्यास जाणें, अथवा बायसिकलवर बसून जाणें, या गोष्टींची मनाई आहे.

**नवऱ्याच्या शिरावर स्त्रीची सत्ता**— अमेरिकेंतील संयुक्त संस्थानांपैकीं पेन्सिल्व्हेनिया येथील एका गृहस्थाची एकदा लहर लागली कीं मद्राशासारखें नेहमीं क्षौर करावें. परंतु पतिराजांचा हा विचार पत्नीला पटला नाहीं. तिनें पूर्ण निषेध केला. पतिराज बायकोचें ऐकत नाहींत असें पाहतांच पत्नीनें शेवटीं कोर्टांत फिर्याद मांडली! कोर्टानें नवऱ्याच्या शिरावर बायकोची सत्ता ठरविली. अर्थात त्याला मग मुंडन करतां आलें नाहीं.

**अगदीं साधे चिनी लोक**— चीन देशांत चैनबाजी हा शब्द सुद्धां ठाऊक नाहीं तेथें सामान्य मध्यम प्रतीचे लोक गाड्यांतून बसत नाहींत. त्यांच्या घरीं गाद्यागिरदे, आठ बारा आण्यांहून जास्त किंमतीच्या तसबिरी, आरसे, घंटा वगैरे कांहीं नसतात. ट्राम, आगगाड्या, पोस्ट हार्णेस, तारायंत्र वगैरेंचा उपयोग ते कधीं करीत नाहींत. पलंग, खुर्च्या, मेजें, कपाटें, पुस्तकें, पियानो वगैरे वाद्यें, मद्यें, मेणबत्त्या व नानातऱ्हेचे बैठे खेळ ह्या गोष्टी त्यांना ठाऊक नाहींत. साधे पण सुखी लोक खरे!

**नवीन यंत्र**— जमिनींत व समुद्राच्या तळाशीं अशोधित धातूची खाण आहे किंवा नाहीं हें विजेच्या सहायानें तपासून पाहण्याचें एक नवें यंत्र निघालें आहे.

**किड्यांचा नाश करणाऱ्या मुंग्या**— अमेरिकेंत एका शोधकानें कापसाच्या बोंडास लागणाऱ्या किड्याचा नाश करणाऱ्या मुंग्यांचा शोध लाविला आहे. या किड्यास खाऊन रोग नाहींसा करितात. यांचा प्रसार करण्याची खटपट सुरू आहे.

## नोटीस

नथू वल्लद हिरालाल खत्री, व रामराव वल्लद सदाशीव पाटील राहणार कजबे देऊळघाट तालुके चिखली, यांसः—

खालीं सही करणार यानकडून नोटीस देण्यांत येते कीं तुह्मी उभयता व आह्मी उभयता मिळून भुसार व किराणा वगैरेची दुकान नवाब साहेबांचे सराईंत घातली त्यास अजमासे चार वर्षें होत आलीं. नवाबसाहेबांनीं सराई खालीं करून मागितल्यावरून तुह्मापैकीं नथू वल्लद हिरालाल यांनीं नवीन दुकान बांधल्यामुळें त्या ठिकाणीं आपली दुकान लाविली आहे. दुकानाचे पुंजी करितां जी आह्मीं रकम दिली आहे ती तुमचे दुकानचे वहींत जमा आहे. दुकानांत माल किती आला, विक्री काय झाली, माल शिल्लक किती राहिला व आजपर्यंत नफा काय झाला त्याचा हिशोब तुह्मांस मागितला असतां तुह्मी आह्मास देत नाहीं. व हिशोबा संबंधानें अनेक वेळां तुह्मास ह्मटलें असतां हिशोब देतो असें आह्मास चाळवितां. परंतु हिशोब देत नाहीं या वरून तुमचें मनांत पुरी बेमानी आहे असें आह्मी समजतों. ह्मणून ही नोटीस पावल्या पासून आठ दिवसाचें आंत हिशोब दाखवून नफा व मुद्दल आमचे आह्मांस द्यावे. असें न केल्यास तुमचेवर फिर्याद केली जाईल. व या नोटीसीचे खर्चीसुद्धां पैसे घेतले जातील. कळावें तारीख ७।७।०४ इसवी.

सही.

मिरखा वल्लद फानलखा राहणार देऊळघाट निशानी खुद.

व साकुबा वल्लद बाबा तेली राहणार देऊळघाट दस्तुर खुद.

REGISTERED No. N. 4

वर्गणी आगाऊच दिली पाहिजे.
किरकोळ अंकास.....................२ आणे
नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस..........८१ ०१
दुसरे खेपेस .... .... ....८१

adrance.
Single copy ........................ 2 as
Advertisement
below 10 lines ...... 2 R
Per line over 10 ......3 as
Repetitions Per line „ 2 as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

VOL XXXVIII AKOLA MONDAY 18 JULY 1904 NO 28

वर्ष ३८ आकोला सोमवार तारीख १८ माहे जुलै सन १९०४ इ० अंक २८

## नाग, नरसे, पिठोरी व जिवत्या.

आह्मी येथें विक्रीकरितां नाग, नरसे, जिवत्या आणि पिठोरी किंवा पाठोरा व त्यांत बुध व बृहस्पती हीं चित्रें ठेविलीं आहेत. चित्रें फारच सुरेख व पहिल्यापेक्षां त्यांत फरक करून उत्तम प्रकारचीं छापिलीं आहेत. ज्यांना पाहिजे असतील त्यांनीं खालील पत्त्यावर मनिआरडर पाठविली असतां सदर्हू चित्राचे कागद पाठवून देऊं. चित्रांचा दर शेंकडा १ रुपया प्रमाणें पडेल. व टपाल खर्च निराळा पडेल.

बाळकृष्ण अनाबा दलाल
कंपाझिटर.
वऱ्हाडसमाचार आफिस आकोला.

## कापडाचें दुकान

( एक भाव व माफक दर )

आमच्या दुकानीं सर्व प्रकारचा रेशमी व सुती माल विक्रीस आहे. आमच्या कापडाचे भाव फारच थोडा नफा घेऊन आकारलेले आहेत. बाहेर गांवीं व्हाल्यु-पेबलने माल पाठविण्याची सोय केली आहे. एक वेळ आमच्या दुकानचा माल पडताळून दुकानाच्या सचोटीचा अनुभव अवश्य घ्यावा.

शा० नागसी भाई लध्धा
ठिकाणा—कॉटन मार्केटा समोर
कच्छी बाजार, आकोला.

## नोटीस

रा. रा. बळीराम नारायण पाटिल बकटे रा. वडाळी पोस्ट नांदुरा ता० मलकापूर यांसः—

खालीं सही करणार याजकडून कळविण्यांत येते कीं माझे शेत मौजे वडाळी ता. मलकापूर येथील सर्वे नं' ३३ पैकीं नंबर १ चा एकर गुंठे १०८३९ आकार रुपये २९ चे शेत त्याचा निमे हिस्सा तुह्मा पाशी मी सन १८९४ सालीं ४०० रुपयास ताबे गहाण करून दिला. रुपये देण्याचा करार तीन वर्षांचा होता. मुदत झाल्यावर आह्मी कांहीं दिवसांनीं ४०० रुपये घेऊन आलों असतां तुह्मी रुपये न घेतां आमचे शेत आह्मास वापस करीत नाहीं. यावरून तुमचे मनांत आमचे शेत पचविण्याचे आहे असें करणें बरोबर नाहीं. तुह्मी रुपये घेतले नाहींत ह्मणून मी गणू पाटील रा० आमसरी ता० मलकापूर याजपाशीं अनामत ठेविले आहे. तरी ते रुपये घेऊन माझें शेत माझे ताब्यांत द्यावे असें मुदतींत न केल्यास मी रितीप्रमाणें कोर्टांत फिर्याद करून शेत कबज्यांत घेईन. गणू पाटील यांचे पाशीं रुपये अनामत ठेविलें दिवसापासून तों कोर्टाचा निकाल लागेपर्यंत दरमहा दोन रुपये शेकडा व्याज घेतले जाईल. कारण मी शेत वापस मिळावें ह्मणून सावकारी कर्ज काढलें आहे. त्याचे व्याज मला द्यावे लागेल ह्मणून माझें नुकसान न करितां व कोर्टाची पायरी चढवून देतां माझें मला शेत परत करावें ह्मणून अगाऊ सूचना केली आहे. या नोटिशीचा खर्च तुमचेवर असे कळावें. ता. १९।७।०४ इ.

सही
गणू व. येडू बकटे कुणबी
रा. वडाळी ता. मलकापूर
निशाणी खुद्द.

## नोटीस

बेशमी पुती मर्दे कडताराम शिंपी राहणार किसन वल्लद पांडू शिंपी यांचे घरीं वस्ती सावरगांव तालुका जळगांव इसः—

खालीं सही करणार याजकडून या जाहीर नोटिशीनें कळविण्यांत येतें कीं तूं माझी लग्नाची बायको आहेस. तूं अलीकडे आपल्या माहेरच्या सांगण्या वरून माझें घर सोडून चालती झाली आहेस. तुला तुझ्या मामाच्या घरून १२ महिन्या पुर्वी आणिलें पण पुनः तुझ्या आईची प्रकृती बिघडली आहे ह्मणून निघून गेलीस ती अजून आली नाहींस. इतकेंच नाहीं तर मी समक्ष आणण्या साठीं आलो तेव्हां तुझा बाप व दुसरे नातलग हे मला मारण्याला धावले. त्यावरून मी फौजदारींत फिर्यादीही केली होती. आतां या नोटिशीनें कळवितों कीं ही नोटीस पावल्या पासून आठ दिवसाच्या आंत माझ्या घरीं येऊन जनारिती प्रमाणें संसार करूं लागावा. असें करण्यांस चुकशील तर तुजवर दिवाणी व फौजदारी करून तुला ताब्यांत घेण्याची तजवीज करीन. लबाड व लुच्चा आप्तांच्या सांगण्यावरून तूं फसूं नयेस ह्मणून ही सूचना मुद्दाम केली आहे. आणि तुझा ताबा घेत असतांना जे माझ्या आड येतील त्यांच्यावरही फिर्याद करून सर्व नुकसानीसुद्धां योग्य ती दाद मिळविली जाईल. कळावें. तारीख १९ जुलै १९०४ इसवी.

सही
कडताराम बाबाजी शिंपी
राहणार आसलगांव
दस्तुर खुद्द

---

मोगल राजांच्या अमलांत व विशेषतः अकबर बादशहाच्या कारकीर्दींत त्यानें हिंदुयोद्ध्यांकडे सेनापतित्व सोंपवून राजा महेशदास— जो बिरबल या नांवानें प्रसिद्ध होता, जयसिंग, मानसिंग इत्यादिकांच्या हाताखालीं मोठमोठालीं सैन्यें देऊन मोंगल पादशाहीचा अम्मल उत्तरेस हिंदुकुश पर्वत, दक्षिणेस अहमदनगर व पूर्वेकडेस ब्रह्मदेश येथ पर्यंत नेऊन थेट भिडविला होता याचें कारण अकबराजवळ मुसलमान योग्य सेनापती नव्हते किंवा त्याच्या स्वतःच्या अंगीं मर्दुमकी नव्हती असें नाहीं तर त्यानें हिंदुची योग्यता, निमक हलालपणा व कृतज्ञता इत्यादि अमूल्य गुण पाहून त्यांच्यावर विश्वास ठेवून त्यांना महत्वाच्या कामगिऱ्या दिल्या होत्या. अशा रितीनें त्यानें आपल्या साम्राज्याची इमारत हिंदुवीरांच्या पायावर उभारून त्याच वीरांच्या तटबंदीनें मजबूत व निर्धास्त केली होती. अवरंगजेबाच्या कारकीर्दींत हिंदुलोकांचा धर्मसंबंधीं बाबतींत छळ झाल्यामुळें व इतर कारणांनीं साम्राज्याचा पाया व तटबंदी याना धक्के पोहोंचल्यामुळें ती मोडकळीस येण्यास आरंभ झाला.

हिंदुपादशाहींत यच्चयावत् लढाई संबंधानें मोटमोठीं कामें हिंदुच्याकडेच होती हें प्रत्येकास अवगतच आहे. इब्राहिम गारद्या सारखे विजातीय अगदींच थोडे होते मराठ्यांनीं आरंभीं व भरभराटीचे वेळीं महत्वाच्या कामगिऱ्या कशा युक्तीनें, व शिताफीनें व शूरत्वानें सिद्धीस नेल्या हें सागण्याची जरुरी नाहीं. हल्लीं इकडील लोकांना त्या बंदच आहेत व गोरकायाकरितांच आहेत असें ह्मटल्यास वावगें होणार नाहीं रसद व बातमी खात्यांतील जागा व त्या खात्यासंबंधीं हालहवाल अगदीं सरकारी रितीनें गुप्त ठेवण्यात येते व असें असणें रास्त आहे. ह्मणून या संबंधानें कांहीं लिहितां येत नाहीं. पण यावरून जर लष्करीखात्यांतील वरिष्ट नोकऱ्यांत हिंदूस मज्जाव आहे तर वर निर्दिष्ट केलल्या अत्यंत महत्वाच्या गुप्त व ज्यावर लढाईचे व आणिबाणीचे प्रसंगीं राज्यानें अस्तित्व अवलंबून असतें अशा खात्यात हिंदूनां साधारण महत्वाच्या देखील नेमणुका मिळणें संभवनीय नाहीं असें अनुमान काढल्यास चुक होणार नाहीं असें वाटतें. कदाचित् असल्यास त्या फारच थोड्या असूं शकतील.

हिंदुस्थानांतील इंग्रजांच्या मांडलिक राजांना किंवा त्यांच्या कुलांतील लोकांना देखील इंग्रजी राज्यांत स्वतंत्रपणें कप्टन वगैरे महत्वाच्या दर्जावर असल्याचे आपण क्वचितच ऐकतों. हें खरें कीं कांहीं ऐतद्देशीय लोक संस्थानांत कॅप्टन किंवा अशा सारख्या दुसऱ्या महत्वाच्या हुद्यावर आहेत. कांहीं मांडलिक राजांना इंग्रजी फौजेंत आपल्या परम दयाळू बादशहानें राज्यारोहण, वाढदिवस किंवा अशाच प्रकारच्या कपिलाषष्ठी अगर इतर तिथी पर्वणीच्या निमित्यानें सन्माननीय ( Hounrary ) कर्नल केले आहे. तरी पण याची योग्यता आस्ट्रियाच्या बादशहानें इंग्लंदच्या राजास, आस्ट्रियाच्या फौजेंत नुकत्याच दिलेल्या माननीय फील्डमार्शलच्या जागेच्या योग्यतेचीच दिसते.

ही उणीव दूर करण्याच्या उद्देशानेंच कीं काय न कळे नवीन काढलेले इंपीरिअल क्याडेट कोअर हिंदुस्थानांतील राजवंशीयां करितां बनविण्यांत आलें आहे, यांत पसंत ठरलेल्या राजपुत्रांना चांगल्या जागा देण्याचा हिंदुस्थान सरकारचा झालेला ठराव सर्वांस विदित आहे ही आनंदाची गोष्ट आहे. आतां समुद्रापलीकडील या बाबतींत होणाऱ्या मंथनांत काय बाहेर निघेल याकडे लक्ष लागणें साहजिकच आहे. इंग्रज सरकार केव्हां केव्हां आपल्या मांडलिक राजांचा व अनेक वेळां त्यांच्या पलटणींचा शत्रूशीं झगडण्यांत उपयोग करितें हें महशूर असल्यामुळें सांगण्याची जरूर दिसत नाहीं.

सध्यां इंग्लदांत लष्करी कॉलेजांत इकडील लोकांना त्याप्रमाणें अगदींच मज्जाव आहे. पूर्वी नेटिव्हांना वरीष्ट दर्जाच्या जागा देणें व व्हालंटिअर्स करणें हें एका काळीं धोक्याचें होतें पण तो काळ व तें मन्वन्तर सध्यां राहिलें नाहीं. इंग्रजी राज्याचीं पाळेंमुळें हिंदुस्थानांत फार खोल गेली आहेत. व प्रजाहि राजनीष्ट असल्यामुळें नेटिव्हांना वर निर्दिष्ट केलेल्या जागा दिल्यास तोटा न होतां उलट फायदेशीरच होईल. व या गोष्टीचें श्रेय लॉर्ड किचेनर कर्झन प्रभृती इंग्रज सरदार घेतील अशीं आशा आहे.

---

कलकत्त्यास बऱ्याच बालविधवांनीं योषितांचा धंदा उघडपणें सुरू केला आहे अशी तिकडील कांहीं पत्रांनीं ओरड केली आहे. बंगाल्यांतील सुशिक्षित स्त्रिया नाटकें पहावयास जातात, तेथें लव्हेंडर, व्हिस्की, एल वगैरे मादक द्रव्यें पितात अश्लील गाणीं गातात व इतरहि ह्याहून अमंगल प्रकार करितात. ह्याबद्दल इंडियन मिरर सारख्या

वजनदार पत्रातून बराच मजकूर प्रसिद्ध होत असतो. तीन महिन्यांपूर्वी कलकत्त्यास महाकाली पाठशाळेचा बक्षीस समारंभ झाला. त्यावेळीं बरद्वानचे महाराज अध्यक्ष होते. त्यांनीं आपल्या भाषणांत बंगाल्यांतील (new enlightened) नवसुशिक्षित नवयुवा पुरुष नवयुवतींना कसे बिघडवितात ह्याचें यथार्थ वर्णन केलें होतें. ह्या सर्व गोष्टींचा विचार करितां एवढें स्पष्ट दिसतें कीं, बंगाल्यांतील हिंदुसमाजांत अनीति दिवसेंदिवस वाढत आहे. ह्या दोषांचा वेळींच प्रतिकार न होईल तर महाराष्ट्रांतही लवकरच बंगाल्याप्रमाणें स्थिति होईल. महाराष्ट्रांतील हिंदु— स्त्री– समाजांत जे रंगढंग वाढले आहेत त्याचें कारण कित्येकांच्या मतें तरुण स्त्रियांना मिळालेलें अर्धवट शिक्षण हें आहे. हिंदु समाजांतील स्त्रिया बिघडण्याचें कारण बरद्वानचे महाराजांनीं ह्मटल्याप्रमाणें पुरुषच आहेत. हिंदुसमाजांतील सुशिक्षित पुरुषांना युरोपियन चालीरीतींचें अनुकरण करावेंसें वाटतें. युरोपियन चालीरीति युरोपियन समाजाच्या दृष्टीनें चांगल्या असतील परंतु त्यांतील बऱ्याच चालीरीती आमचे दृष्टच्या अत्यंत वाईट आहेत. त्यांचें अनुकरण करणें समाजाचे नीतीला फार विघातक आहे. ह्याचा आह्मी विचार करावयास नको काय ? या सर्व ठिकाणच्या प्रश्नाचा लवकरच निकाल लागावा वस्तुस्थितीचा विचार करितां, तसें न केल्यास, अनीति कोणत्या थराला जाईल ह्याची कल्पना सुद्धां होणें शक्य नाहीं.

---

# वऱ्हाडसमाचार

मिती आषाढ शुद्ध ६ शके १८२६

---

## स्वत्वाची जाणीव

आपला देश चांगल्या स्थितीस यावा ह्या एकाच हेतूनें आपण सर्वजण नाना प्रकारांनीं खटपट करीत आहों. याच हेतूनें आपण कांग्रेस, कानफरन्स आदि करून सभा भरवितों, निरनिराळ्या मंडळ्या व संस्था स्थापन करितों, लेख लिहितों व लेक्चरें देतों. आपलें दारिद्र्य दूर होण्यास आणि आपल्यास चांगले दिवस दिसण्यास आपले धंदे व उद्योग हे वाढले पाहिजेत असाच सर्वांचा एक विचार झालेला आहे. आपण सरकारावर वा दुसऱ्यावर अवलंबून राहिल्यास आपला होणारा ऱ्हास फार मोठा होईल ही गोष्ट आतां सर्वांस चांगली उमजूं लागली आहे. अशा समयीं आपण आपला स्वदेशी माल, स्वदेशी कपडा, स्वदेशी वस्तू वगैरे स्वदेशी गोष्टींची अवहेलना व तिरस्कार न करितां त्या स्वदेशी वस्तूवर फार प्रेम केलें पाहिजे. स्वदेशी जिनसाची मनापासून आवड व परदेशी वस्तूची नावड अशा दुहेरी जोरानें स्वदेशी उद्योगधंद्यास चांगलें उत्तेजन मिळणार आहे. स्वदेशींच वस्तू जवळ करीत व परदेशी वस्तू दूर फेकीत असा मनानें पक्का पण केला पाहिजे. स्वदेशी वस्तूंच्या सानिध्यानें दुःख व कष्ट झाले पुरवले पण परदेशी वस्तूंनीं दिलेला आराम व सौख्य हीं नकोत. ‘ मधु तिष्टति जिव्हाग्रे । हृदये तु हलाहलम् ’ याप्रमाणें ह्या परदेशी वस्तूंचा सौख्यानंद परिणामी फार दुःख देणारा आहे ही गोष्ट कोणी विसरूं नये. स्वदेशी वस्तू वापरण्याचा निश्चय करा असा एकसारखा लोकांच्या अगदीं कानाशीं कर्णा फुंकला जातो तरी त्याकडे लोकांचें लक्ष्य अद्याप जात नाहीं ही खरोखर खेदाची गोष्ट होय. अरेरे! आपले हिंदुस्थानचे लोक आपणांस, आपल्या देशास व देशांतील बांधवांस व वस्तूस इतके विसरले आहेत काय? त्यास आपलेपणा असा कांहींच वाटेनासा झाला काय ? ज्यास आपलें ह्मणून आपण इतके दिवस कवटाळलें त्यास दूर करून दुसऱ्यास प्रेमानें आलिंगन देणें हा मनुष्याचा धर्म नव्हे. जो मनुष्य आपल्या स्वदेशाशीं बेमानी करितो त्या मनुष्यास त्याचा देश व परकी देश दोन्हेहि जवळ करीत नाहींत एकदां एका मोठ्या साहेबांनीं मोकळेपणानें आपलें मत दिलें कीं, असे कांहीं इंडियन लोक आहेत कीं जे गुण वगुण कांहीं लक्ष्यांत न घेतां आपल्या देशी वस्तूंचा विश्वासघातकी मनुष्या प्रमाणें तिरस्कार करून परदेशीच्या वस्तूंचा अभिलाष धरितात. नीच मनुष्याप्रमाणें ते आपल्या देशासंबंधीं जें आपलें कर्तव्य तें विसरून जाऊन युरोपियन दुकानांतून माल खरेदी करण्यांत त्यास मोठा गौरव वाटतो. हे त्या साहेबांचे कळकळीचे शद्ब आपणांस काय शिकवीत आहेत याचा विचार करा. आपणच आपला अभिमान धरला नाहीं व आपणच आपल्यास परकी ह्मणून लेखूं लागलों तर दुसरे कोण आपणांस जवळ करितील ! आपल्या देशाच्या पडत्या काळींच आपली त्यास मदत पाहिजे आहे व देशाच्या विपत्कालींच आपल्यास स्वत्वाचा प्रेमपान्हा फुटला पाहिजे आणि ह्मणूनच आपल्या स्वत्त्वाची जाणीव धरा असें आह्मी पुनः पुनः मोठ्या काकलुतीनें सांगत आहों.

---

## भाडली मत

फलज्योतिषा संबंधानें जे चांगले ग्रंथ उपलब्ध आहेत त्यामध्यें भाडली मताला पुष्कळदां मुख्य मान देण्यांत येतो. सहदेवाची पत्नी भाडळी यांच्या नांवानें हा फल ज्योतिषाचा भाग प्रसिद्ध आहे आणि ह्मणून सहदेव मताला भाडलीमत असेंही ह्मणत असतात. त्यांतील कर्कसंक्रांती विषयींचा एक भाग मनोरंजक असून ध्यानांत धरण्या सारखा आहे.

गेल्या शुक्रवारीं सायंकाळीं सूर्य कर्क राशीला आला आहे आणि या कर्कसंक्रांती विषयीं भाडली मत असें सांगतात कीं.

कर्के भीजे कांकडा ।
सिंहे भीजे पीठ ।
कहे गद्द मूनेर मुनी ।
समा विश्वे वीस ।

याचा अर्थ असा करितात कीं कर्क राशीला ज्या दिवशीं सूर्य येतो त्या दिवशीं प्रारंभाला [ कांकडा ] जर पर्जन्यवृष्टी होईल आणि तसेंच सिंह राशी भोगून सूर्य जेव्हां दुसऱ्या राशीला जावयाचा असतो तेव्हां त्या सिंहराशीच्या अखेरच्या दिवशीं जर पर्जन्य पडेल तर पृच्छक मुनीला सहदेव ऋषी असें सांगतात कीं त्या वर्षी पिकांची समृद्धि अगदीं उत्कृष्ठ होईल.

वरील मता प्रमाणें पाहतां गेल्या शुक्रवारीं चांगला पाऊस पडला हा मोठाच शुभयोग होय. आणि याच धोरणानें सिंहराशीच्या अखेरीला पाऊस पडेल तर या क्रोधीनाम संवत्सरांत आमच्या देशाची दैना दूर होईल असा अंदाजा आहे. हें अनुमान किंवा अशाच प्रकारचीं भाडली मताचीं अनुमानें पुष्कळ वर्षांच्या अनुभवानें खरीं ठरलेलीं आहेत आणि तेव्हां यंदाचें वर्षही त्या शुभ अनुमानाचें प्रत्यंतर आह्मांस आणून देईल अशी आह्मी उमेद बाळगतों.

---

आषाढी पौर्णिमेच्या दिवशीं कर्क संक्रांती प्रमाणेंच एक मोठा ठोकताळा पाहण्या सारखा आहे. ही पौर्णिमा व्यास पूजे संबंधानें सर्वत्र प्रसिद्ध आहे. या दिवशीं गुरुपूजा समारंभानें करण्याचा परिपाठ पंजाबाकडे विशेष आहे. त्या दिवशीं पिकापाण्या संबंधाच्या भावी गोष्टींचें अनुमान बांधीत असतात आणि ही अनुमानाची क्रिया एका विवक्षित प्रयोगावर बसविली आहे. पौर्णिमेचा योग ज्या दिवशीं सायंकाळाच्या समयाला असेल त्या दिवशीं अगदीं सायंकाळीं सूर्य डुबण्याच्या मुहूर्ताला वाऱ्याच्या गतीची दिशा निश्चित करावी; ह्मणजे या वाऱ्याच्या दिशे प्रमाणें भावी गोष्टी सुखावह किंवा दुःखावह होतील या विषयीं वर्षफळ ठरवीत असतात. यंदा तारीख २६ जुलै मंगळवार रोजीं संध्याकाळला पौर्णिमेचा योग आहे तर त्या दिवशीं एक लहानमोठा बावटा खुल्या जागेंत उभा करावा ह्मणजे पताका कोणत्या दिशेकडून कोणत्या दिशेकडे फडकत आहे हें पाहून वाऱ्याची दिशा पक्की करावी. संध्याकाळाला जर वायूची गती पूर्वेकडून पश्चिमेकडे असेल तर त्या सालीं धनधान्यसमृद्धि होईल आणि वर्षाकाल सुखकारक होईल असें समजतात. दक्षिणेकडील वारा दुष्टकाल, महर्गता इत्यादि विघ्नें ध्वनित करितो. पश्चिमेकडील वाऱ्याचें फळ ह्मणजे अतिवृष्टीनें होणारीं सुखदुःखें संमिश्र होत असतात. सरासरीनें पीकांचें मान आठ आणे राहील. उत्तरेकडील वारा कालगर्भांत कृषिकर्माची भाग्यसंपद मोठी आहे असें दिग्दर्शनात आणि ल. वारा जर अगदीं पडलेला असेल तर तो भावी महान् विपत्तिकाळ दर्शित करितो. ही माहिती प्रसिद्ध करण्याचा हेतु असा कीं येत्या पौर्णिमेच्या दिवशीं लोकांनीं आपल्या तर्के काय तो वरील धोरणानें निश्चित करून लिहून ठेवावा आणि त्या मानानें भावी फळें कितपत जुळतात हें पाहून तो अनुभव अवश्य प्रसिद्ध करावा. वरील माहिती अर्घदीपक ग्रंथांत सांपडेल असें आमचे एक ज्योतिषी सन्मित्र कळवितात आणि त्यांच्याच सांगण्यावरून आह्मी हा त्रोटक चुटका आज दिला आहे.

---

## मधुर ध्वनी

मधुर ध्वनी सारखी शरीराला व मनाला आल्हादक कोणतीच अन्य वस्तु नाहीं. मधुर ध्वनी हा एका प्रकारें प्राणिमात्राला प्राणवायु सारखाच महत्वाचा आहे. सप्त सुरांच्या संमेलना पासून मधुर ध्वनी उत्पन्न होतो आणि या मधुर ध्वनीचा व सप्त रंगांचा असा कांहीं विलक्षण योग आहे कीं जेथें मधुर ध्वनी भरला आहे तेथें इंद्रधनुष्यांतील सप्त रंगांच्या मिश्रणाची नानाविध रचना इमारती सारखी हवेमध्यें दृष्टीस पडते. ध्वनी व रंग यांचा परस्पर समवायी संबंध इतका दृढ आहे कीं अलिकडील शास्त्रीय शोध तत्संबंधानें फार दूरवर पोचले असून त्यांनीं नानाविध रंगरचना व नानाविध ध्वनिरचना यांच्या योगानें मनुष्यांसच काय पण इतर प्राणिवर्गास देखील हर्षभरित व आनंदित करण्याची युक्ती काढली आहे कांहीं वैद्य निरनिराळ्या रंगांनीं नाना रोग बरे करितात आणि कांहीं वैद्य मधुर ध्वनीनींहि रोग्यांचे रोग बरे करितात. गायन, वादन व नर्तन हीं तीन अंगें ह्मणजे ध्वनी अधिकतर रमणीय करण्याची विद्या होय. या तीन गोष्टीला लोलूप होणार नाहीं असा प्राणीच आढळणार नाहीं. मधुर ध्वनीची माधुरी सर्वांसच सारखी वाटणार नाहीं पण तिचा परिणाम तिच्या पुढील श्रोत्याच्या ग्राहकशक्ती प्रमाणें कमीज्यास्त झाल्या शिवाय राहणार नाहीं.

थोड्या दिवसा पूर्वी डॉक्टर पाल एडवर्डस यांनीं मेक्सिको येथें मधुर गानाचा प्रयोग पुष्पवृक्षावर करून पाहिला. एका झाडाच्या पुष्पावर त्यांनीं मधुर, गोड व रमणीय अशा गायनानें सुंदर कल्पनांचा वर्षाव केला. त्याचा परिणाम असा झाला कीं त्या फुलाला नवीन टवटवी आली. फूल फार जोमांत येऊं लागलें व तें फारच सुंदर दिसूं लागलें. दुसऱ्या झाडाच्या पुष्पावर दुर्वचनाची, व संतापकारी विचारांची वृष्टी कर्कशवाणीनें केली आणि त्याबरोबर तें पुष्प तेजहीन व कुरूप झालें आणि त्याचें देंठ गळल्यासारखें झालें आणि शेवटीं तें पुष्प लवकरच नाशास पोचलें असे दोन परस्परविरुद्ध परिणाम फार लक्ष्यांत ठेवण्यासारखे आहेत. वरील प्रयोगांत दोन्ही पुष्पवृक्षांस हस्तस्पर्श देखील करण्यांत आला नव्हता. पुष्पाचे सुवास अधिक मनोहर करण्याकडे गायनादिकांचा उपयोग निःसंशय होईल असाही एक तर्क आहे.

वरील गोष्टीवरून मधुर ध्वनीचा परिणाम वनस्पति वर्गावर केवढा विलक्षण होतो हें ध्यानांत येईल. मधुर ध्वनीला सुविचारांनीं किती माधुरी येते ही गोष्ट नाटक पहाणाऱ्यांच्या चांगली लक्ष्यांत येते. कामसेनरसिकेचा प्रयोग आणि सौभद्राचा प्रयोग एकच मंडळी करिते पण गायनादि कला सौभद्राच्या नाटकांत चांगल्या खुलतात, याचें कारण नाटकाचे सुविचार होत. मधुर ध्वनी व मधुर विचार ठेवण्याची किती अवश्यकता आहे हें दाखविण्यासाठींच घरोघर वृद्ध माणसें ह्मणत असतात कीं तोंडांतून असद्र वचन

काढूं नये कांकीं लक्ष्मी गृहांत मांदत असते ती कटु कर्कश शद्बानें त्या गृहापासून पराङ्मुख होते. लक्ष्मी ह्मणजे आनंदाची देवी होय. अर्थात अभद्र भाषणानें तें गृह अपवित्र होतें आणि अपवित्रता आली ह्मणजे तेथें विपदा पाठोपाठ चालूनच येतात. मधुर ध्वनीचा असा हा महिमा विचारणीय आहे आणि ह्मणूनच गायनादि क्रिया त्याज्य नव्हेत तर त्या सर्वदां जवळ करून आपलें आयुष्य आनंदमय करण्याचें प्रत्येकानें शिकलें पाहिजे. अलिकडे मनुष्य धनाच्या प्राप्तीकडे जितका खपतो तितका धनाच्या साधनानें उपलब्ध होण्या इतका देखील गायनकलेच्या आनंदाला आश्रय देत नाहीं हा शोचनीय प्रकार होय. अलिकडे गायनादि कला नष्टप्राय होत चालल्या आहेत हा दोष धनिक लोकांचें वैगुण्या दर्शवितो, आणि राष्ट्रांच्या जीवनकलेचाही तिच्या बरोबरच ऱ्हास होतो असें आह्मी ह्मणतों.

---

## स्वाभिमान

[ लि. आ. म. ]

पादाक्रांत झालेल्या बोअर लोकांच्या पुढाऱ्यांनीं एक कांग्रेस भरविली होती ही गोष्ट आह्मी या पूर्वी सांगितली आहे. या त्यांच्या कांग्रेसचा गौरव करितांना ट्रान्सव्हालच्या इंग्रजी गव्हरनर साहेबांनीं जे उद्गार काढले ते राजपुरुषांनीं अवश्यमेव ध्यानांत ठेविले पाहिजेत. त्यांच्या मतें लोकांनीं व सरकारांनीं एकत्र जमून उघडपणें सर्व वाऱ्या वाईट गोष्टीचा खल करावा हें राजास व प्रजेस दोघासहि अत्यंत हितावह आहे. आपलें गाऱ्हाणें आपल्या मनांतल्या मनांत दाबून न टाकतां तें सरकारच्या कानावर घालून तें दूर करण्याचा प्रयत्न सर्वांनीं करावा. राज्यकर्ते व प्रजाजन यांचीं मन एकमेकांस मिळालीं पाहिजेत व परस्परांमधील प्रेमबंधनाची सांखळ दृढतर होत गेली पाहिजे.

वरील प्रमाणें त्यांच्या भाषणाचा मतीतार्थ आहे. हें इतकें उत्कृष्ठ असें राजनीतीतलें तत्व आमच्या सरकारास कळत नाहीं असें कोण ह्मणेल. पण गरीब, दुबळ्या, हतवीर्य अशा प्रजाजनांस कोण विचारतो ! आपले लोक तो भ्याड भित्रे आहेत. त्यांचेवर जरा डोळे वटारले कीं ते झालेच गर्भगळित ! अशा पामर लोकांची सल्ला मसलत ती कसली घ्यावयाची व यांचें गाऱ्हाणें तरी काय ऐकावयाचें ! सरकार आपणांस विचारीत नाहीं हा त्यांचा अपराध नसून आपलाच आहे. आपण आपल्या अंगांतले असें कांहीं तरी पाणी दाखविलें पाहिजे कीं ते आपणांस विचारतील. आपण आपली वागणूक जरा करडी व हट्टाची केल्याशिवाय आपला कार्यभाग होणार नाहीं. आपणच जर वेडे व नेभळे आहोंत तर दुसरे उद्योगी शूर लोक आपल्याशी मित्रभावानें कसें वागतील बरें ! मेषपात्र लोकांनीं जर अशी हाव धरली कीं कर्तृत्ववान लोकांनीं आपला गौरव करावा व गोडव गावें तर ही गोष्ट युक्तीस व विचारास कितपत शोभणार आहे याचा विचार केला ह्मणजे आपली चूक आपल्या पदरांत पडलेली दिसून येईल.

तर आपण आतां काय केलें पाहिजे? आपण आपला भ्याड स्वभाव सोडून देऊन चांगलें तें करावयाचेंच असा संकल्प केला पाहिजे. आळसांत सौख्य न मानतां उद्योगवृद्धी केली पाहिजे आपण आपलें वैभव जें गमाविलें आहे तें मिळविण्याची खटपट केली पाहिजे. नीच गोष्टींचा, नीच विचारांचा, नीच संगतीचा त्याग करून सुविचार, सदुपदेश व सत्कृत्य यांची कांस बळकट धरली पाहिजे. वाईट गोष्टीची चीड आली पाहिजे व चांगल्या गोष्टींची हौस वाटली पाहिजे. अशा प्रकारें आपला अंतरात्मा जेव्हां शुद्ध, पवित्र व निर्भीत होईल तेव्हां मग आपल्या तपाच्य प्रखर तेजानें कोण दिपणार नाहीं ? मग आपल्यावर कोणी जुलूम करील वा वाईट गोष्ट आपल्या जवळ काढील; का कोणी वरमान करून आपल्याकडे वक्र दृष्टी करील अशी कालत्रयींहि भीती नाहीं. पण हा सुयोग येण्यापूर्वी आपलें सर्व पाप व खलमल जळून खाक झालें पाहिजे ! आणि हेच तर कार्य फार कठीण आहे ! आणि हेंच तर आपण केलें पाहिजे.

---

## वऱ्हाडवृत्त

हवामान— या सतकांत पाऊस थोडा बहुत पडला आणि कपाशीचीं रोपें जोमदार आहेत. जवारीचे पेरे संपत आले. किरकोळ ऋतुमानाचे आजार खेरीज करून सार्वजनिक आरोग्य असमाधानकारक नाहीं.

रा. रा. ब्याटन साहेब जुडिशिअल कमिशनर साहेब हे पंधरा महिन्यांचे फर्लो रजेवर पुढील महिन्यापासून जाण्याच्या विचारांत आहेत. सध्यां हे कुबडीच्या आधारानें लंगडत लंगडत कचेरींत येत असतात पण प्रकृतीच्या पूर्ण आरामासाठीं ते विलायतेस जात आहेत हे बरें होय.

गळे कापू — कांहीं चोरांनीं बजतमाळवाढगणांत सडके वरील सरूळ येथील चौकीवर दोघा इसमांचे गळे चाकूनें कापले व आणि पळून गेले. पळण्याच्या धांदलींत एकाचा जोडा तेथें पडला आणि त्या जोड्या वरून तीन इसमांस कैद केलें आहे असें हरिकिशोर लिहितात.

'दत्तोपासक परमानंद प्रासादिक संगीत' नाटक मंडळीनें परवां रात्रौ हरिश्चंद्राचा प्रयोग करून दाखविला. तारामती, हरिश्चंद्र, रोहिदास व विश्वामित्र या पात्रांचीं कामें क्रमाक्रमानें चांगलीं झालीं. नाटक फार चांगलें बहारीचें झालें असें 'प्रेक्षक' कळवितो. प्रेक्षक असेंही सूचवितात कीं जपानी अनाथ फंडाला मदत देण्यासाठीं या कंपनीनें एक प्रयोग मुद्दाम करावा.

रा. रा. मणेश बळवंत भाडक बी. ए. असि० शिक्षक, आकोला हायस्कूल हे तीन वर्षांच्या रजवर पंढरपुरास जात आहेत. तेथील हायस्कूलच्या हेड मास्तराच्या जागीं यांस नेमण्यांत आलें.

येथील कांहीं तेलगू मंडळींनीं आपल्या जातीच्या उन्नत्यर्थ खटपट चालविली असून त्यासाठीं कांहीं वर्गणीहि जमा केली आणि तेलगु गरीब मुलांना शिक्षण देऊन त्या सर्वांची समाजांत चांगली मानमान्यता होऊन समाज सुधारला जावा अशी त्यांची इच्छा आहे. प्रयत्न स्तुत्य आहे.

वाघांची शिकार— दारव्हा येथें एक दोन वाघ गुरेंढोरें फार मारीत आणि ते माणसावरही हल्ला करीत. एका बाऱ्यानें एक ७॥ फूट लांबीचा वाघ वाडींतील विहिरीवर पाणी पीत असतांना मारला. दुसरा एक ७ फूट लांबीचा वाघ दिवसांच गांवांत शिरला तेव्हां तेथील पोलीस इनस्पेक्टर रा. रा. रामकृष्ण नायडू यांनीं कांहीं मंडळी घेऊन मैदानांतच त्याच्यावर गोळी घातली पण ती शेंपटीलाच चाटून गेली. त्यामुळें वाघ कावरा बावरा सैरावैरा धावूं लागला. त्यानें दोन तीन माणसाला थोडेंबहुत जखमीही केलें. इतक्यांत दारव्ह्याचे डाक्टर राजश्री महमद हुसेन यांनीं बंदूकीच्या ठोंश्यांनीं वाघाचे दांत पाडले व गोळी घालून त्याला ठार केलें आणि त्यामुळें एका इसमाचा जीव वांचला. पोलीस इनस्पेक्टर धैर्यवान खरे पण त्यापेक्षां डाक्टरांची बहादुरी वर्णनीय होय.

---

## आकोला बाजारभाव

| | | | |
|---|---|---|---|
| हुंडी दर्शनी | | | १००८= |
| सोनें २४।= | | चांदी | ७१। |
| जवारी ९२-९९ | | कवस | ८२ |
| गहू काठे ७२॥ | | बनशी | ८७॥ |
| सरकी | | | ४॥। - ९ |
| मीठ | | | ३॥ रु. मण |
| चणे | | | २॥ रु. मण |
| तूप | | | १०॥ रु. मण |
| तेल | | | ४। रु. मण. |
| रुई जीन | | | ७८ |

---

## नोटीस

मिरखा वल्लद फाजलखा व साळूबा वल्लद बाळाजी तेली राहणार कजबे देऊळघाट तालुके चिखली यासः—

तारीख ११ मिनहूच्या वऱ्हाडसमाचार पत्राचे अंकीं तारीख ७ मिनहूचे नोटीसिचे उत्तर खालीं सही करणार यानकडून देण्यात येते कीं तुह्मी उभयता व रामराव सदाशिव आणि मी असे आपण चौघे मिळून कजबे देऊळघाट येथें खान बहादुर नबाब साहेब याचे सराईंत अजमासें चार वर्षांपूर्वी समाईक किराणा व भुसार मालाची दुकान घातली होती ही गोष्ट खरी आहे परंतु सदरहू सराई ज्या वेळेस नबाबसाहेबांनीं खाली करून मागितली त्यावेळीं सदरहू समाइक दुकान कजबे मजकुरीं दुसरे ठिकाणीं घालण्यास योग्य जागा न मिळालेमुळें सदरहू सामाईक दुकानचा आपल्या सर्वांचे मतें हिशोब होऊन ज्याचे त्याचे देण्याघेण्याची सर्वानुमतें विल्हेवाट होऊन सदरहू समाइक दुकान मोडली गेली ही गोष्ट आपले येथील सर्वत्र लोकांस माहितच आहे माझे नवीन बांधलेले जागेंत जी मी दुकान घातली आहे ती तुमची समाइक नाहीं माझ्या पूर्ण एकट्याचें मालकीची असून त्या दुकानांत तुमचा कांहीं संबंध नसल्यामुळें माझ्या मालकीच्या दुकानचा आजपावेतों हिशोब मागण्याचा बिलकूल अधिकार नाहीं ह्मणून ही नोटीस पावले पासून आठ दिवसांचे आंत हल्लीं असलेलं दुकान सामाईक आहे असें शाबित करावें. शाबित न केल्यास तुह्मी मला बुडविण्याचे इराद्यानें बुद्धीपूर्वक ही नोटीस देऊन माझा अपमान केल्याबद्दल कायदेशीर रीतीनें योग्य तजवीज केली जाऊन या नोटिसिचा खर्च तुमचे पासून घेतला जाईल. कळावें. तारीख १९ जुलई सन १९०४ इसवी०

सही

नथू हिरालाल खत्री देऊळघाटकर

दस्तुर खुद्द.

---

## नोटीस

रा० रा० किटकुला वल्लद भीवम पाटील व मुक्ताई मर्द टिकाराम पाटील राहणार उभयता दगडखेड ता० बाळापूर पो.-पातूर्डा.

यांसः—

खाली सही करणार यानकडून कळविण्यांत येते कीं भीवम पाटील, चंद्रभान, जयराम असे त्रिवर्ग सख्खे भाऊ होते. भीवम पाटील याचे किटकुला, निंबाजी व टिकाराम असे तिघेजण व चंद्रभानचा फक्त मी विठोबा, जयराम यांस संतती मुळीच कांहीं नव्हती. जयरामजी पाटील हे वारल्यावर त्यांचे शेत सर्वे नंबर २३ एकर गुंठे १४-३९ आकार १९ याचे खाते त्यांची बायको अहेलाई मर्द जयराम पाटील इचे नांवे लागले सदरहू नंबर २३ चे शेत तुमचा भाऊ निंबाजी वाहत होता. त्यानें एकट्यानेंच तें शेत वाहूं नये ह्मणून मी तुमचे भावाशी तंटा केल्यावरून आपली चुलती अहेलाई इनें मध्यस्ती पडून तुमचा भाऊ निंबाजी व चुलती अहेलाई या दोघांनीं ता. ३० मार्च सन १८८९ सालीं ह्मणजे फसली सन १२९८ साली करारनामा लिहून दिला कीं सदरहू शेत फक्त फसली साल १२९९ सालीं निंबाजीनें वाहावे व फसली सन १३०० सालीं त्या शेताची वांटणी करून निम्मे हिस्सा मी घ्यावा व निम्मे हिस्सा त्यानें घ्यावा असें चुलती पुतण्यानें लिहून दिले होते परंतु दोघेही लवकरच मरण पावल्यामुळें वांटणी झाली नाहीं. हल्लीं ते शेत आपली भावजय मुक्ताई मर्द टिकाराम इजकडे वहितीस असल्यामुळें तुह्मा उभयतांस वांटणी विषयीं पुष्कळ वेळां सांगितले परंतु तुह्मी उभयतां माझी गोष्ट कानावर न घेतां भलते सलते बोलतां तरी ही नोटीस पावतांच १५ दिवसांचे आंत सदरहू शेताची वांटणी करावी. असें न केल्यास मी कोर्टांत फिर्याद करून शेताची वांटणी सरकार मार्फत करवीन व त्याबद्दल जो खर्च लागेल तो व या नोटिशीचा खर्च अशा सर्व खर्चासुद्धां पैसे भरून घेईन. कळावे. ता. १६।७।०४ इ. सही

विठोबा व. चंद्रभान पाटील

राहणार दगडखेड ता०

बाळापूर पोस्ट पातुर्डा

निशाणी मुद्द.

---

## वर्तमानसार

सत्पुरुष गेला ! — ट्रांसवालचे प्रेसिडेंट क्रुगर हे स्विट्झरलंडांत नुकतेच निवर्तले. त्यांची देशभक्ती मोठी आणि ह्मणूनच बोअर लोक पराजित असून सर्व जगांत राजमान्य होत !

**तोंड कसें पुसावें ?** — आपण सकाळच्या प्रहरीं उठल्यावर किंवा बाहेरून उन्हातान्हांतून हिंडून आल्यावर स्वच्छ पाण्यानें तोंड व चेहरा धुतों व नंतर धोतरानें किंवा रुमाल्यानें पुसतों, तो वरून खालीं पुसतो. परंतु शास्त्रीय दृष्टीनें ही तोंड पुसण्याची पद्धति बरी नव्हे. तोंड पुसतांना कपाळापासून हनुवटीकडे पुशीत येऊं नये. तर हनुवटीकडून कपाळाकडे पुशीत जावें. त्याचप्रमाणें नाकाकडून दोनही बाजूस पुशीत जावें. केव्हांही चेहरा पुसावयाचा तो वरून खालीं पुशीत जाऊं नये.

समाधान दोन प्रकारचें आहे. एक उद्योगामुळें प्राप्त होतें, व दुसरें कामाचा कंटाळा येतो व स्वस्थ बसण्याची संवय लागते, यापासून उत्पन्न होतें. उद्योग करून समाधान होतें याची गणना सद्गुणांत होते; व दुसऱ्या प्रकारचें समाधान हा दुर्गुण आहे.

**पुण्यास विष घालण्याचा प्रयत्न केल्याबद्दल शिक्षा** — ताई नांवाच्या एका मराठी स्त्रीनें नवऱ्यास विष घालण्याचा प्रयत्न केल्याचें चौकशीअंतीं सिद्ध झाल्यावरून तिला तीन वर्षें सक्त मजुरीची शिक्षा झाली.

**राजगीचा मेळा** — बंकीपूर येथें गेल्या महिन्याच्या १३ व्या तारखेस राजगीरचा मोठा मेळा भरला होता. त्या वेळीं लोकांची इतकी गर्दी जमली होती कीं, ब्रह्मकुंडांत ११ इसम चिरडून गेले. शिवाय कित्येक लोकांच्या चोऱ्या झाल्या. एका गाडीवाल्याजवळून कोणी दुष्टांनीं रुपये ३०० लुटून त्याचा खून केला. बंदोबस्ताकरितां आलेल्या पोलिसच्या कांहीं लोकांसही इजा झाल्याचें समजतें.

**मुळापासून स्वतंत्र** — जगांतील सर्व देशांत ज्यांवर परकीयांचा अंमल कधीं झाला नाहीं असा एक जपान देशच आहे.

**विद्वान वैद्य** — मुंबईचे डाक्टर राव एम. डी. यांनीं वैद्य शास्त्रांत अनेक शोध लाविल्याबद्दल लंडन युनिव्हर्सिटीनें त्यांना डी. एस. सी. ची पदवी देऊन त्यांनां यापुढें निराळ्या परिक्षा द्यावयास नको असें ठरविलें आहे.

**स्तुत्य देणगी** — म्हैसूरचे चीफ जस्टिस दिवाण बहादूर ए. रामचंद्र आयर यांनीं शृंगेरी मठाला दोन लाख रुपये दिले आहेत. अशा धार्मिक संस्थेला इतके रुपये दिल्याचें हें पहिलेंच उदाहरण होय.

**माकडे पंखा ओढतात** — मलबार प्रांतांत एका युरोपियन गृहस्थानीं वानरांकडून पंखा ओढण्याचें काम करून घेण्याची युक्ति काढली आहे. व त्याप्रमाणें तेथें सर्व ठिकाणीं पंखा ओढण्याचें काम वानरांकडून घेण्यांत येतें.

एका प्रश्नास उत्तर देतांना मि. बाल्फोर ह्मणाले:— तिबेटसंबंधाचें प्रधानमंडळाचें धोरण अजून कायम आहे. मिशन ल्हासावर चाल करीत असतां वाटेंत योग्य पदवीच्या व अधिकारपत्रें मिळविलेल्या तिबेटी वकीलांनीं वाटेल तेव्हां येऊन तहाचें बोलणें सुरू करावें; त्यास आह्मी तयार आहों. आजपर्यंत आह्मीं जाहीर केलेल्या हेतूस विरुद्ध जातील, अशा शर्ती तिबेटी लोकांस घालण्याची प्रधान मंडळाची इच्छा नाहीं. ' तिबेटी मोहिमेस व्यापक स्वरूप आलें असून त्याशीं आतां सर्व इंग्रजी साम्राज्याचा संबंध आला असल्यामुळें ह्या मोहिमेचा खर्च इंग्लंडानेंच सोसावा. तो इंग्रजी तिजोरींतून करण्यास प्रधानमंडळ तयार आहे कीं नाहीं ? ' असा प्रश्न मि. हर्बर्ट रॉबर्ट्स हे तारीख १३ रोजीं मि. ब्राडरिक यास विचारणार आहेत.

वाईस निघणाऱ्या ' कादंबरी कल्पद्रुमा'चे एक संपादक रा. रामचंद्र नीळकंठ सहस्त्रबुद्धे यांना गेल्या आठवड्यांत वाई येथें देवाज्ञा झाल्याचें दुःखदायक वर्तमान आलें आहे. बंगाली भाषेंतील बऱ्याच कादंबऱ्यांचें यांनीं मराठींत भाषांतर केलें असून हे कांहीं दिवस मोदवृत्त व व्यापारी पत्राचे एडिटर होते.

जमखिंडी संस्थानच्या कारभाऱ्याचे जागीं रा. ब. शंकर बाळचंद्र बापट, फलटण संस्थान सध्यांचे कारभारी यांची नेमणूक झाल्याचें कळतें.

मि. माणेकजी पेस्टनजी नांवाच्या पुण्याच्या ३० वर्षें वयाचे पारशी रहिवाशानें आज ८ वर्षें जैनधर्म ग्रंथाचा अभ्यास केला असून त्यानें त्या धर्माप्रमाणें यात्रा वगैरे करून श्रावकांचाही परिचय केला आहे. जैनधर्म यांस मनापासून आवडत आहे, असें जाणून त्यांस मुंबईच्या जैन लोकांनीं आपल्या धर्मांत घेतलें असून नुकतीच त्यांचे सन्मानार्थ पायधुणीवर सभा झाली. जैनधर्माप्रमाणें आचरण करण्याचें त्यानें वचन दिलें असून निवृत्तमांस अशीच बायको आपण करूं असेंही त्यानें कबूल केलें आहे !

मुंबईइलाख्यांतील निरनिराळ्या ठिकाणच्या महारांनीं लॉर्ड लॅमिंग्टन यांचेकडे तारीख ९ रोजीं १५८८ सह्यांचा एक अर्ज पाठविला आहे. १८५७ च्या बंडांत सरकारास आह्मी साह्य केलें आहे; पण आह्मांस लष्करांत नोकरी धरतां येत नाहीं हा प्रतिबंध दूर व्हावा; जातीची अडचण असेल तर आमची निराळी पलटण करावी. लष्करी बँडमध्यें आमचे लोक आहेत. पण त्यांस बढती मिळत नाहीं, ती मिळावी. पोलीस व इतर खात्यांतही शिरण्याची व आमच्या शिक्षणाची सोय व्हावी. इ. इ. या अर्जांत मागण्या केल्या आहेत.

गुजराथेंतील बलसान गांवांतील ३०।३५ जैन लोक ख्रिस्ती धर्मांत गेले होते. ते परत आपल्या पूर्व धर्मांत येण्यास तयार असून त्यांस शुद्ध करून घेण्यास जैन लोक कबूल आहेत, असें ' काठेवाड टाइम्स ' वरून समजतें.

कलकत्त्यास सरकारी सॉलिसिटरचें कांहीं दिवस काम केलेले मि. कोनि हे गोरे गृहस्थ बरेच लफंगे दिसतात. यांचे सांगण्यावरून विल्यम स्मॉलि नांवाच्या इसमानें क्रॅस्टर नांवाच्या मनुष्याचे आपण वारस आहों असें सांगून बँकेंतील पैसे उपटले होते. स्मॉले याची चौकशी नुकतीच पुरी होऊन त्यास ४ वर्षें सक्त मजुरीची शिक्षा झाली.

मध्यप्रांतांतील चंदा जिल्ह्याप्रमाणेंच जबलपूर जिल्ह्यांतही अशोधित लोखंड सुमारें १५० लक्ष टन निघण्यासारखें आहे. पण ही माती फार मऊ असल्यामुळें ती नव्या पद्धतीप्रमाणें गाळणें कायदेशीर नसल्यामुळें ह्या जिल्ह्यांत लोखंडाचे कारखाने काढून किफायत व्हावयाची नाहीं, असें कांहीं भूगर्भज्ञाचें ह्मणणें प्रसिद्ध झालें आहे.

सुभाषित— आपलें मन हुबेहुब माकडासारखें आहे. एखाद्या माकडास कोणी दारू पाजली आणि तशांत त्याला विंचू चाउन भूतबाधा झाली तर तें माकड जसें अनिवार चेष्टा करितें तसाच प्रकार मनाचा होतो. वासनारूपी वारुणीनें तें गुंग झालें असतां ईर्षेचा वृश्चिकदंश आणि अहंकाराची भूतबाधा होउन तें अनिवार चेष्टा करूं लागतें. ह्मणून प्रत्याहार ह्मणजे इंद्रियदमन करून आपण त्याला आपल्या ताब्यांत ठेविलें पाहिजे.

फळफुलांचें प्रदर्शन— येत्या तारीख २७ सपटंबर रोजीं पुणें येथील फळफुलांचें प्रदर्शन ना. गव्हर्नर साहेबांच्या हस्तें उघडण्यांत येणार आहे.

छोटानागपूर प्रांतांत सोन्याच्या खाणी काढल्यास त्यांतून पुष्कळ सोनें सांपडेल असा मि. जे. एस मॅक्लेरन या नांवाच्या साहेबांचा अदमास आहे.

बेळगांव येथील आसि. सेशन्स जज्ज मि. अल्कॉक यांनीं मि. दत्तात्रय व्यंकटेश बेल्वी या नांवाच्या वकीलास कोर्टाची बेअदबी केल्याच्या आरोपाबद्दल दोन आणे दंड व तो न दिल्यास एक महिन्याची साधी कैद याप्रमाणें शिक्षा दिली होती. त्यावर सदर वकिलांनीं सेशन जज्जाकडे अपील केलें पण तेथेंही झालेली शिक्षा कायम ठेवण्यांत आली; तेव्हां त्यांनीं हायकोर्टांत अपील केलें व तेथें मात्र खालच्या कोर्टानें केलेली शिक्षा रद्द करण्यांत आली.

धोब्यांचा संप— हुबळी येथें धोब्याच्या गाढवावर सालीना आठ आणे कर घेण्याचें म्युनिसिपालिटीनें ठरविल्यावरून तेथील धोबी लोकांनीं हा कर रद्द होईपर्यंत कोणाचे कपडे धुवावयाचे नाहींत असा संप केला आहे.

काबूलच्या अमीरास थोड्या दिवसांमागें असें स्वप्न पडलें कीं आपल्या राज्यांत पशुपक्ष्यांची जी शिकार होते, ती बंद केली पाहिजे. तसें न केल्यास मोठा अनर्थ गुदरेल. या स्वप्नावर अमीर साहेबांचा विश्वास बसून त्यांनीं आपल्या राज्यांत होत असलेली पशुपक्ष्यांची शिकार तेव्हांपासून बंद केली आहे.

खानदेश जिल्ह्यांतील पिंपळगांव नांवाच्या गांवीं एक प्रकारचा नवीन रोग उत्पन्न झाला आहे. त्यांत रोग्यास प्रथम ताप येतो, नंतर गांठी येतात व त्या आपोआप फुटतात. आनंदाची गोष्ट ही कीं प्लेगप्रमाणें या रोगांत कोणाच्या प्राणास धक्का पोचत नाहीं.

गोव्याच्या गव्हर्नर जनरल साहेबांनीं शेतकरी लोकांजवळून सरकारी महसूल वसूल करण्याचें काम तूर्त तहकूब ठेवलें आहे. तेथें अशी दाट बोलवा आहे कीं, चालू साली टोळांनीं पिकांचा फडशा उडविल्यामुळें सरकारी महसुलाची माफी देण्याचा गव्हर्नर जनरल साहेबांना विचार आहे व त्याबद्दल त्यांनीं वरिष्ट सरकारची परवानगी मागितली आहे. इकडे नवें कांहीं होईल काय !

दिवाणी किरकोळ मुकदमा नंबर ३
———
१९०४
वर्ग २२

सन १८८[illegible] आक्ट नंबर ५ कलम ६९ प्रमाणें प्रोबेट सरटिफिकीट मिळण्याविषयीं अर्ज केल्यावरून जाहीरनामा.

विद्यमान दिस्ट्रिक्ट जडज्य साहेब बहादूर जिल्हे उमरावती यांचे कोर्टांत.

विश्वनाथआपा वल्लद गंगारामआपा खाकडे व बसलींगआपा वल्लद बापूआपा खाकडे राहणार उमरावती—अर्जदार.

हरणाबाई मर्द नागोबा नांदेडकर राहणार उमरावती.—मयत.

मयत हरणाबाई मर्द नागोबा नांदेडकर राहणार उमरावती इनें तारीख ११ माहे एप्रील सन १९०३ इसवी रोजीं आपलें जिनगीचें मृत्युपत्र करून ठेवल्याप्रमाणें प्रोबेट आणि ॲडमिनिस्ट्रेशन ( अक्ट नंबर ५ सन १८८१ ) च्या कलम ६२ किंवा ६४ अन्वयें सरटिफिकीट मिळावें ह्मणून वरील अर्जदार यानें अर्ज केला आहे. याजकरितां सदर्हू मयत मनुष्याचे मालमिळकतीवर किंवा तिचें कांहीं भागावर आपला हक्क आहे ह्मणून ज्या मनुष्याचा दावा असेल त्याना या जाहीरनाम्याचें द्वारें कळविण्यांत येतें कीं. त्यांनीं सदर्हू अर्जाची चौकशी विद्यमान दिस्ट्रिक्ट जडज्य साहेब बहादर जिल्हे उमरावती यांचे कोर्टांत तारीख १८ माहे आगष्ट सन १९०४ इसवी रोजीं दिवसाचे अकरा ११ वाजतां उमरावती येथें केली जाईल. त्यावेळीं सदर्हू कोर्टांत हजर होऊन सरटिफिकीट मिळेपावेतों जें काम चालेल तें पाहावें.

ही नोटीस आज तारीखे ७ माहे आगष्ट सन १९०४ इसवी रोजीं आमचे सहीनिशी व कोर्टाचे शिक्क्यानिशी दिली असे.

H Godwin Austen
डिस्ट्रिक्ट जडज्य साहेब बहादूर जिल्हे उमरावती.

---

किरकोळ दिवाणी क्लास नंबर २१
मुकदमा नंबर ३
१९०४

विद्यमान सिव्हील जडज्य साहेब बहादूर जिल्हे आकोले यांचे कोर्टांत.

अर्जदार— रुपाबाई मर्द पितांबरदास गुजराथी राहणार बाळापूर.

ह्या नोटीसिनें सर्वत्र लोकांस कळविण्यांत येतें कीं वरील अर्जदार यानें मयत हरलाल पितांबरदास याचे लोकांकडेस येणे असलेलें कर्ज रकम रुपये ७५ वसूल करण्याकरितां सरटिफिकीट मिळावें ह्मणून तारीख २२ माहे ६ सन १९०४ इसवी रोजीं अर्ज केला. त्या अर्जाची चौकशीची तारीख ३० माहे ७ सन १९०४ इसवी रोजीं मुकरर केली आहे. तरी सदर्हू दिवशीं १० वाजतां तुह्मी आपले दस्तऐवज वगैरे पुरावा आमचे कोर्टांत अर्जदार याजला सरटिफिकीट कां देऊं नये ह्याचें कारण दाखविण्यास हजर व्हावें माझे सहीनिशी व कोर्टाचे शिक्क्यानिशी दिली असे. तारीख ८।७।१९०४ इसवी.

Sk. Ismail
सिव्हिल जडज आकोला.

REGISTERED No. N.

बाहेरगांवीं टपालहाशिलांसह ........ २ ८
वर्गणी आगाऊन दिली पाहिजे.
किरकोळ अंकास....................२ आणे
नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत ८० १
दर ओळीस.........८१ ०१
दुसरे वेळेस ... .... ....८१

Mofussil ... ... ... 2 ( With postag
All Subscriptions to be paid in advance.
Single copy ........................ 2 as
Advertisement
below 10 lines ...... 2 Rs
Per line over 10 ......3 as
Repetitions Per line ,, 2 as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

VOL XXXVIII AKOLA MONDAY 25 JULY 1904 NO 29

वर्ष ३८ आकोला सोमवार तारीख २५ माहे जुलै सन १९०४ इ० अंक २९

### टोळांचीं अंडीं कशीं असतात व तीं कशीं ओळखावीं या संबंधानें कांहीं टिप्पण :----

( जे. एच. बार हे स्पेशल ड्यूटीवर होते तेव्हां त्यांनीं महाबळेश्वरीं केलेलें. )

टोळाचें अंडें सुमारें ½ इंच लांब असतें आणि त्याच्या अत्यंत जाडीच्या भागाचा व्यास सुमारें ⅛ इंच असतो. आकारानें हें अंडें लंबोत्तर असून थोडें बाकडें असतें. त्याचीं टोकें अगदीं गोल असतात. त्याचा वर्ण पिंवळसर पांढर असतो. दोन तीन फूट लांबीवरून पाहिलें असतां या अंड्याची सामान्य आकृती एखाद्या लहानशा बांकड्या तांदुळा सारखी असते.

अंडीं घालतांना टोळाची मादी आपली शेंपूट जमिनींत एका इंचापासून २ इंच खोली पर्यंत खुपसते आणि नंतर तेथें अंडीं घालते. हीं अंडीं एक एक पृथक नसतात पण यांचा सरासरीनें तीस तीस अंड्यांचा पुंज असतो. अंड्यांच्या प्रत्येक पुंजा भोंवतीं एक चिकण प्रवाही लुकण टाकतांना टोळाची मादी दृष्टीस पडते. हें लुकण वाळलें ह्मणजे तीं अंडीं एकत्र चिकटून बसतात आणि या लुकणानें प्रत्येक पुंजा भोंवतीं माती चिकटून रहात रहात त्या मातीचें एक वेष्टण तैयार बनतें. आणि ह्मणूनच अंडीं शोधून काढते वेळीं आपणास प्रथम एक मातीची गोल नळी दृष्टीस पडते. ही नळी १ इंचापासून १॥ दीड इंचापर्यंत लांब असते; तिचा व्यास पाव इंच असतो; आणि रंग सभोंवतालच्या जमिनी सारखा असतो. ही मृत्तिकेची नळकांडी फार ठिसूळ असते, आणि ती फोडली ह्मणजे आपणांस आढळेल कीं त्या गोल कांडीचा जो लंबाकार मध्यवर्ती दांडा असतो त्याच्याशीं काटकोन करून अंड्यांची मांडणी केलेली असते.

मादी बहुतकरून अंडीं घालण्यासाठीं कठीण व वहितींत नसलेली उंचवट्याची जागा शोधून काढते. अशा जागेवर वनस्पती देखील फारच थोड्या उगवतात. अशा जागीं जमिनीचा थर देखील चार पांच इंचा पेक्षां अधिक खोल नसतो. पुष्कळदां मला असें आढळलें आहे कीं, महाबळेश्वरासारखी तांबड मातीची जमीन अंडीं घालण्याला फार पसंत असावी. अंडीं घालण्याच्या हंगामांत या अंड्यांच्या जागेपासून दोन मैलांच्या आंत बहुधा पाणी लागतें; आणि या पाण्याच्या जागेकडे इकडून तिकडे जातांना टोळ दृष्टीसही पडतात.

साधारण जमिनींतील अंडीं शोधून काढण्याची उत्तम व त्वरित अशी रीत ह्मटली ह्मणजे एक लहानशी खरबंत केरसुणी घेऊन तिनें शेताच्या ज्या भागांत अंडीं घातलीं असतील असा समज आहे त्या भागाच्या पृष्ठावरील थोडीशी जमीन विखरून टाकावी. या रितीनें वरची भुसभुशीत माती काढून टाकून त्या स्थळाचें दक्षतेनें निरीक्षण करावें ह्मणजे जर तेथें अंडीं असतील तर तेथें एक लहानसें बीळ दृष्टीस पडेल आणि तें बीळ जेथें अंडीं घातलीं असतात तेथवर खोल पर्यंत जाऊन पोंचतें. त्या नंतर तेथील माती चाकूनें किंवा तशाच एखाद्या वस्तूनें उकरून पाहावी ह्मणजे तेथें गोलाकार एक मातीची नळी दृष्टीस पडेल.

ज्या शेतांत टोळांचीं अंडीं नेहमीं इतकीं घातलेलीं असतील तेथें प्रत्येक एका चौरस इंचाच्या किंवा तितक्याशा जमिनींत अंड्यांचा एक एक पुंज आढळेल अशी आमची अटकळ आहे.

---

### नोटीस

हरी वल्लद माहादु माळी राऊत राहणार बाईडाकळी यांस खाली सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुह्मास मी माझी मुलगी नामे राधी ही १८९७ सालीं देऊन लग्न लावून दिलें तेव्हां पासून तीं आजपर्यंत तुह्मी तिजला आपले घरीं नेऊन नांदविलें नाहीं. व आतां असें ऐकण्यांत येते कीं, तुह्मी दुसरी ह्मणणें आहे कीं, तसे न करितां तुह्मी आपल्या बायकोस घेऊन जाऊन नांदविणें असें करणें नसल्यास फारकती देणें. फारकत दिल्या वाचून जर दुसरी बायको केली तर तुमचे तसें करणें हीच फारकती समजून तिजला उचलून देईन. कळावें. तारीख २१।७।०४ इ०

सही

भुरी मर्द लक्ष्मण माळी उघाडे
राहणार बाईडाकळी निशा-
णी हातची बांगडी

---

नाग, नरसे, पिठोरी व जिवत्या.

आह्मी येथें विक्रीकरितां नाग, नरसे, जिवत्या आणि पिठोरी किंवा पाठोळा व त्यांत बुध व बृहस्पती हीं चित्रें ठेविलीं आहेत. चित्रें फारच सुरेख व पहिल्यापेक्षां त्यांत फरक करून उत्तम प्रकारचीं छापिलीं आहेत. ज्यांना पाहिजे असतील त्यांनीं खालील पत्त्यावर मनिआरडर पाठविली असतां सदर्हू चित्राचे कागद पाठवून देऊं. चित्रांचा दर शेंकडा १ रुपया प्रमाणें पडेल. व टपाल खर्च निराळा पडेल.

बाळकृष्ण अनोबा दलाल
कंपाझिटर.
वऱ्हाडसमाचार आफिस आकोला.

---

कापडाचें दुकान

( एक भाव व माफक दर )

आमच्या दुकानीं सर्व प्रकारचा रेशमी व सुती माल विक्रीस आहे. आमच्या कापडाचे भाव फारच थोडा नफा घेऊन आकारलेले आहेत. बाहेर गांवीं व्हाल्यु पेबलने माल पाठविण्याची सोय केली आहे एक वेळ आमच्या दुकानचा माल पडताळून दुकानाच्या सचोटीचा अनुभव अवश्य घ्यावा.

शा० नागसी भाई लध्धा
ठिकाणा—कॉटन मार्केटा समो
कच्छी बाजार, आकोला

---

### नोटीस.

रा. रा. पनालाल शालीग्राम मारवाडी राहणार पंचगव्हाण ता. अकोट यांस खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं मौजे अडगांव जाहागी ता. अकोट येथील शेत सर्वे नंबर ८१ चे शेत रावजी रुपाजी याचे मालकीचे असोन मी त्याजपासून स्वामीत्वानें वहिती दरसाल रुपये ६० देण्याचे कबूल करून घेतलें आहे असे असतां मी गदाधर श्रीधर जहागिरदार याचे फौजदारी साक्षीस काल ता. १८।७।०४ रोजी आलों असतां कोर्टांत मजला तुह्मी दोघा चार इसमाचे समोर अशी धमकी दिली कीं तूं जर जहागिरदाराचे मुकद्म्यांत साक्षी देशील तर मी तुझेवर, वरील शेत आमचे मालका जवळ ताबे गहाण आहे तर त्या ताबेगहाणासंबंधीं तूं आमचे ताब्यांतील शेतांत आल्यास जाते मारीन अशी धमकी देऊन शेत आपले ताब्यांत घेतले अशी फौजदारींत फीर्याद करीन असे तुह्मी ह्मणाले. तरी तुह्मी विनाकारण मजवर खोटी फिर्याद करूं नये. कारण वरील शेत तुमचे मालका जवळ जरी ताबेगहाण असलें तरी ते तुमचे ताब्यांत ताबेगहाणाचे तारखे पासून नाहीं. वर लिहिलेली तुह्मी खोटी फिर्याद केल्यास मजला तुमचे वर फौजदारींत फिर्याद करावी लागेल. आणि मजला इज्जतीचा जबाब घ्यावा लागेल. या नोटिशीचा खर्च तुमचे पासून भरून घेतला जाईल. ही नोटीस दिली सही ता. २०।७।०४

सही

पांडोबा वल्लद लक्ष्मण भोई
राहणार मौजे बाबतपूर
तालुके अकोट. पोष्ट
पंचगव्हाण.

---

### नोटीस

काशी मर्द रामजी माळी खाजेने राहणार आकोट सोमवारपेठ ईजला खाली सही करणार इजकडून उत्तर देण्यांत येते कीं मी तुजला तारीख २७ जून सन १९०४ इसवी रोजी वऱ्हाड समाचार पत्रांतून नोटीस दिल्यावरून त्याचा जबाब तूं मला तारीख ९ जुलै सन १९०४ इसवी रोजीं वऱ्हाडसमाचार पत्रांतून जो दिला तो केवळ तुझे लबाडीचा मला दिसून आला कारण तुजपासी बक्षीसपत्र असतें तर मेताचे प्रकर्णांत २१ क्लासांत दाखल केलें असतें त्यावरून तुझे लिहिणे मला फार असंभवनीय दिसतें. कदाचित् येमाई माझी आजी हीनें बक्षीसपत्र लिहून दिलें असेल तर विथेस बक्षीस देण्याचा अधिकार हिंदु धर्म शास्त्रा प्रमाणें पोहचत नाहीं. याजकरितां आकोट येथील शेताचा कबजा मी तुला देवाल नाहीं व तुझे ताब्यांत खानापूर व कान्हेरी येथील जमीन आहे ती मी माझे कबज्यांत घेतों. तूं शेतें पेरूं नयेस ह्मणून तुला मी कळविलें असतांही तूं शेतें पेरलीस. त्या बिकांस मी हरकत, निंदन वगैरे देऊन माल घेऊन येईन हे खूप समजावें. ह्या नोटिशीस लागलेला खर्च तुला द्यावा लागेल. कळावें. ता० १६ माहे जुलै सन १९०४ इ० दस्तुर हनमंत रामराव पिटिशन रायटर.

सही

रुखमी मर्द सदु माळी येरोळे
राहणार आकोट निशाणी
खुद हातची बांगडी.

## नोटीस

बेशमी लक्ष्मण सोनार्जी पंग वेश्य सोनार राहणार आकोट यांसः-

खालीं सही करणार यशवंत केशव देशपांडे रा. आकोट यांजकडून नोटीस देण्यांत येतें कीं तुमचा मुलगा हरी वल्लद लक्ष्मण यानीं माझीं शेतें मौजे इटाळी येथील सर्व्हे नंबर ४८ व ५० हीं दोन पांच वर्षां करितां १३१३ फसली पासून १३१७ फसली पावेतों दरसाल १८५ रुपये स्वामित्वाच्या करारानें वहितीस घेतलीं. पाहिल्या वर्षी शेतीची वहिवाट करित असतांनाच तुमचा मुलगा प्लेगानें मरण पावला ह्मणून तुह्मीच शेतीची वहिवाट करून गेलें पीक घेतलें. स्वामित्वाबद्दलच्या रकमे पैकीं तुह्मी वसूल १३५ रुपये दिले आहेत. बाकीचे रुपये ५० अजून दिले नाहींत इतकेंच नाहीं तर तुह्मी तीं शेतें वहित होंत नाहींत असें सांगुन सोडून दिलीं आणि आह्माला तोंडीच समज दिली कीं, कौलरुख्यावर हक्क सोडुन दिला आहे तेव्हां तुमची जमीन तुह्मी वाहावी. जमिनीची व्यवस्था आह्मी केली आहे; पण तुह्मी ती एकदम सोडल्यामुळें आमचे १० रुपये नुकसान झालें आहे. असो. आतां मेहरबानी करून आठ दिवसांत गुदस्ताची रकम रुपये ५० व्याजा सुद्धां पोचते करावेत. असें न केल्यास कोर्ट मार्फत दावा करून या नोटिशीच्या खर्चा सुद्धा सर्व नुकसानी तुह्माकडून भरून घेतली जाईल. कळावें. तारीख २१।७।१९०४ इ.

सही

यशवंत केशव देशपांडे

आकोट.

---

## नोटीस

मे० आमदखां हेडमास्तर आकोला ताज-नापेठ यांसः—

खालीं सह्या करणार अबदुल लतीब खा व अबदुल रहिमानखा वल्लद अमीरखा राहणार मौजे नायगांव हल्लीं बस्ती आकोला या नोटीसी द्वारें कळविण्यांत येत कीं, तारीख १८।७।१९०४ इसवी रोजीं तुमचे आमचे दरम्यान ठराव झाला होता कीं, एक करारनामा खेरेदी जवजे अबदुल लतीबखा याचे संबंधीं आह्मी सांगितल्या प्रमाणें तुह्मी लिहून द्यावे व त्याचे मोबदल्यांत दुसरा करारनामा तुह्मी मागितल्या प्रमाणें आह्मी लिहून देऊं. येणे प्रमाणें तुमचे आमचे दरम्यान ठराव असून तुह्मी तर लिहून घेतला. परंतु आह्मांस ही नोटीस पावल्या पासून आठ दिवसाचे आंत दुसरा लिहून द्यावें किंवा तो आह्मी लिहून दिलेला परत द्यावे. येण प्रमाणें तुह्मी न केल्यास त्या करारनाम्यांतील सदर्हू मजकूर आह्मी रद्द केला असें समजलें जाईल. शिवाय इतर कायदेशीर तजवीज करण्यांत येईल पुढें तुमच्या कोणत्याही प्रकारे उजर तकरार वगैरे ऐकली जाणार नाहीं. कळावे. तारीख २३ माहे जुलै सन १९०४ इसवी०

सही

१ अबदुल लतीफखा राहणार ताजनापेठ आकोला दस्तुर खुद्द.

२ अबदुल रहिमानखान आकोला.

---

## नोटीस.

जैराम वल्लद मसनाजी धोबी राहणार पिंप्री तालुका चिखली जि. बुलठाणे यांसः—

खाली सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येतें कीं तुह्मी माझी सवत मानकाई इचे प्रत्यक्ष भाऊ असुंत व माझे नवऱ्याची इस्टेट तिचे कडून अफरातफर करण्याचे हेतूनें व माझे नवऱ्यास कोणतेही कर्ज नसतां व मानकाई इजला कर्ज काढण्याची कांहीं जरूर नसतां तुह्मी पोकळ गहाणखत रुपये ५०० चे ता० १२।६।०४ रोजीं करून घेतले व त्यात मौजे जांब ता० बाळापूर येथील शेत सर्व्हे नंबर ३० एकर ३३-६ आकार ३५चे यातील ½ हिस्सा गहाण लिहून घेतला आहे. माणकाई इजला ½ हिस्सा गहाण लिहून देण्याचा कांहींच अधिकार नाहीं व जरूरही नाहीं. तुह्मी कपटाचे व पोकळ दस्तैवज करून घेऊन फसवित आहां सबब या नोटिशीनें कळविले जात आहे कीं तुह्मी मानकाईपासून करून घेतलेले गहाणखत रद्द करून आमचे जवळ परत आणून द्यावे. तसे न केल्यास जरूर वाटल्यास रीतीप्रमाणें तुमचे वर दिवाणी व फौजदारींत काम चालविणें भाग पडेल. कळावे. ता० २३।७।०४ इ०

सही

गुक्ती मर्द चंद्रभान धोबी राहणार जांब पोस्ट पातुरशेखबाबू ता. बाळापूर जि. आकोले नि. हातची बांगडी.

---

**वऱ्हाडसमाचार**

मिती आषाढ शुद्ध १३ शके १८२६

---

## पंढरीची यात्रा

गेल्या शनिवारीं पंढरपूरचें पुण्य क्षेत्र माणसांनीं अगदीं गजबजून गेलें होतें. आषाढी एकादशीचें महात्म्य फार मोठें सांगतात आणि या दिवशीं पंढरपुरास जाणाऱ्या यात्रेकरूंची संख्या फारच मोठी असते. यंदाच्या सालीं तर लक्षावधी भाविक लोक पंढरीस लोटले होते. अशी मोठी यात्रा गेल्या दहा पंधरा वर्षांत जमली नव्हती असें सांगतात. आगगाड्या पंढरपुराहून किती लोक गेले असतील याची थोडीशी अटकळ यावी ह्मणून आह्मी खालील माहिती मुद्दाम गोळा केली आहे. तारीख ११ जुलै पासून तारीख १९ जुलै पर्यंत ३४ स्पेशल ट्रेनी इकडून पंढरपुराकडे सोडण्यांत आल्या. प्रत्येक स्पेशल ट्रेनीला २३ डबे असतात आणि प्रत्येकी डब्यांत पन्नास पन्नास माणसें बसवावीत असा कंपनीचा नियम होता. पण तेथें ५० च्या ऐवजीं ६०–६० माणसेंहि बसत असत. या हिशोबानें ४० हजार यात्रेकरू स्पेशल गाडीनें पंढरपुराला गेले. या शिवाय प्यासिंजर व मेल गाड्या या मधूनहि पुष्कळसे यात्रेकरू दररोज पंढरपूर जवळ जवळ करीत असत. थेट पंढरपूरचें टिकीट या गाड्यांना देण्यांत येत नसे ह्मणून उतरू लोक मनमाड, धोंड, कल्याण, पुणें वगैरे स्टेशनांची टिकिटें काढून तेवढाच मार्ग काटीत असत. वर ज्या स्पेशल गाड्या सांगितल्या त्या गाड्यांची कल्पना लक्ष्यांत घेण्यासारखी आहे. स्पेशल गाडी या संज्ञेनें प्रथम असा बोध होतो कीं, विवक्षित स्थळीं जाणाऱ्या लोकांच्या साठीं मुद्दाम विशेष सोईच्या ह्या गाड्या असाव्यात. परंतु ती अटकळ चुकीची आहे. ही स्पेशल गाडी ह्मणजे नेहमींच्या माल गाड्या होत. या ट्रेनीला उतारूंचे डबे लावलेले नसतात. मालाच्या डब्यांत उतारू ठसून भरीत. या डब्यांत पाणी साफ लागण्याच्या सोई कांहीं एक नसतात. डब्यांतून उजेडाची सोयही ठीकशी नसते. इतक्या गैरसोई रेल्वेच्या सोसाव्या लागतात. तथापि रेल्वेचा किराया कांहीं कमी द्यावा लागतो असें मात्र कोणी समजूं नये. रेल्वे आपलें भाडें संपूर्ण पैसान-पैसा चुकता अगाऊ घेतल्या खेरीज उतारूंस गाडीजवळ जाऊं देत नाहीं. ह्या सर्व गोष्टी लक्ष्यांत घेतां अशी ही स्पेशल गाडी गरीब भाविक वारकऱ्यांच्याच वाट्यास येते हें पाहून मनास जरा वाईट वाटतें. आषाढीची यात्रा ही भर पावसाळ्याच्या संधींत येते आणि त्या वेळीं पुष्कळशीं वयोवृद्धच माणसें पंढरीस जातांना दृष्टीस पडतात. त्यांचे प्रवासांत दगदगीनें फार हाल होतात आणि खुद्द पंढरपुरीं गेल्यावरहि तेथें गैरसोई व अडचणी यांस सोसाव्या लागतात त्या निराळ्याच. यंदा तर आह्मी असें ऐकतों कीं, एकादशीच्या निमित्तानें गेलेली पुष्कळशी मंडळी एकादशी पूर्वीच स्वगृहाकडे परतली पंढरपुरास इतकी गर्दी झाली आहे कीं तेथें चार पैसे खर्चूनही उभे राहण्यास जागा मिळत नाहीं. लोकांचा हा निस्सीम व अपूर्व भक्तिभाव पाहून खरोखर मनास एक प्रकारचा अवर्णनीय आनंद होतो. पण एवढ्या मोठ्या जनसमुहाला देवदर्शनाहि सुखानें मिळण्याचा संभव नसतो. तथापि पंढरपूर ह्मणजे वैकुंठाची पेठ होय आणि याच पेठेमध्यें आपणांस परमार्थाचा सौदा मिळेल असा दृढ विश्वास तुकाराम बोवांनीं सर्वांच्या मनांत उत्पन्न केलेला असल्यामुळें आज हजारों वर्षे लोक मोठ्या आतुरतेनें व प्रेमानें पंढरीस जात असतात. हा पंढरीचा महिमा खरोखर अपूर्व होय!

या यात्रा संबंधाचा व्यवहारिक विचार थोडासा निराळ्या दृष्टीनें केला पाहिजे. वऱ्हाड प्रांतांतील लोकांना ही पंढरीची यात्रा ह्मणजे बराच दूरचा पल्ला आहे. अशा दूर ठिकाणीं जाण्याच्या वेळीं निदान १०–१५ दिवसांची चांगली निर्वेध अशी फुरसत पहावी ह्मणजे वाटेंत लागणारीं पुण्य क्षेत्रें पाहण्यांत येतील. तिकडील मुलुखचे रीतरिवाज, रहाटी व सृष्टिसौंदर्य हीं पाहण्यास सांपडून कांहीं साधुसमागमहि घडेल आणि ईश्वरभजनाच्या मार्गांतील खाणाखुणा पटून यात्रेचा खरा उद्देश सिद्धीस जाईल. अशा यात्रेसाठीं ऋतुमानहि लक्षांत घेतलें पाहिजे. पर्जन्य काळ हा कोणच्याही प्रवासास सुखदायक नाहीं आणि त्यांतल्यात्यांत लांबच्या प्रवासास तर तो फारच त्रासकारक होय. प्रवासास उत्तम काल ह्मटला ह्मणजे हिंवाळ्याच्या अखेरीचे व उन्हाळ्याच्या आरंभीचे दिवस होत. अशा दिवसांतील एखाद्या हरिदिनाचा योग पंढरपुरास साधावा ह्मणजे पुण्यसंचयाच्या दृष्टीनें आषाढीच्या पेक्षांहि अधिक लाभ होईल अशी आपची समजूत आहे.

---

## भावी ज्युडिशिअल कमिशनर

पुढील महिन्यांत हल्लींचे ज्युडिशिअल कमिशनर हे ११ वर्षांच्या रजेवर विलायतेस जाणार आहेत तेव्हां आमच्या प्रांताला कोण ज्युडिशिअल कमिशनर येतील अशा विषयीं सर्वत्र अनुमानें चालूं आहेत. कोणी ह्मणतात कीं, हिंदुस्थान सरकार बाहेरचा एखादा इंडियन सिव्हिल सर्व्हंट पाठविल आणि कोणी ह्मणतात कीं, सध्यांच्या डेपुटी कमिशनर मंडळी पैकींच एखाद्याची या जागेवर नेमणूक होईल; पण त्यांचा बोलण्यांत असाही आक्षेप निघतो कीं, नेटिव्ह डेपुटी कमिशनरांपैकीं मात्र कोणालाही ही जागा मिळणार नाहीं. या आक्षेपा संबंधानें आमचें एवढेंच ह्मणणें आहे कीं, पेटंट मिळालेल्या हाय कोर्टाच्या न्यायमूर्तीच्या जागा सुद्धां नेटिवांस देण्यांत येतात तेव्हां वऱ्हाडच्या ज्युडिशिअल कमिशनरीच्या जागेवर नेटिवांस न नेमण्या संबंधीं कांहीं विशेष सरक्युलर असेल असें आह्मांस वाटत नाहीं. आह्मी तर असें ह्मणतों कीं, नेटिव येवो किंवा युरोपियन येवो तो या न्यायाधिशाच्या जागेला सत्पात्र असावा ह्मणजे झालें. पुष्कळदां असा अनुभव येतो कीं, ज्युडिशिअल कमिशनरी सारख्या महत्वाच्या जागीं त्या कामीं अनभिज्ञ अशा गृहस्थांची नेमणूक करितात आणि मग त्या अधिकाऱ्याच्या हातून कायद्याचीं तत्वें उलटीं पालटीं झालीं किंवा कायद्याची मीमांसा चुकीची झाली तर तो दोष त्या अविज्ञ न्यायमूर्तीचा नसून तो सर्व दोष सरकारच्या कृतीचाच आहे असें आह्मी समजतों. ज्युडिशिअल कमिशनरीच्या योग्यतेला कांहीं विशिष्ट ज्ञान लागत असतें. तो मनुष्य कायद्यामध्यें पारंगत व पूर्णपणें निष्णात असला पाहिजे. या शिवाय तो मनुष्य मोठा शांत, गंभीर व अनुभवी असा असावा लागतो. एक ज्युडिशिअल कमिशनर ह्मणजे सर्व

प्रांतांतील न्यायाधिकाऱ्यांना उत्कृष्ट कित्ता घालून देणारा असा असला पाहिजे आणि तो जर तसा नसेल तर त्या मानानें त्या जागेची महती कमी होऊन त्या अधिकाराची शोभा गेली असें होईल इतकेंच नाहीं तर न्यायदेवतेचा दरबार ह्मणजे अंधळ्या कोशिंबिरीचा खेळ खेळण्याच्या मैदाना प्रमाणें होईल. मग त्या खेळांत ज्याच्यावर राज्य येईल तो भाग्यहीन आणि बाकीचे भाग्यशाली होणार हें निराळें सांगणें नकोच.

---

आह्मी या वेळेला ज्युडिशिअल कमिशनरीच्या जागे संबंधानें एवढा उहापोह केला आहे याचें कारण इतकेंच कीं, स्थानिक सरकारानें अशा श्रेष्ठ धर्मासनावर निदान अनाधिकारी, असत् पात्र व अनभिज्ञ अशा गृहस्थास नेमूं नये. न्याय कोर्टांतील जागा संबंधानें आमची समजूत अशी आहे कीं, ज्या मनुष्यांनीं वकिलीचा धंदा केलेला नाहीं आणि ज्याला न्यायाचें इङ्गत चांगलें कळलें नाहीं अशा माणसाला न्यायाधिशाची जागा देऊं नये. आणि हाच नियम मुंबई इलाख्यांत सर्वत्र दिसून येतो. परंतु हा नियम आमच्या प्रांतीं लागू पडत नाहीं याचें कारण इकडील जागा बहुतेक शिफारशीनें भरण्यांत येतात. असो. पुष्कळ दिवसांची चाकरी व शिफारस याच दोन्ही गोष्टी जुडिशिअल कमिशनरीची जागा भरतांना लागू करूं नयेत असें आमचें पुनःपुनः सांगणें आहे. मुंबई, मद्रास व कलकत्ता येथील हायकोर्टांत जर नांवाजलेल्या कायदे पंडितांना न्यायाधिशाच्या जागा देण्यांत येतात तर त्या प्रमाणेंच आमच्या कडील ज्युडिशिअल कमिशनरीच्या जागीं राव बहादूर मुधोळकर, भागवत किंवा राजश्री खापर्डे व जोशी अशा सारख्या नामांकित गुणी लोकांची नेमणूक होईल तर प्रांतीच्या संबधानें त्या त्या व्यक्तींना मोठासा फायदा होण्यासारखा नाहीं तरी तें न्यायाचें श्रेष्ठस्थान मात्र निःसंशय चांगलेंच विभूषित होईल.

---

## टोळांवर मोहिम

टोळांचा मोर्चा आमच्या प्रांताकडे फिरला तेव्हां आकाशांतून यांचे थवेच्या थवे कसे दृष्टीस पडले; क्षणभर त्यांच्या गर्द छायेनें आकाश कसें व्याप्त झालें होतें; आणि ज्या ज्या भागांत यांचा तळ पडे तेथें तेथें त्यांनीं वनस्पतिवर्गाची पानपत्री व फुलेंफळें ही एकदम कशी खाऊन टाकलीं व मोठमोठे वृक्षहि कसे नागवून सोडले इत्यादि हकीकत आह्मी पूर्वीच दिलेली आहे. वऱ्हाडांतील उत्तरेच्या डोंगराळ भागांत सध्यां हे टोळ वसतीला गेले आहेत आणि तेथून ते या आषाढ श्रावणाच्या सुमाराला मैदानांत उतरून ते आपलीं कोव्या वर्षी अंडीं जमिनींत घालतील अशी मोठी भिती आहे. टोळधाड ह्मणजे ईश्वरी क्षोभाचेंच एक लक्षण होय असें आह्मी समजतों. टोळांचा प्रतिकार करण्याची क्रिया माणसाच्या हातीं नाहीं. गेल्या १८१२-१३ वर्षांत टोळांचा अनुभव महाराष्ट्रांत पुष्कळ आलेला आहे पण तिकडेहि टोळांचा नाश करण्याची गोष्ट फारशी सिद्धीस गेल्याचे ऐकिवांत नाहीं. आमच्या स्थानिक सरकारासहि या टोळांची मोठी भिती वाटत आहे पण मुंबई इलाख्या प्रमाणें आमचे स्थानिक सरकार अद्याप जेरीस आलेलें नाहीं. जरी मुंबई सरकारनें टोळापुढें आपले हात टेकले आहेत तरी आमच्या स्थानिक सरकाराची मोठीच चिकित्सा सुरूं आहे. या प्रांतांतून टोळांचा समूळ उच्छेद करावा या हेतूनें आमच्या सरकारनें एक मोठी मोहीम आरंभिली आहे. या मोहिमी संबंधाचे सर्व अष्टाधिकार सेटलमेंट कमिशनर साहेबाकडे आहेत आणि त्यांनीं आपल्या हाताखालील फौज फारच चांगली कवाईत द्यावी ह्मणून या प्रांतांतील पुष्कळशा अधिकाऱ्यांचा एक स्पेशल दरबार आकोल्यास गेल्या बुधवारीं भरविला होता आणि कित्येक अ. कमिशनर, कित्येक तहशिलदार, कित्येक नायब तहशिदार इत्यादिकांस मुद्दाम पाचारण केलें होतें. या दरबारच्या वेळीं सेटलमेंट कमिशनर साहेबांनीं टोळ संबंधानें पुष्कळशी माहिती सांगितली आणि टोळ कसे मारावेत अशा निरनिराळ्या कवाईतीचे धडे प्रयोगासह त्यांनीं शिकविले. आमच्या दृष्टीनें ही एवढी मोहिमेची तयारी नको होती. हा दरबार भरविण्याचा जो खर्च आला असेल त्याच्या एका शतांशा इतकाहि फायदा या मोहिमेपासून होईल असें आह्मांस वाटत नाहीं. आणि अशा ह्या लढाया लढाईनें टोळावरील मोहिमेंत जय येईल असें चिन्ह दिसत नाहीं. तथापि आशा ही गोड्बोली आहे आणि तिच्याच छंदानें आह्मी ह्मणतों कीं ही मोहीम यशस्वी होवो.

वरील दरबार प्रसंगीं साहेबांनीं ज्या एक दोन गोष्टी सांगितल्या त्या ह्या होत. हिंदुस्थानच्या सर्व भागांत टोळांनीं निकांचा फार सपाटा चालविला आहे व त्यामुळें लोकांचें बरेंच नुकसान होत आहे. टोळांनीं अंडीं घातल्या पासून सुमारें १२ महिन्यांनीं त्यांतून लहान लहान पिलें बाहेर पडतात. प्रथमतः तीं पिलें कांहींशीं हिरव्या रंगाचीं असून त्यांचें पंख तांबडे असतात व तीं जसजशीं मोठीं होत जातील तसतसे त्यांचें आयुष्य वाढत जाऊन त्यांच्या हिरव्या रंगाची पालट पडते. आगष्ट महिन्यांत त्यांची उत्पत्ती विशेष असते. व त्यांना मारण्याचे उपाय त्याच संधानांत करावे लागतात. टोळा संबंधाचे एक दोन अनुभव असे आहेत कीं, पाण्यांत सोमलाचें मिश्रण करून तें पाणी शेतांत शिंपडलें असतां तेथील झाडांचीं पानें वगैरे टोळांनीं खाल्लीं तर टोळ मरतात. तसेंच शेतांत रात्रीच्या वेळीं जर रॉकआईलच्या तेलानें कुड्या पेटविल्या तर त्या ज्वाळांत ते आपोआप येऊन पडतात. टोळांचा भर कपाशीवर मोठासा नसतो तरी ते कपाशी खात नाहींत असें मात्र नाहीं. टोळांना पकडून मारण्यासाठीं साहेब बहादुरांनीं २ यंत्रें तयार करून आणविलीं होतीं त्यांची माहिती सर्वत्र लोकांस त्यांनीं करून दिली. साहेब बहादुरांनीं आणलेल्या यंत्रांचा उपयोग पडीत जमिनीवर चांगला फलद्रूप होण्याजोगा आहे परंतु पेरा झालेल्या जमिनींत उपयोग होण्याजोगा नाहीं व लोकांस पेरलेल्या जमिनीचीच काळजी विशेष आहे तेव्हां याजबद्दल कशी काय तजवीज करावयाची त्याजबद्दल बाटाघाट व्हावयास पाहिजे होती ती कांहीं झाली नाहीं. ती झाली असती तर बरें झालें असतें.

---

## नवीन फेरफार

मध्यप्रांताशीं जो आमचा नवीन संबंध जडला आहे त्या अन्वयें इकडील विद्याखात्यांत बरेच फेरफार करण्यांत आले आहेत. इतकीं वर्षे मुंबईच्या युनिव्हर्सिटीशीं संबंध होता ह्मणून आमच्याकडील वार्षिक परीक्षा दसरा दिवाळीच्या मैदानांत होत असत. त्या परीक्षा यंदा पासून बंद होतील आणि या पुढें या परीक्षा अल्लाहाबादच्या युनिव्हर्सिटीच्या नवीन धोरणानें दरवर्षी मार्च महिन्यांत होत जातील. तसेंच हायस्कुलांत इंग्रजी ४ थी ५ वी, ६ वी व ७ वी अशा चार यत्ता चालू असत पण आतां शेवटील फक्त तीनच यत्ता तेथें चालतील. आणि इंग्रजी ४ थ्या यत्तेचा वर्ग इंग्रजी–मराठी शाळांतूनच ठेविला जाईल. ह्मणजे या रीतीनें इंग्रजी पहिल्या चार यत्तांचा समावेश ॲंग्लोव्हरनॅक्युलर स्कूल्स मध्यें होईल आणि बाकीच्या तीन यत्ता हायस्कूलच्या अभ्यासक्रमांत मोडल्या जातील. हायस्कूलची ५ वी व ६ वी अशा दोन्हीही सार्वजनिक वर्गणीवर इंग्रजी-मराठी शाळांतूनाहि शिकविण्यांत येतील पण त्यांच्यासाठीं वर्गणी अनुक्रमें ३०० व ९०० रुपये द्यावी लागेल.

विद्यार्थ्यांच्या वार्षिक परीक्षा संबंधाचेहि नियम बदलले असून मध्यप्रांतांतील नियमांचीच इकडे अमलबजावणी सुरूं होणार आहे. प्रत्येक शाळेंतील विद्यार्थी वरच्या वर्गांत घेण्यासंबंधाचा सर्व अधिकार हेड मास्तरांच्या हातीं देण्यांत आला आहे. परंतु हेड मास्तरांच्या वर्गांतील विद्यार्थ्यांची परीक्षा, तो विद्यार्थी आपली यत्ता पास झाला असतां ज्या शाळेंत जावयाचा असेल त्या शाळेचे हेडमास्तर घेतील. ह्मणजे प्राथमिक शाळा, मिडलस्कूल व हायस्कूल या शाळांतील पहिल्या पहिल्या वर्गांची परीक्षा अनुक्रमें मिडलस्कूलचे हेडमास्तर, हायस्कूलचे हेड मास्तर आणि अलाहाबाद युनिव्हर्सिटी यांच्या मार्फतीनें होत जाईल.

आमचा प्रांत मराठी भाषा बोलणारा आहे तेव्हां विद्याभ्यासा संबंधानें या प्रांताची सांगड रांगडी भाषा बोलणाऱ्या अल्लाहाबादे कडील प्रांताशीं घालण्यांत आली आणि मुंबई सारख्या पुरें सरसावलेल्या युनिव्हर्सिटिशीं पुष्कळ वर्षांचा असलेला संबंध तोडण्यांत आला ही गोष्ट बरी झाली नाहीं.

---

## तुरुंग प्रकरण

गेल्या आठवड्यापासून या प्रकरणास विशेष रंगरूप आलेलें आहे. या खटल्यांतील मुख्य आरोपी रा. गोपाळ विश्वनाथ टोकेकर हे इतके दिवस गैरहजर होते. ते परागंदा झाले असें समजून त्यांच्या पश्चात त्यांच्या विरुद्ध साक्षीपुरावा चालू होता. पण ते गेल्या १७ वे तारखेस आपण होऊन आकोल्यास आले आणि त्याच्यावर सुटलेल्या पकड वारंटा अन्वयें ते पोलिसच्या स्वाधीन झाले. गोपाळराव आल्यापासून या आगीच्या खटल्याकडे लोकांचें लक्ष्य विशेष वेधलें आहे. पूर्वी हनुमानसिंग, हेड वार्डर व बच्चुसिंग, डाक्टर रेलीचा अर्दली या दोषांवरच खटला चालूं होता तेव्हां हा खटला अगदीं निर्जिव असा लोकांस वाटत होता. गोपाळराव आल्यापासून कचेरी अगदीं गजबजून गेलेली असते. गोपाळरावांस जामिनावर खुले ठेवण्या संबंधानें अर्ज करण्यांत आला होता पण तो नामंजूर झाला आणि त्या मुळें त्यांस हातकड्या घालून कचेरीस नेतात व आणतात तेव्हां त्यांचा तो म्लानमुखभाग पाहून मोठी कींव येते. या आगीच्या संबंधानें जेलांतील कैद्यांचा साक्षी पुरावा घेण्याचें काम एक सारखें दररोज चालूच आहे.

---

## वऱ्हाडवृत्त

हवामान — या आठ दिवसांत पाऊस बिलकूल नाहीं. लोकांचें डोळे आकाशाकडे लागले आहेत. आणि याच ऐन वेळेवर परमेश्वरकृपेनें चांगला पर्जन्य होईल तरच खरिपाचीं पिकें हातीं लागण्याचा संभव आहे. रोगराई कांहीं नाहीं. उष्मा होत आहे आणि काल पासून थोडा पाऊस पडूंही लागला आहे हें सुलक्षण होय.

लेफ्टेनंट कर्नल वॉरेन हेस्टिंग्ज हे तीन महिन्यांच्या हक्काच्या रजेवर येत्या शुक्रवार पासून जाणार आहेत आणि त्यांच्या रजेंत रा. रा. एच. गॉडवीन ऑस्टिन डेपुटी कमिशनर यांस कमिशनरीच्या जागेची बढती देण्यांत आली आहे.

उमरावतीच्या डेपुटी कमिशनरीच्या जागीं कॅप्टन मॉरिस अ. कमिशनर, सिव्हिल जज्ज, उमरावती यांस नेमून त्यांच्या सिव्हिल जज्जाच्या कोर्टावर रा. रा. शेख इस्मायल ए. अ. क. आकोला यांस बदलण्यांत आले आहे.

रा. रा. गणेश बापूजी उटगीकर ए. अ. क. यांस आणखी तीन महिन्यांची जास्त फर्लो रजा देण्यांत आली आहे.

रा. रा. जे. के. बॅटन आय. सी. एस. ज्युडिशिअल कमिशनर यांस फर्लो व हक्काची रजा मिळून १ वर्ष २ महिने व २९ दिवसांच्या मुदतीची रजा ३ आगस्ट पासून देण्यांत आली आहे.

---

## आकोला बाजारभाव

| | |
|---|---|
| हुंडी दर्शनी | १००८= |
| सोनें २४।= | चांदी ७१॥ |
| जवारी ९२-९९ | कपास ८६ |
| गहू काठे ७२॥ | बनशी ८७॥ |
| सरकी | ५॥ |
| मीठ | ३॥ रु. मण |
| चणे | २॥ रु. मण |
| तूप | १०॥ रु. मण |
| तेल | ४।= रु. मण. |
| रुई जीन | ७८ |

## वर्तमानसार

**जपानच्या राणीस पडलेलें स्वप्न** - टोकियो येथील वर्तमानपत्रांतून जपानच्या राणीस पडलेल्या एका स्वप्नाची हकीकत प्रसिद्ध झाली आहे. ही हकीकत अशी आहे कीं, एक जपानी आरमारावरील अमलदार स्वप्नांत राणीसाहेबांपुढें येऊन उभा राहिला. त्यानें त्यांस लवून सलाम केला व पुढील उद्गार काढले. " लढाई संबंधानें आपण बिलकूल काळजी करूं नका. सर्व सैन्यावर मी चांगली देखरेख ठेवली आहे.' नंतर तो तेथून नाहींसा झाला. पुढें हा मनुष्य कोण असावा हें कळण्या करितां राणी साहेबांनीं आरमारावरील निरनिराळ्या पुष्कळ अंमलदारांचे फोटो पाहिले. त्यांत एक फोटो स्वप्नांत दिसलेल्या अंमलदाराचा असलेला त्यांनीं ओळखला. हा फोटो सुमारें अडतीस वर्षांपूर्वी मरण पावलेल्या जपानी अॅडमिरल सीकामोटो नांवाच्या प्रसिद्ध अंमलदाराचा होता. या स्वप्नानें जपानच्या राणी साहेबांस मोठा आनंद वाटत असून लढाईंत जपानचा विजय होणार अशी खात्री वाटत आहे.

तारीख ३० मार्च सन १९०४ रोजीं केशवजी नायांचे गिरणीचे एक श्रीमान मुकदम मुंबईहून विंचूरला जाण्या साठीं शीव स्टेशनावर रात्रीं साताचे सुमारास उतरले त्यावेळीं त्यांचा डबा प्लाटफार्म पासून दूर उभा केला गेला व तेथे दिव्याचा पुरता प्रकाश नव्हता यामुळें सदर गृहस्थ गाडींतून उतरत असतां पडून त्यांना बरीच दुखापत झाली. पुढें सदर गृहस्थांनीं आपणास झालेल्या शारिरिक, मानसिक इजेबद्दल व सांपत्तिक नुकसानीबद्दल कंपनीविरुद्ध ९३,९८३ रुपयांचा हायकोर्टांत दावा आणिला. सदर दाव्याचा निकाल गेले गुरुवारीं न्या. बद्रुद्दीन तैयबजी यांचे कोर्टांत होऊन वादीस शारिरिक नुकसानीबद्दल चार हजार, मानसिक इजेबद्दल, पांच हजार, व सांपत्तिक नुकसानीबद्दल पंधरा हजार मिळून चोवीस हजार रुपये व दाव्याचा खर्च प्रतिवादी कंपनीनें वादीस द्यावा असा निकाल झाला.

सन १८९० चा जनावरांस निर्दयतेनें वागविण्याचें बंद करण्याबाबतचा आक्ट ११ वा हा करवीर शहरच्या स्थलसीमेंत दोन वर्षांच्या मुदतीनें अनुभव पाहण्यासाठीं ह्मणून तारीख १ सप्टेंबर १९०४ पासून लागू करण्यांत येणार आहे. या कायद्या अन्वयें दोन बैलांच्या गाडीवर बंगाली २० मणांपेक्षां ( कोल्हापुरी मापानें १० मण ) जास्त ओझें लादणें हा गुन्हा होणार आहे.

खानदेश जिल्ह्यांतील पाचोरें तालुक्याच्या मामलेदार कचेरींतील कुळकर्ण्याचे मुशाहिऱ्यासंबंधानें खजिन्यांतून ५०० रुपयांपेक्षां जास्त पैशाची अफरातफर झाल्याचें एक प्रकरण उपस्थित झालें आहे. ही अफरातफर बऱ्याच दिवसांची असण्याचा संभव आहे ह्मणतात. या मत्रांत कोणकोणाची आहुती पडते पहावें.

कानपूरचे प्रसिद्ध योगशास्त्री व ज्योतिषी पंडित रामनारायण यांणीं रूसो जपानी युद्ध आणखी अडीच वर्षें चालून तें सन १९०६ सालांत पुरें होणार असल्याचें भविष्य केलें आहे. या पंडिताचें असें ह्मणणें आहे कीं, या युद्धांत चीन देश अखेरपर्यंत अलग राहील. परंतु फ्रान्स आणि जर्मनी यांची मदत रशिया मिळवील. त्याचा परिणाम असा होईल कीं, अमेरिका व इंग्लंड यांस जपानची बाजू धरावी लागेल आणि त्यामुळें युरोपच्या अंतर्प्रदेशांत धुमाकूळ माजून त्यांत इंग्लंडास यश येईल. तिबेटच्या लढाईबद्दल याच ज्योतिषी बोवांनीं असें भविष्य वर्तविलें आहे कीं, हल्लीं चाललेलीं तहाचीं बोलणीं वायफळ होऊन तिबेटी लोकांचा या लढाईंत पराभव होईल आणि तिबेट प्रांत सर करून इंग्रजसरकार तारीख १८ एप्रिल १९०५ च्या सुमारास तो प्रांत आपल्या राज्यास जोडील.

**पुण्यच्या सायन्स कालेज प्रिन्सिपलची नोटीस**—सायन्स कालेजच्या प्रिन्सिपालनीं अशी नोटीस लावली आहे कीं विद्यार्थ्यांचा चेहरा मोहरा कसा काय दिसतो या गोष्टीकडे काळजीपूर्वक लक्ष पुरविण्यांत येईल व कालेजांत सभ्य व योग्य दिसणार नाहीं त्यांस युनिव्हर्सिटीच्या परिक्षेस बसण्याची परवानगी मिळणार नाहीं. इंग्रजींत ही मोगलाई नव्हे कां ?

पुणे जिल्ह्याच्या खेड तालुक्यांत टोळांचीं मुईमुगाच्या दाण्या एवढीं असंख्य अंडीं आढळलीं आहेत व प्रत्येक पुंजक्यांत ७५। १०० अंडीं आहेत.

गुप्त गोपन कायद्याची घोरपड प्रथमतः " बुइक्ली क्रॉनिकल " वर येण्याचा संभव दिसत आहे.

तारीख २५ जुलै रोजीं पुनर्विवाहाचे कायद्याचे सन्मानार्थ मुंबईंत भगवानदास यांच्या वाड्यांत सभा भरणार आहे. व त्यावेळीं सुधारकांत ( वाचेंत की कृतींत ) किती जोर आहे हें दाखविण्यांत येणार आहे असें समजतें.

श्री. जमखिंडीकरांनीं शेतकरी रयतेस तीन लक्षांची सूट दिली. इंग्रज सरकारनें अशा गोष्टीकडे लक्ष दिल्यास काय हरकत आहे !

धारवाड रेल्वे आफिसांतील एका ब्राह्मण कारकुनाचे तोंड बांधून व अपानद्वारांत खुंटी मारून त्याचा खून केला. आरोपीचा सुगावा लागला आहे ह्मणतात.

बोअर युद्धाचे वेळीं लॉर्ड राबर्टस साहेबांनीं बोअर बायका व मुलें कोंडवाड्यांत कोंडून टाकल्यामुळें १५००० मुलें मरण पावलीं! आणि लार्ड राबर्टस नुकतेच बालक्लेश निवारिणी सभेचे अध्यक्ष झाले होते.

टिबेटांत व्हिक्टोरिआ व ग्लॅडस्टन यांचे पुतळे असून तिबेटचे लोक त्यांची नित्यशः पूजा करितात अशीं इंग्लंडांतील पत्रें ह्मणतात. या पूजेची भेट कशाठीनें करणें योग्य नाहीं.

लार्ड कर्झन हे १९०६ च्या मार्च अखेरीस हिंदुस्थानांत येतील असें ह्मणतात.

असनसळच्या स्टेशन जवळ तीन युरोपियन गार्डांनीं एका हिंदु स्त्रीवर जुलुम केला होता परंतु त्यांना सोडून देण्यांत आले व रेल्वेच्या अधिकाऱ्यांनीं त्यांना फक्त २।२ रुपये दंड करून स्त्रियांच्या बेअब्रूच्या खटल्याचा निकाल केला.

व्हाईसराय साहेबांचें आगमना प्रीत्यर्थ शहर सुशोभित करण्यांत डाक्काच्या महाराजांनीं ११००० रुपये खर्च केला व ते पैसे त्या कंपनीला दिले नाहींत ह्मणून मेसर्स व्हाईटले, लेडला आणि कंपनीनें डाक्काच्या महाराजावर कोर्टांत फिर्याद केली आहे.

द्वारकेच्या शंकराचार्यांच्या सोन्याच्या पालखीचा ४ तोळे वजनाचा सोन्याचा पत्रा कोणी चोरून नेला अशी मुंबईच्या पोलीसास कोणी खबर दिली आहे.

हैद्राबादचे रेसिडेंट सर डेव्हिड बार हे १९ साल अखेर पेनशनवर जाणार.

कलकता येथील नळाच्या पाण्याच्या सांठ्यांत साप असल्याबद्दल संशय आल्यावरून त्यासंबंधीं तपास करण्याकरितां कार्पोरेशननें एक स्पेशल कमिटी नेमिली आहे. या कमिटींत सहा डाक्टर व बंगालचे सॅनिटरी इंजिनियर आहेत.

ताई महाराज यांची इस्टेट बाळा महाराजांकडून मिळण्या संबंधानें ताईमहाराजांचे दुसरे दत्तक विरंजीव जगन्नाथ यांनीं पुणें येथील सबजज्ज कोर्टांत दिवाणी दावा मांडला असून त्याची चौकशी पुणे येथील सबजज्ज मि. बर्वे यांजपुढें चालु होती तींत जज्ज साहेबांनीं जगन्नाथ ह्यांचे औरंगाबाद येथील साक्षीदारांच्या साक्षी घेण्याकरितां तेथें कमिशन पाठविण्याचें ठरविलें व खटला ता. २४ आगष्ट पर्यंत तहकूब ठेवला आहे.

इंदूर संस्थानांत मराठी भाषेच्या ऐवजीं हिंदी भाषा दरबारानें सुरू केल्यास काय काय अडचणी येतील ह्याचा कांहीं एक विचार न करितां इंदूर दरबारानें अधिकाराच्या जोरावर मराठीच्या जागीं हिंदी भाषा दप्तरांतून सुरू केली. इंदूर संस्थानांत हिंदीचा प्रचार झाला हें पाहून हिंदी भाषेचा प्रसार होऊं इच्छिणारांना फार आनंद झाला आहे. व हिंदी पत्रकारांनीं मोडी लिपीच्या दुर्बोधतेबद्दल टीका चालविली आहे. मोडी लिपी दुर्बोध व अघड आहे हें ह्या हिंदी पत्रकारांना कोणी शिकविलें हें आह्मास समजत नाहीं. मोडी लिपीची उपयुक्तता किती आहे ह्याचा विचार न करितां हिंदी पत्रकारांनीं जी टीका चालविली आहे त्यामुळें मोडी लिहिणारांच्या उपहासास मात्र ते आपणांस पात्र करून घेत आहेत हें त्यांनीं लक्षांत ठेवावें.

राशियन गुप्त बातमीच्या खात्यांत अव्यवस्था असल्यामुळें जपानी हेर रशियाच्या क्यांपांत शिरून गुप्त बातम्या नेऊन त्यांचे बेत निष्फळ करीत आहेत. जपानी लोकांचे हेर राजरोस क्यांपांत येतात पण त्यांची कोणी परवा करीत नाहीं. ते कशाला आले आहेत याची कोणी चवकशी करीत नाहीं. अशी सर्व अनास्था झाल्यामुळें जपानी लोकांना राशियन जनरलचे बेत फसविण्याला व त्यांना पादाक्रांत करण्याला मोठी अमूल्य संधी मिळाली आहे. राशियन हेर तें आपसांतील गुप्त कारस्थानें शोधून काढण्याच्या खटपटीला लागल्यामुळें शत्रू आपलें काळीज चोरून नेत आहे याचें त्यांना देहभान नाहीं.

नेहमीं झुरूमरू करीत राहणाऱ्या मरतुकड्या मुलांचें शिक्षण व आरोग्यरक्षण हीं दोन्ही व्हावीं अशा उद्देशानें जर्मनींत बर्लिन शहरानजीकच्या जंगलांत १२५ मुलें राहतील एवढी एक बोर्डिंग शाळा बांधण्यांत आली आहे. या शाळेंत १२५ मुलें जरत्कारू अशीं ठेविलीं असून त्यांस दिवसांतून फक्त दोन तीन तास शिक्षण मिळावें. व बाकीचा वेळ त्यांनीं वनविहार करण्यांत खुशाल घालवावा अशा प्रकारची व्यवस्था करण्यांत आली आहे. हा प्रयत्न जरत्कारू मुलांच्या आरोग्यास हितावह होतो असें आढळून आलें तर या शाळेची पक्की व्यवस्था करावी असा विचार आहे.

**रशिआंत वर्तमानपत्रांचा धंदा** — फारच कठीण आहे व वर्तमानपत्रांवर नजर ठेवण्यासाठीं ह्मणून ३१३ मुख्य ऑफिसर आहेत. यांचें काम वर्तमानपत्रें वाचून त्यांस नेहमीं धाकांत ठेवावयाचें किंवा शिक्षा करावयाची. गेल्या एका सालांत ८३ वर्तमानपत्रकर्त्यांस कांहीं वर्षेपर्यंत आपलीं पत्रें बंद ठेवण्याचा हुकूम झाला. २६ वर्तमानपत्रकारांनीं जाहिराती घेऊं नयेत असा सक्त हुकूम दिला गेला आणि २६९ वर्तमानपत्रकारांस " तुह्मी आपलें वर्तमानपत्र सौम्य तऱ्हेनें चालविलें नाहीं, तर तुह्मांस सैबिरिआंत हद्दपार केलें जाईल. " अशी ताकीद करण्यांत आली.

**सूर्यरथ सांपडला** — डेन्मार्कची राजधानी कोपनहेगेन येथील पदार्थसंग्रहालयांत एक फार जुना सूर्यरथ ठेविलेला आहे. हा सूर्यरथ सीलंड बेटांत कांहीं कारणानें एक खड्डा खणीत असतां त्यांस सांपडला. हा रथ सूर्याच्या आकाराचा असून पंचरसी धातूचा आहे व त्यावर सोन्यानें किरण दाखविले आहेत. याला सहा अर्धचक्रें आहेत. सूर्याचे घोडे जोडलेले आहेत. एकदरींत सूर्यासंबंधी ज्या पौराणिक कथा व दंतकथा आहेत, त्यांप्रमाणेंच तो आहे. हा रथ कमींत कमी तीन हजार वर्षांचा जुना असावा. तो धर्मक्रियेसंबंधीच असावा याबद्दल कांहीं शंका नाहीं. त्या प्रदेशांतले मूळचे रहिवाशी याची पूजाअर्चा करीत असावे. तो बहुतकरून यज्ञासंबंधीं उपकरणांपैकींही एक असावा. हा रथ २३॥ इंच लांब व ८॥ इंच रुंद आहे. यामुळें रथटेबलावर कोठेंही ठेवण्याइतका तो आटपसर आहे.

**शहाण्याला उपदेश** —दुशाला किंवा शालू घेतांना बायका जितकी दक्षता दाखवितात, तितकीच काळजी नवरा पसंत करण्यांत त्यांस घेतां येईल, तर त्यांचे पुढच्या पश्चात्ताप राहणार नाहीं.

## नोटीस

चिनकाई मर्द शिवाराम बस्ती किनखेड तालुके अकोट, व सोनाई मर्द नेगाराम राहणार पांढरी पांढरी— तेल्हारा तालुके आकोट यांस:—

खाली सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं माझा नवरा रावोजी मयत झाला त्यावेळेस तुम्ही माझ्या बरोबर आल्या होत्या तेव्हा मी तुमचे जवळ सोन्या चांदीचे डागीने ठेवण्याकरितां दिले होते ते अजमास किंमत रुपये २०० त्याची पावती माझे जवळ आहे माझे मुलाचे गंधर्व चालले तेव्हा तुमच्या डागीने मागितले असतां तुमचे मागीं येऊन घेतो असे म्हणून आज पावेतों डागीने आणून दिले नाहीं करितां नोटिसीने कळविण्यांत येते कीं १५ दिवसांचे आंत माझे डागीने मजकडे आणून द्यावे या प्रमाणें तुमचे कडून न झाल्यास दिवाणी कोर्टांत दावा करून खर्चासुद्धां भरून घेऊं कळावें. तारीख १९।७।०४

सही

तानकाई मर्द रावोजी तर्फे किसन बहादूर रावोजी राहणार अड-सुळ तालुके आकोट

निशाणी खुद्द

---

## नोटीस

रा. रा. शिवराम वल्लद भिवराम पाटील रा. नेरधामणा ता. आकोला परगणे कुरणखेड यांस:—

खाली सही करणार याजकडून नोटीस देण्यात येते कीं तुम्ही तारीख १०।४।०१ रोजी कर्जाचा लिहून देऊन २०० रुपये रोख आमचे पासून नगदी घेऊन गेले. त्या रुपयाची माझा मुखत्यार भवानी वल्लद हुसाजी पाटील रा. जवळ बुद्रुक यानें पुष्कळ वेळां मागणी केली परंतु तुमचे कडून माझा मुखत्यार असतांनाच आदाई झाली नाहीं. देवघेवीचा व्यापार व सर्व जोखिम पुरी पाहून मजवर असल्या. मुळें माझा मुखत्यार मेल्यावर सान्या इस्टेटीची व्यवस्था पूर्ण पणे माझे कडे आली. म्हणून मी तुम्हास रुपयांची मागणी केली असता तुम्ही त्या संबंधानें काहीच व्यवस्था केली नाहीं व करण्याचे ही तुमचे मनात नाहीं असें दिसते. म्हणून नोटीस देण्यात येते कीं ही नोटीस पावतांच आठ दिवसांत सदरहू कर्जाबद्दल २०० रुपये व त्यांचे आज मित्ती पावेतों व्याज दरमहा दरशेकडा दोन रुपये प्रमाणें १५६ रुपये एकूण ३५६ रुपये पैका देऊन माझे हातची पावती घ्यावी. असें मुदतींत न झाल्यास मी दिवाणी कोर्टांत फिर्याद करून कोर्ट खर्चासह व या नोटिशीच्या खर्चासह सर्व रक्कम भरून घेईन कळावें तारीख १८।७।०४ इ.

सही

शंकर वल्लद चनसिंग गौरे रा. जवळ बुद्रुक पोस्ट कुरणखेड ता. आकोला दस्तूर खुद्द

---

## जाहिरात

लक्ष लावुन एक वेळ वाचा वाचा!!

एम. एम. अँन्ड सन्स

फोटोग्राफर स्वर स्टांप मेकर वॉचरिपेरर आणि स्टेशनरी मरचंट आकोला [वऱ्हाड]

आज पर्यंत कोणत्याही कंपनीनी येथे रेडीमेड रबर स्टांप ( अपना या नांवाचे पेक्षा किंमतीत किफायती नसेल तो आम्ही रुपये ५ मध्ये ग्यारंटी वर्षे ५ ची देतो आहे तर लाभ करावी आणि घड्याळाबरोबर काच, कमान, पेटी आणि एन्नेमल घड्याळें लोकांचे नावचे रबरी पत्तानची छाप तयार करून पाठवूं आणि तीन घड्याळ घेणारास व्ही. पी. खर्च माफ. व एक डझन घेणारास एक घड्याळ बक्षिस देऊं हे घड्याळ एक वेळ घेतले तर पुन्हा १० वर्षे पर्यंत दुरुस्त करण्यास नको आणि दुसरे हर एक जातीचें घड्याळ मिळेल हे एक जातीचें स्टेशनरी सामान माफक दरानें व सर्वोदय खात्री लायक पाठवूं. या शिवाय रबराचे छाप त्यांचे हर एक जातीचें करून देऊं. आणि रबर स्टांपाच्या नमुन्याकरितां अर्ध्या आण्याचें टिकीट पाठवावें म्हणजे नमुना फ्री पाठवूं. आणि फोटो काढून घेणारांस ईच्छा असेल त्यांनीं येथें यावें. नाहीं पेक्षां आम्हास बोलवावें. म्हणजे आम्ही येऊं आणि २५ रुपया पेक्षा ज्यास्त माल घेणारास दर रुपयास ८॥ अर्धा आण्या प्रमाणें कमिशन देऊं. आणि या शिवाय काहीं विचारावयाचें असेल तर पत्र व्यवहार करावें म्हणजे उत्तर देऊं. नाहींपेक्षां समक्ष येऊन भेट व्हावी म्हणजे समजेल. आणि कोणास बायसिकलवर बसायाला शिकणें असेल त्यानी यावे. शिकविण्या बद्दल फी रुपये १० पडेल. रबरस्टांप करितां हर एक गांवास एजंट पाहिजेत. कमिशन माफक मिळेल. या सर्व कामाची व सामानाची मागणी करावी म्हणजे खात्री होईल.

एम. एम. अँन्ड सन्स आकोला

---

## NOTICE

Notice under sec. 150 of th Berar Municipal Law 1886.

The Akola Municipal Committee proposes to make the following rules to regulate the assessment and collection of the tax on animals vehicles levied under sec. 41 (1) A (*b*) of the Berar Municipal Law 1886.

The draft will be taken into consideration after the 20th of August 1904 and objections or suggestions in respect there of should be forwarded in writing to the Secretary Municipal Committee Akola before that date.

Dated Akola 18th July 1904 } HAIDAR ALI Vice—Chairman Municipal Committee Akola.

*Rules*

1 On every vehicle and animal used within the limits of the Akola Municipality, a tax shall be levied at the rates sanctioned in R. O. notification No. 25 25-1-1899.

2. The tax shall be paid by the owner of the vehicle and animal or in his absence by the person in charge or possession thereof on his behalf.

3. Every year the Secretary of the Municipal Committee shall prepare an assessment register containing the names of persons liable to the tax and the number of vehicles, and animals and a statement of the amount for which they are liable.

4. The assessment register shall be placed before the Committee for sanction, and when sanctioned the assessment shall come into force from the 1st of April every year.

5. The register shall be open to inspection during office hours at the Municipal office throughout the year and objections against the assessment may be filed at any time during the year.

6. The objection shall be allowed on the following grounds and on no others: —

(*a*) That the objector does not own or possess the vehicle in respect of which he is taxed.

(*b*) That a vehicle in respect of which tax is levied is not used.

7. The objection shall be disposed of by the Committee or a Sub-committee authorized in that behalf by the Committee.

8. The name of any person omitted from the register or of any person coming to possess a taxable vehicle subsequent to its preparation may at any time be included in it. He may object to such inclusion and his objection shall be disposed of in the manner provided in Rule 6.

9 The tax shall be payable quarterly in the first fortnight of every quarter beginning from 1st April.

10. The use during any quarter or portion of quarter of a taxable vehicle shall render the owner, or in his absence the person in charge of the vehicle, liable to the tax for that quarter.

11 A receipt under the signature of the Secretary to the Municipal Committee shall be granted for the amount of tax paid.

12 Persons assessed shall continue liable to the tax until they notify to the Secretary to the Committee the fact of their ceasing to use the vehicle.

13. When a vehicle for which the tax has been paid for any quarter is transferred the transferee shall not be liable to the tax for that quarter.

14. Every person owning, possessing or using a vehicle which is liable to the tax shall be bound to give true information regarding the number and description of vehicle kept by him when called upon to do so by the Secretary to the Committee or any person authorized in this behalf by the Committee.

15. Every person who brings into use a vehicle in respect of which he has obtained exemption under Rule 6 (*b*) on the ground that the vehicle is not used by him, shall be bound to report the fact to the Committee within 15 days of his bringing it into use.

16. Vehicles which though belonging to persons who reside within Municipal limits are ordinarily kept beyond those limits shall not be liable to this tax unless they are habitually used within Municipal limits.

*Akola 18/7/04* } Haidar Ali *Vice—Chairman M. Committee Akola.*

---

ॐ नमः श्री गणेशाय.

आर्यवैद्योषधालय— मुर्डी ता० दापोली

आमच्या खात्रीच्या औषधांचा गुण शंभरांतून एक दोन रोग्यास कदाचित् न आला तर पैसे परत देऊं व त्याचे आरोग्यार्थ आणखी एखादें उत्तम औषध घावें लागल्यास तें फुकट देऊं.

## मदनामृतसंजीवनी

धातुवर्धक, अत्यंत कामोत्तेजक व पौष्टिक, वीर्यस्तंभक, रक्तशोधक मनोत्साहक, कांतिबुद्धिवर्धक, अभ्र सुवर्णमाक्षिक, मौक्तिक, कस्तुरी व अनेक वनस्पतीमिश्र अद्भुत

## गुटिका

उपयुक्त वनस्पतींचें मिश्रण केलें असल्यामुळें यांत अपायकारक पदार्थ अगदी नसून खालील विकारावर ह्या अत्यंत उपयोगी आहेत.

यांच्या सेवनानें नपुंसकत्व, स्वप्नावस्था इतर धातुपात, उन्हाळे, इंद्रिय शिथिलता, कडकी, गर्मी संबंधीं मुरलेले विकार, मूत्रकोष, धातूचा पातळपणा, स्त्रियांची गर्भाशयांतील रोग, हातपाय, मूत्रस्थान व नेत्र यांचा दाह, क्षय पांडुरोग, मुलांची खोकला, जीर्णज्वर, अग्निमांद्य, मस्तकशूल, मूळव्याध, वातरोग, निद्रानाश, पित्तविकार, बद्धकोष्ठ, पृष्ठव्यथनादि यांचा संसर्गानें आलेली कृशता इत्यादि अनेक विकार खात्रीनें बरे होऊन शरीर निरोगी, मजबूत व सतेज बनतें. पचन शक्ति व स्मरण शक्ति भरपूर वाढते. धातु व रक्त यांची वृद्धि, वीर्यस्तंभन भरपूर कामोद्दीपन होतें. इतकी भरपूर आनंदी मन व उत्साह येतो. दुध व मद्याचा मर्यादा ठेवून लागते. गुणाबद्दल असंख्य सर्टिफिकिटें मिळाल्या व नित्य मिळत आहेत. पथ्य सेवनाची गरज मुळींच नसून स्त्रिया, पुरुष, मुलें यांस पाहिजे त्या दिवसांत घेण्यास अत्यंत उपयोगी आहे.

गुटिका खाण्याचें आंत मिळणार नाहीं एकदम चार रुपयांवर कितीही घेणार टपाल खर्च माफ. चार रुपयांचे आत २० ८६ आणे पडेल. अनुपान खर्ची सोबत पत्रांतून किंवा व्ही पी. नें खात्री पत्रावर लिहिली असतात. दर: —

१३५ गो० १ रु० ७५ गो० २ रु० ... २२५ गो० ३ रु० १६५ गो० ४ रु० ... ७५ गो० ६ रु० ५५० गो० १० रु० ...

आमचेकडे या शिवाय मोठमोठे रोगांवर अनेक औषधें असून ग्रंथस्थ रसायनें धातु भस्में, पाक गुटिका वगैरेही माफक दराने मिळतात विशेष गुणवर्णनाचा सर्व सामानाचा मोठा क्याटलाग मागवावा, फुकट टपाल खर्च वेगळा पडेल. रोगाचें हि व्ही. पी. नें पाठवूं.

सूचना— अलिकडे १३ वर्षे आमचे ह्याच ठिकाणीं केवळ आपमतलबी लोकांच्या जाहिरातीस उत्तेजन लोकांच्या जाहिरातीस उत अश्या अनेक झालेल्या आमचेच जाहिरातीची हुबेहूब करून ते ग्राहकांचे डोळ्यांत धूळ फेकीत आहेत. करितां आमची सकल देशबंधूंस अशी सविनय प्रार्थना आहे कीं, ज्यांस खरी शास्त्रोक्त औषधें घेणे असतील त्यांनी आमचीच औषधें खालील बिनचूक पत्त्यावरच मागवावी.

पत्ता-कृष्णशास्त्री पेंडसे वैद्य मु० मुर्डी ता. दापोली जि० रत्नागिरी

## आर्यौषधालय

आमच्या औषधालयांत (दवाखान्यांत) नाडी परीक्षा वगैरे अष्टविध परीक्षेनें रोगाचें निदान करून औषध योजना केली जाते. बाहेर गांवच्या रोग्यांनीं कुळ‌ओळ प्रकृतिमान वगैरे कळविल्यास त्यावरूनही अनुभवशीर गुणकारक औषधें पाठवूं. सर्व रोगावर खात्रीचीं औषधें तयार आहेत; त्यां पैकीं मुख्य खालीं लिहिल्या प्रमाणें:—

सारसापरिला— रक्तशुद्धि करणाऱ्या देशी व विलायती वनस्पती पासून हें औषध तयार केलेलें आहे. गरमी (उपदंश) पासून सर्वांगावर पुरळ उठणें किंवा काळे डाग पडणें, पारा रसायन अंगावर फुटणें किंवा त्यापासून सांधे दुखणें, सुजणें यावर हें अगदीं खात्रीचें औषध आहे. गरमी शिवाय दुसऱ्या कोणत्याहि कारणानें रक्त बिघडणें कोरडी खरूज, वंडू, पुरळ, गळ्याच्या वगैरे गाठी सुजणें, संधिवात, (सांधे दुखणें व सुजणें) शरीराचा कोणताहि भाग दुखणें व सुजणें लकवा, गंडमाळा यांवरही ह्याचा उत्तम उपयोग होतो. कि० लहान बाटली १॥ रु. मोठी बाटली २॥ रु. पोस्टेज वगैरे ।= व ॥

मानसर्वेकगोट—कामोद्दीपक गोळ्यांपेक्षां ह्या गुटिका गुणांनीं फारच श्रेष्ठ आहेत; कारण कामोद्दीपक गोळ्यांनीं सप्त धातु न वाढतां विषय वासना मात्र वाढते; व त्यामुळें धातुचा फाजील व्यय होऊन त्या पासून धातु क्षीणता, धातुपातळ होणें वगैरे वाईट परिणाम होतात तसे ह्या गुटिकांनीं न होतां सप्त धातु वाढून कामोद्दीपन (विषयवासना) होते. कोणताहि कारणानें आलेलें नपुंसकत्व, अशक्तता, स्वप्नांत धातुपात होणें, शौचेंत धातु जाणें वगैरे सर्व विकारांवर फारच उपयोगी कि० २५ गोळ्यास १ रु.

गरमी (उपदंश) वर गोळ्या—क्षत. सुज, बद, पुळी वगैरे सर्व विकार कितीही दिवसांचे असले तरी ह्या गोळ्यांनीं खात्रीनें बरे होतात ह्यांत अपायकारक रसायनी औषध बिलकूल नाहीं. पथ्य विशेष नाहीं कि० ३० गो. रु. २

परम्यावर औषध— लघवीची जळजळ, तिडीक इ० २४ तासांत बरें होतात. कि० रु. १॥

बाळंत रोगावर औषध— हें अनुभवशीर खात्रीचें औषध आहे. कि० ३० गो. रु ९

बालामृत— संग्रहणी, पंडु, अशक्तता, खोकला इ० विकारांवर मुलांना फार उपयोगी. कि० दर बा. ॥

हिवताप व पानथरी यांवर औषधें—प्रत्येक औषधास कि० १ रु.

भस्में, मात्रा, पाक, आसव वगैरे सर्व शास्त्रोक्त औषधें तयार आहेत त्यां पैकीं मुख्य:—

| | |
|---|---|
| अभ्रक भस्म— क्षय, खोकला, इ० | कि० दर तो. रु. १५ |
| लोहभस्म (शतपुटी) पंडु, अशक्तता इ० | ,, ,, रु. ३ |
| मधुमेह— वरच्या हून जास्त गुणकारी | ,, ,, रु. २ |
| प्रवाळ भस्म नं. २ जीर्णज्वर, धातुविकार इ० | ,, ,, रु. १ |
| प्रवाळ भस्म नं० १ वरच्या हून जास्त गुणकारी | ,, ,, रु. २ |
| सूत शेखर— पित्तविकार, मोंवळ इ० | ,, ,, रु. ४ |
| खोकल्यावर गोळ्या—खोकला दमा | ,, ,, ॥- |
| सुवर्णमाक्षिक—धातुविकार जीर्णज्वर इ० | ,, ,, रु. २ |
| मंडूर भस्म—पंडु, संग्रहणी इ० | ,, ,, रु १ |
| हेमगर्भ ग— वातकफ इ० | ,, ,, रु. १८ |
| चंद्रप्रभा— मेह, मुळव्याध गरमी इ० | ,, ,, रु १॥ |
| सु० मा० व— जीर्णज्वर, अग्निमांद्य इ० | ,, ,, रु. ६ |
| महायोगराज गुगुळ— सर्व वात विकार | ,, ,, रु. २ |
| रक्षक गोळ्या (जुलाब होण्यास) | ३२ गो० रु. १ |

औषधें रोखीनें किंवा व्ही. पी. नें पाठवूं. पाच रुपयांवर घेणारास कमिशन. लुगात पत्र द्यावें.

वैद्य दामोदर शास्त्री गोडबोले
खामगांव (वऱ्हाड)


# ORIENLTAL

**GOVERNMENT SECURITY**

LIFE ASSURANCE COMPANY, LIMITED,

Established 1874,

Head Office—**BOMBAY**

*Chief Agency for C. P. Berar & Khandesh*

Head-quarters—Nagpur, C. P.

FUNDS EXCEED

## TWO CRORES AND TEN LAKHS

Claims paid for over One Crore and Fifteen Lakhs.

**IMMEDIATE SETTLEMENT OF CLAIMS**

IF there be one thing of more importance than another in connection with Life Assurance, it is, when Claims arise, that the amount due under the Policy be paid to the Claimants at the earliest possible date. This the Directors of the "Oriental" keep well before them, and act up to treating their clients with the utmost liberality.

UNQUESTIONABLE SECURITY

IT is not sufficient to read that a Company's Funds amount to given sum, but it is essential to know how such Funds are invested if in miscellaneous and risky investments or how secured.

THE Funds of the "Oriental" are invested in Government Securities, and lodged with the Government Official Trustee of Bombay' in terms of the Company's Trust Deed, as Security for Claims arising through decease of assured lives, and endowment policies matured.

GOVERNMENT Officers, Professional men, Tradesmen and others, by employing a portion of their annual income or profits in effecting life policies, at once create a fund equivalent to the savings of many years.

CREDITORS who expect the repayment of debts at some future period, may protect themselves from loss by the failure of life in the intermediate period, by an assurance on the life of the debtor

NO man can be sure how long he will live; and although he may save money, yet if he die early, before he has had time to save much, his wife and family may be in distress. Life Assurance, is a means by which this danger is got over. Life being so uncertain, the sooner a man makes up his mind to assure his life the better. Once satisfied of the propriety of the step, do not delay. There are numerous instances in the records of the 'Oriental' where the delay of a month or less, has left the family without the intended provision.

INFLOENTIAL AND ENERGETIC AGENTS WANTED. FOR TERMS PLEASE APPLY TO UNDER-SIGNED.

Prospectuses, forms, and any further information, can be obtained on application to—

M. De SOUZA,
CHIEF AGENT
*for C. P. Berar and Khandesh,*

## मुंबई बँकचीं सेव्हिंग्स बँक

ह्या बँकेंत खालीं लिहिल्या अटीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ली जानेवारी आणि ३१ डिसेंबर यांच्या दरम्यान एक हजार रुपया पर्यंत पैसा ठेवितां येईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवितां येतील. आणि तो पैसा त्या पैकीं एकास अथवा जास्त इसमास अगर त्यांपैकीं मयताचे मागें राहील त्यास काढतां येईल.

व्याज दरसाल दर शेंकडा ३ तीन रुपया प्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारांवरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं.

नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक आकोला ता० ३ | J. Kinniburgh एजंट

## जाहिरात

स्टोअर सप्लायर्स

आम्ही गिरण्या, जिनिंग फॅक्टरी, म्युनिसिपालिटी, वाटरवर्क्स, इंजिनिअर्स इरिगेशन लोकल बोर्डस् वगैरेना लागणारे व मुंबईतील इतर सर्व प्रकारचे सामान फारच वाजवी दरानें पुरवितों.

धी ग्लोब स्टोअर्स कंपनी.

जनरल मरचन्टस्

काळबा देवी रोड

मुंबई.


☞ हें पत्र आकोला येथें राहणारे खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाड-समाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.